सहकार भारतीचे मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

ISBN 978-81-940842-0-4

# सहकार सुगंध

PRGI NO. MAHMUL/2005/16099

• पुणे • वर्ष : २१ • अंक ९ • डिसेंबर २०२५ • पृष्ठे ४८ • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी




## सहकार भारती गोवा प्रदेश अधिवेशन संपन्न



## राज्यस्तरीय सहकारी गृहनिर्माण संस्था अधिवेशन गोवा


## ‘कॉक्लिआ’ संस्थेला जनसेवा पुरस्कार प्रदान



## भावपूर्ण श्रद्धांजली !
## सहकार भारतीचे आधारस्तंभ



वसंतराव देवधर



प्रा. आबासाहेब देशपांडे

## स्वरूपवर्धिनीला संपदा समाजकल्याण पुरस्कार प्रदान





दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर
31 वर्षे विश्वासाचे
आपला परिवार, आपली संस्था !
जनमानसाचा विश्वास... धरमपेठ महिला!
गेली ३१ वर्षे विश्वासार्ह अर्थसेवेने जनसामान्यांचे जीवनमान उंचाविण्यात धरमपेठ महिला नेहमीच अग्रेसर राहिली आहे. समृद्ध अशा ३१ वर्षांच्या प्रवासाचा आरंभ झाला आणि आज देशभरातील २९ शाखा, ५०००+ कोटींहून अधिक व्यवसाय व १.२५ लाखांहून अधिक समाधानी ग्राहकवर्ग हा अर्थसमृद्ध वटवृक्ष निर्माण झाला.
प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतानाच जनसामान्यांच्या मनात उज्ज्वल भविष्याची आशा व विश्वासार्हता निर्माण करणं हेच धरमपेठ महिलाचं प्रमुख उद्दिष्ट आहे.
गॅरंटी मासिक पेन्शन योजना
कालावधी : ५ वर्षांकरिता
व्याजदर : ७.८% (सर्वांकरिता)
योजना सर्व शाखेत उपलब्ध
योजना मर्यादित कालावधी करीत
सोने कर्ज Gold Loan
सोन्यासारख्या लेकींसाठी... हक्काचा आधार !
कमीतकमी कागदपत्रे
त्वरित कर्जमंजुरी
गोल्ड लोन 0.75% व्याजदर प्रति माह
आनंदी क्षणांचा सोबती...
सीताराम भवन
ऑडिटोरियम आणि गेस्ट हाऊस
। वाढदिवस । मुंज । साक्षगंध । सांस्कृतिक कार्यक्रम । कॉन्फरन्स
तुमच्या सेवेत सदैव तत्पर !
LOCKERS सुविधा
SMS अलर्ट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा
MOBILE BANKING
LOAN सेवा सुविधा
GOLD LOAN उपलब्ध
CORE BANKING
LIC /GIC
MSEDCL वीजबिल भरणा केंद्र
IRCTS आरक्षण सुविधा
५००० कोटींच्या व्यवसायाकडे यशस्वी वाटचाल...
मुख्य कार्यालय : प्लॉट नं ४२-अ, सीताराम भवन, हनुमान मंदीर समोर, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-४४००१०.
(0712)-2524336 / 2520303 info@dpmahila.com | Follow us on :
महाराष्ट्र | छत्तिसगढ | मध्यप्रदेश
www.dpmahila.com

राजर्षी शाहू
र.नं. ८१९

कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश

# राजर्षी शाहू

## मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. लि. बुलडाणा

ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून मल्टीस्टेट फेडरेशनचा "सहकार गौरव" पुरस्कार प्राप्त संस्था



रा.ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार

## तुमच्या सेवेत सदैव तत्पर..!

- LOCKERS सुविधा
- NEFT,RTGS सुविधा
- अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
- SMS अलर्ट
- MOBILE बँकिंग
- DOORSTEP बँकिंग
- GOLD LOAN
- MSEDCL वीज बिल भरणा केंद्र
- NET बँकिंग
- CORE बँकिंग
- DEPOSITE सुविधा
- LOAN सुविधा

## संस्थेची वैशिष्ट्ये

१. एकूण ६९ शाखेचा विस्तार
२. १००० कोटींचा व्यवसाय
३. १,५०,००० सभासद संख्या
४. 'शाहू पे हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ६० हजार महिलांना महिला बचत गट कर्ज वाटप.
६. 75 कोटी रु. सोने तारण कर्ज वाटप.





**सौ. मालती संदीप शेळके**
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. लि. बुलडाणा

**संदीप शेळके**
अध्यक्ष- राजर्षी शाहू परिवार | संकल्पक- वन बुलडाणा मिशन

www.rajarshishahumultistate.com 9359941853

netwin
Ideas to Life

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!



- शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
- NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
- सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
- संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा

Certification

netwin
Ideas to Life

नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.


- AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
- तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
- आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरु करा
- बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
- स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
- संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव

आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!

०२५३ ६६५ १५००

अधिक माहितीसाठी स्कॅन करा

sales@netwinindia.in
www.netwin.in


50+ YEARS OF MOMENTUM
अर्थ सहकारेण कल्याणम्
दि कल्याण जनता सहकारी बँक लि.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
व्यवसायातील जबाबदाऱ्यांचा नका घेऊ भार,
तुमच्या सोबत आहे कल्याण जनता बँकेचा आधार!
तुमच्या व्यवसायासाठीचं CURRENT ACCOUNT सुरु करा
आणि अनेक सुविधांचा लाभ घ्या.
* अटी व शर्ती लागू
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.in
KJSBank

टीजेएस्‌बी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

*Bharose ka Bank Bhavishya ka Bank*

# सोन्यासारखा आधार

## टीजेएस्‌बी सुवर्ण कर्जाची साथ



आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करा

**व्याजदर 8.60%* द.सा. पासून**

*अटी व शर्ती लागू

www.tjsbbank.co.in | ✆ : 022-48897210

# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

डिसेंबर २०२५ (वर्ष २१, अंक ०९)


# अनुक्रम


* देशातील प्रत्येक लहान गावात नागरी सहकारी बँक स्थापन होणार – केंद्रीय सहकारमंत्री शाह ०९
* सहकार भारती प्रदेशाध्यक्ष दत्ताराम चाळके माजाभिमुख कार्यकर्ते – सतीश मराठे......१०
* विकसित भारत, विकसित गोवा प्रत्यक्षात येण्यासाठी सहकाराच्या माध्यमातून सहकार भारतीने प्रयत्न करावेत – मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत ....................................................११
* राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था, अपार्टमेंटच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य : माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू............................................................१२
* सहकार भारतीचे संस्थापक सरचिटणीस वसंतराव देवधर यांचे निधन...................१३
* सहकारी बँकांचे शुभचिंतक – स्व. वसंतराव देवधर ........................................१५
* त्यागी व्यक्तिमत्त्व स्व. वसंतराव देवधर..................................................१६
* खाजगी साखर कारखान्याचे प्रणेते वसंतराव ..............................................१८
* सहकारातील निष्काम कर्मयोगी – वसंतराव देवधर...... ..............................१९
* सहकार भारती संस्थापक स्व.लक्ष्मणराव इनामदार स्मृति राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजन २०
* सहकार भारती, मुंबई विभाग आयोजित अभ्यास वर्गात विविध विषयांवर चर्चा .......२१
* सारस अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी अध्यक्षपदी भालचंद्र कुलकर्णी ...............२२
* नागपूर नागरिक सहकारी बँकेचा मोबाईल बँकिंग सुविधेचा प्रारंभ .....................२३
* पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेच्या आष्टी शाखेचे स्थलांतर ...........................२४
* प्रत्येक व्यक्तीपर्यंत सहकार पोहोचवणे, हेच सहकार भारतीचे काम – वैशाली आवाडे.. ...२५
* स्वच्छ सहकार हा नवीन सहकार धोरणामधील महत्त्वाचा मुद्दा : विवेक जुगादे..........२६
* जीवन सुंदर करण्यासाठी अंतर्मनात डोकावण्याची गरज : गणेश शिंदे .................२७
* समाज हा विश्ववंद्य आणि विश्वगुरू व्हावा हा सेवेचा उद्देश .............................२८
* बँकिंग लोकपाल योजनेत राज्य सहकारी बँका जिल्हा सहकारी बँकांचा समावेश ...........२९
* सहकार क्षेत्रात महिलांनी सजगतेने काम करावे – रूपेश कुमार.........................३०
* ठेव सुरक्षा ही माफक अपेक्षा.........................................................३१
* आर्थिक समानतेकरिता सहकारी संस्थांची गरज! ..........................................३३
* आपली ओळख आपली सुरक्षितता : KYC आणि AML चे महत्त्व....................३४
* सहकारी संकल्पनेतून हरित ऊर्जा : ऊस सह. संस्थांसाठी आदर्श.......................३७
* निर्णय प्रक्रिया!...........................................................................३९



**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे

**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/- फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/- फक्त
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)**

**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

**'सहकार सुगंध'** हे मासिक **मालक,** सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी **प्रकाशक** भालचंद्र वसंत कुलकर्णी यांनी **मुद्रक** विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, शॉप नं.२, कोणार्क उद्योग, स.नं. १७७, एरंडवणा, पुणे ४११ ००४ येथे छापून ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. **संपादक** – भालचंद्र वसंत कुलकर्णी

**'Sahakar Sugandha'** monthly is owned by Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., Published by Bhalchandra Vasant Kulkarni at Office No. 15, Vishnu Priya Apartment, Ganeshmala, Sinhagad Road, Pune 411 030 Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, S.N. 177, Erandwane, Pune 411 004. **Editor :** Bhalchandra Vasant Kulkarni

संपादकीय...

# परिवर्तनाच्या उंबरठ्यावर सहकार क्षेत्र!

केंद्र सरकारने २४ जुलै २०२५ रोजी नवीन सहकार धोरण (पॉलिसी) जाहीर केले. या धोरणात सहकार क्षेत्रासाठी अत्याधुनिक सुधारणांना पाठबळ, सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र सुधारणा, पारदर्शक व्यवस्थापन आणि तंत्रज्ञानयुक्त सेवा या गोष्टींना महत्त्व देण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या सहकार धोरणाला अनुसरुन सर्व राज्यांनीदेखील आपापल्या राज्यांचे धोरण डिसेंबर २०२६ अखेर पूर्ण करावयाचे आहेत. महाराष्ट्र राज्यानेसुद्धा नवे सहकार धोरण असावे यासाठी केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री अमितजी शहा व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सहकार धोरण ठरविण्यासाठी उच्चस्तरीय समितीचे गठन केले आहे. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या नेतृत्त्वाखाली या समितीमध्ये सहकार क्षेत्रातील अनुभवी, तज्ज्ञ व शासनाचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ च्या निमित्ताने या समितीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्र राज्याच्या सहकार धोरणात अनुकूल बदल करून व जुन्या धोरणांचा अभ्यास करून ही उच्चस्तरीय समिती शासनाला मार्गदर्शन करणार आहे. बदलत्या परिस्थितीत सहकार क्षेत्रातील आव्हाने व त्यावरील उपाय योजना यांचा अभ्यास करण्यासाठी तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कायद्यामध्ये काळानुरूप आवश्यक ते बदल करण्याचे मोठे आव्हान या समितीसमोर आहे.

महाराष्ट्राची सहकार चळवळ ही राज्याच्या आर्थिक, सामाजिक व ग्रामीण विकासाची पाठराखण करणारी कणा आहे. साखर कारखाने, दूध संघ, सहकारी बँका, पतसंस्था, शेती सेवा सोसायट्या, या सगळ्या संस्थांनी गेल्या शंभर वर्षात ग्रामीण आणि शहरी अर्थव्यवस्थेला दिशा दिली आहे. मात्र गेल्या काही दशकांमध्ये व्यवस्थापनातील अपारदर्शकता, आर्थिक गैरव्यवहार, तंत्रज्ञानातील अनुत्सुकता आणि बदलत्या गरजांशी जुळवून न घेणे या कारणांनी सहकार क्षेत्राला मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत. राज्य शासनाने 'महाराष्ट्र राज्य सहकार धोरण' तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, हे धोरण केवळ नियमांमध्ये बदल करण्यापुरते मर्यादित नसावे तर ते संपूर्ण सहकार क्षेत्राला आधुनिकतेकडे नेणारे असण्याची गरज आहे.

आज सहकारी संस्थांवर सर्वांत मोठा आरोप हा व्यावसायिकता आणि पारदर्शकतेच्या अभावाचा आहे. नागरी सहकारी बँकांमध्ये, पतसंस्थांमध्ये खात्यांची माहिती अद्ययावत नसणे, सभासद, खातेदारांना योग्य डेटा न मिळणे, कर्जवाटप प्रक्रियेत प्रामाणिकपणाचा अभाव आणि भ्रष्टाचार या गोष्टींनी सहकाराची प्रतिमा काही प्रमाणात मलिन झाली आहे. नव्या सहकार धोरणात संपूर्ण संगणकीकरण, ऑनलाइन लेखापरीक्षण, पारदर्शक व्यवहार आणि डेटा-आधारित व्यवस्थापन यांना अग्रक्रम देण्याची गरज आहे. केवळ तांत्रिक सुधारणा करण्याचे नसून सभासदांचा विश्वास पुन्हा जिंकण्यासाठीचा हा पाया ठरणार आहे. यासाठी संपूर्ण डिजीटायझेशनची आणि त्याहीपुढे एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाची देखील गरज प्रकर्षाने पुढे येत आहे.

महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सेवा सोसायट्या (पॅक्स) आणि जिल्हा मध्यवर्ती बँका ग्रामीण कर्जवाटपाचे मुख्य माध्यम आहेत. कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्यासाठी अपुरे कर्ज वितरण, किचकट वेळखाऊ निर्णय प्रक्रिया आणि थकबाकीचे वाढते प्रमाण या अडचणींवर मात करण्यासाठी विविध उपाययोजनांची गरज या धोरणात दिसायला हवी. कृषी कर्जवाटप दुप्पट करण्याची उद्दिष्टे, जोखीम व्यवस्थापन प्रणाली, वित्तीय शिस्त आणि व्यवस्थापनासाठी सर्वंकष प्रशिक्षण हेदेखील मुद्दे धोरणात समाविष्ट व्हायला हवेत. महाराष्ट्रातील साखर कारखाने आणि दूध संघ ही सहकार क्षेत्राची सर्वात मोठी ओळख आहे. मात्र आज या उद्योगांना खासगी व मल्टिनॅशनल कंपन्यांशी तीव्र स्पर्धा करावी लागत आहे. नवे धोरण या सहकारी उद्योगांना तांत्रिक आधुनिकीकरण, उत्पादनवाढ, गुणवत्ता सुधारणा आणि मार्केटिंगच्या दिशेने पुढे नेणारे असायला हवे.

महाराष्ट्राचे नवे सहकार धोरण हे या चळवळीचे परिवर्तन करणारे ठरावे. सभासदांचा सक्रीय सहभाग, पारदर्शकता, आधुनिक व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि वित्तीय शिस्त याला महत्त्व देणारे धोरण असावे. याबरोबरच लेखापरीक्षण प्रक्रियेला बळकटी देणे, निवडणुकांत पारदर्शकता, संचालक मंडळासाठी उत्तरदायित्त्वाची तरतूद आणि कायदेशीर सुधारणा हे मुद्दे देखील विशेषत्वाने असायला हवेत. महाराष्ट्र ही सहकाराची गंगोत्री आहे, त्यामुळे नवे धोरण अन्य राज्यांना दिशादर्शन करणारे ठरावे. नव्या धोरणामुळे सहकार क्षेत्र भ्रष्टाचारमुक्त व्हावे आणि सहकार क्षेत्राला नवी संजीवनी, नवी दिशा मिळावी, हीच अपेक्षा या चळवळीमधून व्यक्त होत आहे. जय सहकार!

# देशातील प्रत्येक लहान गावात नागरी सहकारी बँक स्थापन होणार - केंद्रीय सहकारमंत्री शाह

**नवी दिल्ली** – देशामध्ये दोन लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या प्रत्येक लहान शहरात एक नागरी सहकारी बँक स्थापन करण्यात येणार असून हे उद्दिष्ट पुढील पांच वर्षात पूर्ण करण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी सांगितली. नागरी सहकारी बँक आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये ते बोलत होते. या परिषदेत सहकार डिजी पे आणि सहकार डिजी लोन या दोन उपयोजनाचे अनावरण करण्यात आले.

डिजिटल व्यवहार ही आजच्या काळातील आवश्यक गरज आहे असे नमूद करून ते म्हणाले, आजकाल व्यवहाराच्या पद्धती वेगाने बदलत आहेत. डिजिटल व्यवहाराचा स्वीकार मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. नागरी सहकारी बँकांनी त्याचा स्वीकार न केल्यास त्या सध्याच्या स्पर्धेतून बाजूला पडतील. डिजिटल व्यासपीठावर आगामी काळात दीड हजार बँकांना आणण्याचे उद्दिष्ट आहे. सरकारकडून नागरी सहकारी बँकांना व्यावसायिकदृष्ट्या सक्षम करण्याचे धोरण आहे. तसेच आरबीआयच्या आधुनिकीकरणासाठी पावले टाकली जात आहेत. गेल्या दोन वर्षांत नागरी सहकारी बँकांच्या बुडीत कर्जाचे एकत्रित प्रमाण २.८ वरुन ०.६ टक्के खाली आले आहे.



केंद्रीय सहकार मंत्री
अमित शाह

विकास दरात वाढ होत असताना नागरी सहकारी बँकांनी नागरिकांसाठी उपजीविकेचे मार्ग निर्माण करून द्यायला हवेत. तसेच युवक उद्योजक आणि आर्थिकदृष्ट्या मागास घटकांकडे या बँकांनी अधिक लक्ष द्यावे, अशी सूचना त्यांनी केली.

यशस्वी सहकारी पतसंस्थांचे रूपांतर नागरी सहकारी बँकेत करण्याचे काम पुढील काळात नॅफकबने करावे, अशी सूचना त्यांनी केली. नॅफकबचे मानद अध्यक्ष एच. के. पाटील यांनी मनोगतात बंद पडण्याच्या मार्गावर असणाऱ्या २० नागरी सहकारी बँकाबाबत चिंता व्यक्त केली. या बँकांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

## अमूल आणि इफको या जगातील आघाडीच्या सहकारी संस्था

**नवी दिल्ली** – अमूल आणि इफको या कंपन्या संपूर्ण जगातील आघाडीच्या सहकारी संस्था असून हे स्थान त्यांनी संपादन केले आहे इंटर नॅशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्स वर्ल्ड को-ऑपरेटिव्ह यादीत वरील संस्थांची क्रमवारी देण्यात आली आहे. अमूल प्रथम आणि इफको दुसऱ्या स्थानावर आहे.

IFFCO

अमूलने सामूहिक मालकीच्या भावनेने काम करीत शेतकऱ्यांचे जीवनमान बदलले आहे तर इफकोने खत उत्पादन, डिजिटल व्यासपीठ सुविधा, पर्यावरण रक्षण या माध्यमातून योगदान देत आहे. या कामगिरीची दखल घेत क्रमवारी करण्यात आली आहे. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी दोन्ही कंपन्यांचे अभिनंदन केले.

## सहकार क्षेत्राच्या बळावर मत्स्य व्यवसायाच्या क्षेत्रात क्रांती घडविण्याचा संकल्प

**मुंबई** – सहकार क्षेत्राच्या माध्यमातून दूध आणि साखर उद्योगाने देशामध्ये समृद्धी आणली आहे. त्याचप्रमाणे मत्स्य व्यवसायाच्या क्षेत्रात सहकार क्षेत्राच्या बळावर क्रांती घडविण्याचा संकल्प करण्यात आला आहे, असे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी सांगितले.

प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत खोल समुद्रातील मासेमारीसाठी उपयुक्त अशा दोन आधुनिक नौका सहकारी संस्थांना प्रदान करण्यात आल्या. त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आदी यावेळी उपस्थित होते. येथील जय मल्हार मत्स्य व्यवसाय विविध कार्यकारी संस्था पदाधिकाऱ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

केंद्रीय मंत्री शहा यांनी सांगितले की, यापुढील काळात किमान २०० नौका समुद्रात उतरविण्याचे उद्दिष्ट आहे. या नौका २५ दिवस खोल समुद्रात राहून २० टनापर्यंत मासे पकडतील. त्यातून मिळणारा नफा हा थेट मच्छीमार व्यावसायिक यांच्यापर्यंत जाणार



आहे. सहकारातून नफ्याचे योग्य असे वाटप होते. दूध, साखर, मत्स्य व्यवसाय असो नफा थेट कष्टकरी यांच्यापर्यंत पोचला पाहिजे. त्यामुळे प्रत्येक कुटुंब समृद्ध होऊन देश समृद्ध होण्यास हातभार लागणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, नील अर्थव्यवस्था क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर आहे. नवीन फिशिंग हार्बर, फिशिंग इकोसिस्टिम आणि आधुनिक नौका यामुळे राज्यातील मत्स्य उत्पादनात मागील काही वर्षांत तब्बल ४५ टक्के वाढ झाली आहे. पुढील पांच वर्षात महाराष्ट्र देशात प्रथम स्थानावर यावे, यासाठी व्यापक प्रयत्न सुरू आहेत. मत्स्य व्यवसाय मंत्री निलेश राणे यांनी मनोगत व्यक्त केले.



# सहकार भारती प्रदेशाध्यक्ष दत्ताराम चाळके समाजाभिमुख कार्यकर्ते - सतीश मराठे

**मुंबई –** अपना सहकारी बँकेच्या माध्यमातून समाजातील लहान घटकांकडे विशेष लक्ष देऊन त्यांच्यासाठी विशेष कर्ज योजना सुरू करण्यात आल्या. तसेच अनेकविध संस्थांना एकत्र करून त्यांच्यासाठी विविध योजना यशस्वीपणाने राबविणारे दत्ताराम चाळके हे समाजाभिमुख कार्यकर्ते आहेत, असे आरबीआय आणि नाबार्ड संचालक सतीश मराठे यांनी सांगितले.

सहकार भारतीचे प्रदेशाध्यक्ष आणि अपना सहकारी बँक अध्यक्ष दत्ताराम चाळके यांच्या अमृत महोत्सवी सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महामंत्री विवेक जुगादे, कॉसमॉस सहकारी बँक माजी अध्यक्ष मिलिंद काळे, ठाणे जनता सहकारी बँक अध्यक्ष शरद गांगल, महाराष्ट्र बँक्स फेडरेशन अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, तसेच विविध सहकारी बँक पदाधिकारी, संचालक उपस्थित होते.

**※ वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून जगामध्ये भारताची ओळख –**

देशाच्या अर्थव्यवस्थेबाबत बोलताना मराठे यांनी सांगितले की, वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून जगामध्ये भारताची ओळख आहे. तसेच भारताची सहकार चळवळ ही सर्वात मोठी आहे. तसेच देशाच्या विविध राज्यात साडे आठ लाखांपेक्षा अधिक सहकारी संस्था आहेत. या माध्यमातून ३० कोटींपेक्षा जास्त जनता सहकार क्षेत्राशी जोडली आहे. राज्य आणि जिल्हा बँका प्रभावीपणे काम करीत आहेत. राष्ट्रीय सहकार धोरणाबाबत ते म्हणाले, सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी धोरण उपयुक्त ठरणार आहे. यानुसार प्रत्येक राज्याचे स्वतंत्र सहकार धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे. काही महिन्यांपूर्वी त्रिभुवन सहकार विद्यापिठाची स्थापना करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या माध्यमातून प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे, असे त्यांनी सांगितले.

**※ सर्व सामान्य घटकांचे प्रश्न सोडविण्याचा यशस्वी प्रयत्न –**

सत्काराला उत्तर देताना चाळके यांनी सांगितले की, बँकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर काही बँकांचे विलीनीकरण करून घेण्यात आले, तर समाजातील सर्व सामान्य घटकांचे प्रश्न सोडविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. या प्रवासात अनेकांचा पाठिंबा मिळाला. सहकार भारतीच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात अभ्यास आणि काम करण्याची चांगली संधी मिळाली आहे.

प्रमुख पाहुणे काळे यांनी गौरवपर भाषणात सांगितले की, चांगला विचार, चांगली कृती आणि चांगली शक्ती म्हणजे आजचा सत्कार सोहळा आहे. सहकाराच्या माध्यमातून समाजपयोगी काम करीत आहेत. ठाणे जनता बँक अध्यक्ष गांगल म्हणाले, अपना सहकारी बँक नव्याने उभी करून शाखा विस्तार करण्यात चाळके यांनी मोलाची कामगिरी केली आहे. सहकार क्षेत्रातला एक आदर्श कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. जुगादे आणि ब्रम्हेचा यांनी प्रदेशाध्यक्ष चाळके यांच्या कार्याचा गौरव केला.

सुरूवातीला चाळके यांच्या वाटचालीचा आढावा घेणारा माहितीपट दाखविण्यात आला. मध्यवर्ती ग्राहक संस्था माजी अध्यक्ष उमेशचंद्र ठाकुर यांनी प्रास्ताविक व मुंबई महानगरपालिका शिक्षक संघटना सरचिटणीस राजेंद्र घाडगे यांनी आभार मानले.

## राज्याच्या सहकार धोरणात जिल्हा बँकांच्या सक्षमीकरणावर भर देणार

मुंबई – राज्यातील जिल्हा सहकारी बँकांची स्थिती समाधानकारक नसल्याने राज्याच्या सहकार धोरणात जिल्हा बँकांच्या सक्षमीकरणावर भर देण्यात यावा, यावर राज्य सहकार धोरण राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली.

राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. धोरण तयार करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती तयार करण्यात आली. समितीची बैठक नुकतीच झाली. विविध तज्ञ आणि अभ्यासक यांच्याकडून आलेल्या सूचनांचा विचार बैठकीमध्ये करण्यात आला. राज्यासाठीच्या धोरणाचा विचार करताना सहकार क्षेत्रातील विविध घटकांचा आणि संस्थांचा प्राधान्याने विचार करावा लागणार आहे.

## राज्याचे सहकार धोरण तयार करण्यासाठी समिती स्थापन

**मुंबई –** केंद्र सरकारने नुकतेच राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर केले आहे. या धोरणाशी सुसंगत असे राज्याचे सहकार धोरण तयार करण्यासाठी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. येत्या दोन महिन्यात समितीने अहवाल सादर करावा, असे सांगण्यात आले.

समितीमध्ये सहकार खात्याचे राज्यमंत्री तसेच सहकार विभागाचे सचिव, प्रधान सचिव सहकार आयुक्त, साखर आयुक्त, सहकार विभागाशी संबंधित विविध संस्था महासंघ आणि सहकार विभागातील तज्ञ यांचा समितीमध्ये समावेश असणार आहे.

# विकसित भारत, विकसित गोवा प्रत्यक्षात येण्यासाठी सहकाराच्या माध्यमातून सहकार भारतीने प्रयत्न करावेत - मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत





**गोवा पेडणे** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील विकसित भारत आणि विकसित गोवा २०३७ प्रत्यक्षात येण्यासाठी सहकाराच्या माध्यमातून सहकार भारतीने प्रयत्न करावेत. यासाठी गोवा सहकार क्षेत्रात युवक आणि महिला कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणावर समावेश करावा, अशी अपेक्षा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी व्यक्त केली आहे.

सहकार भारतीच्या वतीने गोव्याच्या आठव्या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. राज्यसभा खासदार सदानंद शेठ तानावडे, गोवा राज्य सहकारी बँक अध्यक्ष पांडुरंग कुट्टिकर, सहकार भारती राष्ट्रीय मंत्री दिलीप पाटील, तसेच गोवा अध्यक्ष अशोक गावडे, सचिव रघुवीर वस्त, अधिवेशन प्रमुख श्रीपाद परब आदी पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

ते म्हणाले, सहकार क्षेत्रात असलेल्या पळवाटा बंद करून सहकार क्षेत्राला नवी दिशा देण्यासाठी सहकार भारतीने आगामी काळात अधिक व्यापक स्तरावर कार्य करावे ज्यायोगे सहकार क्षेत्राचा सर्वसामान्य जनतेला फायदा होऊ शकेल. यासाठी गोवा सहकारी संघाच्या वतीने कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे, सहकारी संस्थांचे संगणकीकरण करणे, एक खिडकी योजना प्रत्यक्षात आणणे, सहकारी संस्थांना एका छताखाली आणणे, यांसारखी अनेक कामे करायची आहेत. तसेच या क्षेत्रात विश्वसनीय कामगिरी करून सर्वसामान्य जनतेचा विश्वास संपादन करणे, ही काळाची गरज आहे. गोव्याच्या सहकार क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी सहकार खाते प्रयत्नशील आहे, असे त्यांनी सांगितले.

सहकार भारती राष्ट्रीय मंत्री पाटील यांनी सांगितले की, सहकार हा देशाचा आत्मा आहे. सहकाराच्या माध्यमातून देशाची सर्वांगीण प्रगती करणे शक्य आहे. यासाठी समर्पित भावनेने कार्य करणारे संस्कारी कार्यकर्ते सहकार क्षेत्रात तयार झाले पाहिजेत. यासाठी देशातील प्रत्येक गावात सहकार भारतीचे जाळे तयार करण्याची गरज आहे. सहकाराच्या माध्यमातून ग्रामविकास करणे शक्य आहे.

खासदार तानावडे यांनी सांगितले की, सहकार भारतीच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात कार्य करणारे कार्यकर्ते संघटित होत आहेत, ही समाधानाची बाब आहे. या क्षेत्रात नि:स्वार्थपणे काम केल्यास संस्थांची प्रगती वेगाने होणे शक्य आहे. या क्षेत्रात बदल घडवून आणण्यासाठी सज्ज व्हायला हवे. विकसित भारत करण्यासाठी सहकार क्षेत्राला पर्याय नाही. या क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणे शक्य आहे, असे ते म्हणाले.

ग्रामीण भागाचा विकास, अर्थव्यवस्था सुधारणा तसेच आत्मनिर्भरता ही केवळ सहकार क्षेत्राच्या माध्यमातून यशस्वीपणाने करत येते, अशी भूमिका येथे आयोजित करण्यात आलेल्या आठव्या सहकार भारतीच्या परिषदेत एकमताने मांडण्यात आली. सहकार भारतीचे अधिवेशन येथे नुकतेच पार पडले. विना सहकार नही उद्धार ही परिषदेची मध्यवर्ती संकल्पना होती.

परिषदेला मुख्यमंत्री प्रमोद सावंत, खासदार सदानंद शेठ तानवडे, सहकार भारतीचे राष्ट्रीय सरचिटणीस दिलीप पाटील, अध्यक्ष अशोक गावडे, आणि अन्य पदाधिकारी व्यासपीठावर होते. परिषदेत सहकार क्षेत्राच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास, स्वावलंबन आणि सहकाराचे सक्षमीकरण आणि विस्तार यावर मुख्यत्त्वे भर देण्यात आला.





# राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था, अपार्टमेंटच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य : माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू



**गोवा –** राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटमधील सदस्यांच्या अनेकविध अडचणी दूर करण्यासाठी राज्याच्या नव्याने तयार करण्यात येणाऱ्या सहकार धोरणात काही बदल करण्याचा निर्णय झाला तर त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय सहकार धोरण सुधारणा समिती अध्यक्ष सुरेश प्रभू यांनी येथे सांगितले.



**सुरेश प्रभू**

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षनिमित्ताने राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. गोव्याचे सहकार मंत्री सुभाष शिरोडकर यांनी परिषदेचे उद्घाटन केले. यावेळी सहकार आयुक्त दीपक तावरे, गोवा सहकार आयुक्त आशुतोष आपटे, राज्य सहकारी गृहनिर्माण महासंघ अध्यक्ष सुहास पटवर्धन तसेच अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

प्रभू यांनी सांगितले की, राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर झाल्यानंतर सर्व राज्यांना राज्यासाठी सहकार धोरण तयार करण्यास संगितले आहे. त्यादृष्टीने संबंधित राज्यांनी सहकार धोरण तयार करण्यासाठी स्वतंत्र समिती तयार केली आहे. यासाठी राज्यांना आवश्यक सहकार्य देण्यात येणार आहे, असे ते म्हणाले. सहकार मंत्री शिरोडकर यांनी सांगितले की, महाराष्ट्र आणि गोवा या दोन राज्यांचे सहकार, सांस्कृतिक आणि अन्य क्षेत्रात जिव्हाळ्याचे आणि स्नेहाचे संबंध आहेत ग्रामीण भागातील मंडळीचे शहराकडे स्थलांतर कमी करण्यासाठी ग्रामीण भागाचा विकास करण्यावर अधिक भर दिला पाहिजे, यासाठी सहकार क्षेत्राचा विकास हाच एकमेव मार्ग आहे.

महासंघ अध्यक्ष पटवर्धन यांनी सांगितले की, सहकार क्षेत्राच्या माध्यमातून महिला आणि युवकांना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध करून त्यांना स्वावलंबी करण्यासाठी त्यांना बरोबर घेऊन जाण्याचा आमचा प्रयत्न आहे. यावेळी त्यांनी महासंघाच्या वाटचालीची आणि आगामी योजनांची माहिती सांगितली. तर सहकार आयुक्त तावरे, जिल्हा उपनिबंधक संजय राऊत यांनी मनोगते व्यक्त केली. नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडियाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सावित्री सिंग यांनी सहकार क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी सर्वांनी व्यापक प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

**※ सहकार क्षेत्राला आधुंनिक्तेची जोड हवी – दरेकर**

गृहनिर्माण क्षेत्रात सहकारी संस्थांची भूमिका महत्त्वाची असून महिला आणि युवक वर्ग मोठ्या प्रमाणावर सहकार क्षेत्राकडे वळत आहे. त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. राज्य शासनाच्या निर्णयामुळे स्वयंपुनर्विकास चळवळ व्यापक होत आहे, असे मत आमदार आणि राज्य गृहनिर्माण स्वयंपुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केले आहे. परिषदेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. दोन दिवसीय परिषदेत डिंम्ड कन्व्हेयन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

दरेकर यांनी सांगितले की, सहकार क्षेत्रातील काही मंडळी खासगीकरणाला प्राधान्य देत आहेत आणि दुसरीकडे सहकार क्षेत्राबाबत भाषणे द्यायची. सहकार क्षेत्रातले आर्थिक व्यवहार हे याच क्षेत्रात झाले पाहिजेत. यासाठी सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी सहकार क्षेत्राला आधुनिकतेची जोड देणे आवश्यक असून यामुळे हे क्षेत्र अधिक बळकट होणार आहे.

कॉसमॉस सहकारी बँक अध्यक्ष प्रल्हाद कोकरे म्हणाले की, देश आणि राज्याच्या आर्थिक विकासात सहकार क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांना कर्ज देत असतांना काही अडचणी येत आहेत. त्या दूर करण्याची गरज आहे. यावेळी डॉ. सागर वाडकर, डॉ. अच्युत गोडबोले यांनी मनोगत व्यक्त केले.

राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितले की, गृहनिर्माण संस्थेतील सदस्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस संचालक यांच्याबरोबर चर्चा करून विविध समस्यांवर तोडगा काढावा. संस्थेतील सर्व सदस्य समान असतात. संस्थेच्या हितासाठी वेळेवर देखभाल खर्च वेळेवर भरण्याची गरज आहे. सहकारांतर्गत सहकार जोपासण्याची गरज असून सहकार संस्कृती जपली पाहिजे.



# सहकार भारतीचे संस्थापक सरचिटणीस वसंतराव देवधर यांचे निधन

**पुणे –** सहकार भारतीचे संस्थापक सरचिटणीस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, जनसेवा सहकारी बँकेचे पहिले कार्यकारी संचालक आणि अनेक नागरी सहकारी बँकांचे सल्लागार, मार्गदर्शक वसंत नारायण देवधर (वय ९१) यांचे राहत्या घरी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे त्यांचे पुतणे भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते, पूर्व राष्ट्रीय सचिव सुनील देवधर, आनंद आणि विवेक देवधर आहेत.



महाराष्ट्रातील अनेक बँकांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण कार्यक्रम घेतले. महाराष्ट्राबरोबरच त्यांनी आसाममध्येदेखील नागरी बँक सुरू केली होती. संघाच्या घोष वादनामध्ये देखील त्यांचा विशेष हातखंडा होता. घोषाच्या भारतीय रचना बनवण्यात याव्यात यासाठी ते आग्रही होते. संघकार्य आणि सहकार चळवळीशी संबंधित असंख्य पुस्तके, अहवाल, जुने रेकॉर्ड त्यांनी जपून ठेवले होते. विविध सामाजिक संस्थांच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा होता.

**⁕ खासगी साखर कारखाना उभारणीत देवधर यांचा मोठा वाटा –**

सहकार भारतीचे संस्थापक सदस्य वसंतराव देवधर यांच्या निधनाने दुःख झाले. अशी भावना विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी व्यक्त केली आहे. ते म्हणाले, वसंतराव देवधर यांचा नॅचरल शुगरच्या उभारणीत व प्रामुख्याने महाराष्ट्रातील खासगी साखर कारखान्याच्या उभारणीमध्येसुद्धा सिंहाचा वाटा आहे. खाजगी साखर कारखान्यांना उभारणीसाठी व खेळते भांडवलासाठी नागरी सहकारी बँकांच्याकडून अर्थपुरवठा सुरू करण्यामध्ये वसंतराव यांचा सिंहाचा वाटा आहे.

महाराष्ट्रातील सुरुवातीच्या सर्व खासगी कारखान्यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी पूर्ती साखर कारखाना, नॅचरल शुगर, कै. गोपीनाथ मुंडे महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा छत्रपती संभाजी राजे साखर कारखाना, माजी मंत्री सुभाष देशमुख लोकमंगल साखर उद्योग समूह या व अशा सर्वच खासगी साखर कारखान्यांना महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याचा आग्रह देवधर यांनी सर्व सहकारी बँकांच्याकडे धरला. केवळ त्यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्रातील बहुतांशी सर्व खासगी साखर कारखाने नागरी सहकारी बँकांच्या अर्थसहाय्याने उभारलेले आहेत व त्यांच्या खेळत्या भांडवलाच्या गरजाही या बँकांच्यामार्फत भागवल्या जात आहेत.

साखर उद्योगाच्या मुक्त धोरणानंतर महाराष्ट्रात उभारण्यात आलेल्या खासगी साखर उद्योगाचे आर्थिक स्रोताचे जनक म्हणून देवधर यांचे नाव अजरामर राहील. साखर उद्योगाच्या व खासगी साखर उद्योगाच्या वतीने स्व. देवधर यांच्या मृतात्म्यास चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

# सहकार क्षेत्रात स्वकर्तृत्त्वाने ज्येष्ठ श्रेष्ठ कार्यकर्त्यांनी मापदंड तयार केले. त्यात वसंतराव अग्रभागी - रा.स्व. संघ माजी सरकार्यवाह भैयाजी जोशी

**पुणे –** सहकार क्षेत्रात स्वकर्तृत्त्वाने आणि चांगल्या कार्याने अनेक ज्येष्ठ श्रेष्ठ कार्यकर्त्यांनी मापदंड तयार केले आहेत. त्यामध्ये वसंतराव यांचे नाव अग्रभागी आहे अशा शब्दात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैयाजी जोशी यांनी स्व. वसंतराव देवधर यांच्याविषयीच्या भावना व्यक्त केल्या. सहकार भारतीचे संस्थापक सरचिटणीस, रा. स्व. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते जनसेवा सहकारी बँक पहिले संचालक आणि विविध नागरी सहकारी बँकांचे मार्गदर्शक वसंतराव देवधर यांचे नुकतेच निधन झाले. सहकार भारतीच्या वतीने आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यांना आदरांजली अर्पण करताना ते बोलत होते.

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी तसेच भाग्यलक्ष्मी सहकारी बँक, जळगाव जनता सहकारी बँक, जनसेवा सहकारी बँक, जनता सहकारी बँक, डोंबिवली नागरी सहकारी बँक यांच्याकडून आलेले शोकसंदेश सभेच्या सुरूवातीला वाचून दाखविण्यात आले.

सेवा भवनमधील स्व. मुकुंदराव पणशीकर प्रशिक्षण केंद्रात श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैयाजी जोशी, आरबीआय आणि नाबार्डचे संचालक व सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मराठे, स्व. वसंतराव यांचे पुतणे सुनील, आनंद, विवेक देवधर, श्रीनाथ म्हस्कोबा सहकारी साखर कारखाना अध्यक्ष पांडुरंग राऊत, जळगाव जनता सहकारी बँक संचालिका आरती हुजुरबाजार, जनता सहकारी बँक माजी अध्यक्ष अरविंद खळदकर, अभय माटे, सीए सुधीर पंडित, जनसेवा सहकारी बँक संचालक राजेंद्र वाल्हेकर, जेजेआयटीचे श्रीनिवास दीक्षित आणि तत्कालीन श्री सदुरू जंगली महाराज सहकारी बँकेचे शरद खांबे यांनी मनोगतामधून स्व. वसंतराव यांच्याविषयीच्या आठवणींना उजाळा दिला. सहकार सुगंध मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी यांनी सभेचे सूत्रसंचालन केले.

**⁕ सहकारात कामाचा ठसा उमटविला –** रा. स्व. संघाबाबत अनेक चुकीचे समज आहेत पण कामाच्या माध्यमातून ते दूर करण्याचे आणि समाज घडविण्याचे काम संघाने केले आहे. म्हणून संघात कशासाठी जायचे हे ज्यांना समजले आणि कार्यातून दाखवून दिले, ते वसंतराव होते असे नमूद करून ते म्हणाले, वसंतराव यांनी सहकार क्षेत्रातदेखील कामाचा ठसा उमटविला आहे. सर्वसामान्य जनतेचा सहकार क्षेत्रावरील विश्वास अधिक कसा वाढेल यासाठी ते प्रयत्नशील राहिले. सहकारातील आर्थिक क्षेत्रात कामाने त्यांनी आदर्श निर्माण केला आहे. त्याबरोबर या क्षेत्राच्या शुद्धीकरणासाठी कार्यरत राहिले.

**⁕ सहकार भारती विस्तार कार्यात मोठे योगदान –** सहकार भारतीचा विस्तार आणि संघटनात्मक कार्य यामध्ये वसंतराव यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे, असे नमूद करून मराठे यांनी सांगितले की, देशाच्या विविध भागात सहकार भारतीच्या विस्तार कार्यासाठी जाण्याची संधी मिळाली. त्याबरोबर सहकार क्षेत्राचा अभ्यास करता आला. विविध सहकारी संस्थांचे कामकाज जवळून समजून घेता आले. मुख्य म्हणजे खासगी साखर कारखान्यांच्या ऊभारणीत त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. त्याबरोबर आर्थिकदृष्ट्या अडचणीत असणारे कारखाने बाहेर काढण्याचे काम त्यांनी केले आहे.

सुनिल देवधर यांनी वसंतराव यांच्या विषयीच्या व्यक्तिगत जीवनातील विविध आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, सतत दुसऱ्यांसाठी कार्यरत

पुढील पानावर...

असणे हा त्यांचा स्वभाव होता. त्याबरोबर संगीत क्षेत्राची आवड त्यांनी जोपासली आणि रा. स्व. संघाच्या घोष पथकामधील वाद्यांमध्ये संगीत क्षेत्रातील भारतीय रागांचा समावेश असावा असा त्यांचा प्रयत्न असे. त्यांच्या जीवनावर आधारित पुस्तक लेखन करून जून २०२६ मध्ये त्याचे प्रकाशन करण्यात येणार आहे, असे ते म्हणाले.

*** खासगी कारखान्यांच्या उभारणीत योगदान –** राऊत यांनी सांगितले की, खासगी साखर कारखान्याच्या उभारणीत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यासाठी कर्ज पुरवठा उपलब्ध करून दिला. परिणामी गेल्या काही वर्षांत खासगी साखर कारखाने १३३ पर्यत वाढले आहेत. यातील बहुसंख्य साखर कारखान्यांना सहकारी बँकांनी कर्जाची उपलब्धता केली आहे.

वसंतराव यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेकविध पैलू माजी अध्यक्ष खळदकर यांनी उलगडून दाखविले. ते म्हणाले, मराठवाडा आणि विदर्भात सहकारी बँकांचे जाळे निर्माण व्हावे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यासाठी अनेकदा प्रवास केला आणि तो यशस्वी झाला. तर पंडित यांनी सांगितले की, भविष्याचा वेध घेण्याची त्यांची क्षमता होती. आणि सहकार तत्वाची विलक्षण जाण होती. अनेक संस्थांच्या उभारणीत त्यांचे मोलाचे योगदान आहे. वाल्हेकर म्हणाले की, शहराच्या पूर्व भागात बँकेच्या माध्यमातून संघ विचार पुढे नेला. अनेक सहकारी बँकांच्या उभारणीत त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. यावेळी अभय माटे आणि शरद खांबे यांनी आठवणी सांगितल्या.

वसंतराव यांच्या कार्याचा आढावा घेणारी चित्रफीत दाखविण्यात आली. सर्वांनी दोन मिनिटे स्तब्धता पाळून आदरांजली अर्पण केली. त्यानंतर सभेची सांगता झाली.

# सहकार क्षेत्रासाठीचे वसंतराव देवधर यांचे योगदान कार्यकर्त्यांना प्रेरणादायी




**नवी दिल्ली –** सहकार क्षेत्रासाठी वसंतराव देवधर यांनी समर्पण भावनेने दिलेले योगदान कार्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरणार आहे, अशी भावना सहकार भारतीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनील गुप्ता यांनी व्यक्त केली. सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री वसंतराव देवधर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना आदरांजली वाहण्यासाठी सहकार भारतीच्या वतीने सभेचे आयोजन मालविय भवन येथे करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

गुप्ता यांनी सांगितले की, वसंतराव यांच्या समवेत काम करण्याचे भाग्य लाभले. काम करताना त्यांच्याकडून अनेक गोष्टी शिकता आल्या. त्यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवून आगामी काळात कार्यकर्त्यांनी काम करावे असे आवाहन त्यांनी केले.

भारतीय जनता पक्षाचे माजी राष्ट्रीय सचिव सुनील देवधर यांनी सांगितले की, माझे काका वसंतराव यांनी एक आदर्श स्वयंसेवक या नात्याने काम केले आहे अनेक कार्यकर्त्यांना त्यांनी काम करण्यास प्रोत्साहन दिले. तसेच हडपसर भगत संघ शाखा सुरू करून युवकांना प्रेरणा दिली. त्यांनी सहकार भारती कार्याच्या प्रचारासाठी राज्याच्या विविध भागात तसेच देशाच्या विविध भागात विस्तारासाठी दौरे केले. सतत कार्यरत असणे हा त्यांचा स्थायीभाव होता. मुख्य म्हणजे सहकार क्षेत्रासाठी त्यांनी अतुलनीय असे योगदान दिले आहे. यावेळी सहकार भारतीच्या अन्य पदाधिकाऱ्यांनी भावना व्यक्त करून आदरांजली अर्पण केली.

# सहकार क्षेत्र विस्तारण्यासाठी वसंतरावांनी अथक प्रयत्न केले – डॉ. जोशी

**ठाणे –** सहकार भारतीच्या विद्यमान कार्यकर्त्यांकडून वसंतराव यांच्या खूप अपेक्षा होत्या. तसेच सहकार भारतीच्या मालकीचे कार्यालय म्हणजेच वास्तू असावी आणि काही ठराविक गंगाजळी असावी, ज्याच्या व्याजातून येणाऱ्या रकमेवर सहकार भारतीचे कार्य चालावे. अशी भूमिका वसंतराव देवधर यांनी बाळगली होती, असे सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी यांनी सांगितले. त्यांच्या सततच्या सांगण्याचा परिपाक महणून आज सहकार भारतीचे १४ ठिकाणी स्वतः च्या मालकीची कार्यालये कार्यरत आहेत.




सहकार भारती कोकण व मुंबई विभागाच्या वतीने स्व. वसंतराव नारायण देवधर यांच्या श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

वसंतराव यांचे पुतणे सुनिल देवधर, सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर, सहकार भारतीचे ज्येष्ठ कार्यकर्ते विष्णू बोबडे, सहकार भारती मुंबई विभाग अध्यक्ष राहुल पाटील, कल्याण जनता सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष रत्नाकर फाटक तसेच सहकार क्षेत्रातील विविध संस्थांमध्ये कार्यरत असणारे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

कार्यकर्ता आणि मी वेगळा नाही ही भूमिका मनात ठेवून वसंतराव यांनी सहकार भारतीचे काम सदैव पुढे नेले, अशी आठवण बोबडे यांनी सांगितली.


देशाच्या विविध भागात प्रवास करताना वसंतराव यांची विविध लोकांची भेट झाली. असे पाचपोर यांनी सांगितले. ते म्हणाले, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कार्यकर्त्यांनी काम करून सहकार भारतीचे जाळे देशभर विणले, याची प्रचीती येते.

सहकार क्षेत्र हे सक्षम, सकस आणि प्रामाणिक असले पाहिजे यावर वसंतराव यांचा भर होता. बँकेत संपर्क करून त्यांना आपलेसे करणे आणि त्यांना मार्गदर्शन करणे हे काम त्यांनी आवडीने केले, असे सुनिल देवधर यांनी सांगितले.

सहकार भारतीचे प्रदेश बँक प्रकोष्ठ प्रमुख शरद गांगल यांनी श्रद्धांजली सभेचे प्रास्ताविक केले तर कोकण विभाग सहप्रमुख विणा मोकाशी यांनी सूत्रसंचालन केले.

# सहकारी बँकांचे शुभचिंतक - स्व. वसंतराव देवधर

सन १९९९ साली सहकार भारतीचे काम प्रारंभ करण्यापूर्वीपासून स्व. वसंतराव देवधरांची ख्याती ऐकलेली होती. अनेक कार्यकर्ते सतीश मराठेंना सहकारी बँक स्थापन करण्याबाबत सल्ला विचारीत असत. मराठेही याबाबतीत स्वतः सल्ला देण्याऐवजी वसंतरावांचे नाव पुढे करीत असत. तसेच आवर्जून सांगत असत की, वसंतरावांनी आसामसारख्या दुर्गम प्रदेशातही बँक स्थापनेचे यशस्वी प्रयोग केलेले आहेत.



पुढे २००१ साली बडोद्याला सहकार भारतीच्या राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीमध्ये वसंतरावांची व माझी पहिल्यांदा भेट झाल्याचे स्मरणात आहे. अनेक विषयांवर बोलणे झाले. अर्थात, सर्व विषय सहकारातीलच होते. प्रथम भेटीमध्येच वसंतरावांचा आणि माझा सूर जुळला.

सन २००३ मध्ये सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाच्या महामंत्रिपदाचे दायित्व आल्यानंतर वसंतरावांचे खूप आपुलकीचे आणि जिव्हाळ्याचे बंध निर्माण झाले. वसंतराव सहजासहजी कुणाला पट्कन स्वीकारीत नाहीत, असे अनेक जणांनी सांगितले होते; मात्र अनुभव एकदम वेगळा होता. वसंतरावांनी मला स्वीकारण्यामागे कदाचित पूर्वपुण्याई असावी, असे सारखे वाटते.

महाराष्ट्रामधील नागरी सहकारी बँकांचा पूर्वेतिहास वसंतरावांना जवळजवळ मुखोद्गत होता. सहकारी बँकांच्या भवितव्याबद्दल देखील वसंतरावांची काही निश्चित अशी मते होती. या मतांशी वसंतराव नेहमीच ठाम होते. सहकार भारतीच्या रचनेमध्ये सहकार भारतीचे अन्य पद/दायित्त्व न स्वीकारता केवळ नागरी सहकारी बँकांच्या क्षेत्रामध्ये काम करावे, असे त्यांचे ठाम मत होते. महाराष्ट्रामध्ये होणाऱ्या नागरी सहकारी बँकांच्या संचालकांचा अभ्यास वर्ग असो, अथवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची बैठक असो, अशा सर्व कार्यक्रमांना मी आवर्जून उपस्थित राहावे, याबद्दल त्याचा विशेष आग्रह होता. नागरी सहकारी बँकांच्या जडणघडणीमध्ये वसंतरावांचा नेहमीच संबंध असल्याने या क्षेत्रातील अनेक चढ-उतार वसंतरावांनी प्रत्यक्ष अनुभवलेले होते. पुण्यातील जनसेवा बँकेच्या स्थापनेमध्ये मुख्य प्रवर्तक म्हणून काम केल्याचा त्यांना जसा सार्थ अभिमान होता. तसेच पिंपरी-चिंचवड परिसरातील सद्गुरू जंगली महाराज सहकारी बँकेचे ठाणे जनता सहकारी बँकेमध्ये विलीनीकरण करण्याबाबत पुढाकार घ्यावा लागल्याचे वैषम्यही आहे. मात्र ठेवीदारांच्या ठेवींच्या संरक्षणाच्या कारणासाठी विलीनीकरणाच्या प्रस्तावासाठी अनेक कार्यकर्त्यांची मानसिकता विकसित करण्याचे कामही वसंतरावांनी केले.

महाराष्ट्रातील साखर उद्योग, विशेषतः खासगी क्षेत्रातील साखर उद्योगाचा आणि महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकेचा फार जवळचा संबंध आहे. एकूणच साखर उद्योगामध्ये वारंवार चढ-उतार होत असतात व त्याचा दुष्परिणाम नागरी सहकारी बँकांवर होतो, याचे त्यांना अतीव दुःख होत असे. खासगी क्षेत्रातील साखर कारखान्यांनी साखर उत्पादनाबरोबरच इथेनॉल, सहवीजनिर्मिती, जैविक खतांचे उत्पादन अशा अनेक उपक्रमांच्या माध्यमातून साखर कारखान्यांना अडचणीत आणणाऱ्या परिस्थितीवर मात करावी, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केला.

वसंतरावांशी गप्पा मारणे हादेखील एक सुखद अनुभव होता. गप्पाष्टकामध्ये कोणतेही विषय वर्ज्य नसत. तसेच गप्पांमध्ये सहभागी होणाऱ्या कार्यकर्त्यांचा वयोगट हादेखील त्यांच्या मनमोकळ्या गप्पांमध्ये अडसर ठरत नसे. अनेक सहकाऱ्यांना वेगवेगळ्या सहकारी बँकांमध्ये वेगवेगळ्या पदांवर नोकरीसाठी शिफारस करणे हाही त्यांचा एक आवडता छंद होता. त्यांच्याबरोबर सहकारी बँकांमध्ये प्रवास करता अनेक बँकांमधील अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी केवळ स्वागत करत नसत, तर वसंतरावांमुळे बँकेमध्ये कार्यरत आहोत, असे अभिमानाने सांगताना अनुभवलेले होते. किंबहुना, सहकार भारतीसारख्या संघटनांनी सहकारी बँकांना उपयुक्त होतील अशा अधिकाऱ्यांचे एखादे पॅनल करावे व त्यामधून बँकांच्या आवश्यकतेप्रमाणे बँकांना कर्मचारी व अधिकाऱ्यांचा पुरवठा करावा, असे त्यांचे ठाम मत होते.

कोणत्याही संघटनेच्या यशस्वीतेमध्ये सातत्याने प्रवास आणि संपर्क हे दोन घटक नेहमीच कारणीभूत असतात. बाल्यावस्थेपासूनच त्यांना संघाचे बाळकडू मिळालेले होते. वसंतरावांचाही प्रवास आणि संपर्क या दोन्ही गोष्टी सर्वसामान्यांना थक्क करणाऱ्या होत्या. ज्या क्षेत्रामध्ये काम करू, त्या क्षेत्रावर आपला ठसा उमटला पाहिजे, यासाठी हवे तेवढे परिश्रम करण्याची त्यांची मानसिक तयारी होती. सातत्याने प्रवास करणे, कमीतकमी विश्रांती घेणे, मिळेल तो आहार घेणे, याबद्दल त्यांनी कधीही कोणाकडे तक्रार केल्याचे स्मरणात नाही. तारुण्यात वसंतराव संघाच्या घोषपथकात अग्रेसर होते. यामुळे त्यांच्या घरामध्ये अनेक घोषरचनांच्या ध्वनिफिती व्यवस्थित मांडून ठेवल्याचे पाहिले होते. अनेक दुर्मिळ भाषणांच्या ध्वनिफितीही त्यांनी अत्यंत नेटाने जपून ठेवल्या आहेत. अनेक बँकांचे गेल्या कित्येक वर्षांचे वार्षिक अहवाल त्यांनी परिश्रमपूर्वक संग्रहित करून ठेवलेले आहेत. त्यांची एकच अपेक्षा असते की, हा सर्व अमूल्य ठेवा यापुढेही कोणीतरी जतन करावा. विशेषतः सहकार भारतीने हे दायित्त्व स्वीकारावे, अशी त्यांची भूमिका होती.

वसंतरावांच्या सहस्रचंद्रदर्शन सोहळ्याचे सहकार भारती आणि देवधर कुटुंबियांनी भैयाजींच्या उपस्थितीमध्ये आयोजन केले होते. हा वसंतरावांच्या कारकिर्दीमधील कळसाध्याय होता, असेच म्हणावे लागेल. वयोमानानुसार वसंतरावांचा प्रवास आणि संपर्क यांमध्ये स्वाभाविकपणे खंड पडलेला असला तरी त्यांची उमेद मात्र कायम चिरतरुण होती. वसंतराव सहकार भारतीच्या स्थापनेपासून एक संस्थापक सदस्य म्हणून कार्यरत होते तरी ते एक संघशरण स्वयंसेवक होते.

*****



**डॉ. उदय जोशी,**
**राष्ट्रीय अध्यक्ष, सहकार भारती**
८८८८८ ८०६९०



# त्यागी व्यक्तिमत्त्व स्व. वसंतराव देवधर

सहकार भारतीचे संस्थापक सरचिटणीस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, जनसेवा सहकारी बँकेचे पहिले कार्यकारी संचालक आणि अनेक नागरी सहकारी बँकांचे सल्लागार, मार्गदर्शक वसंतराव नारायण देवधर यांचे नुकतेच निधन झाले.

साखर उद्योगाच्या मुक्त धोरणानंतर महाराष्ट्रात उभारण्यात आलेल्या खासगी साखर उद्योगाचे आर्थिक स्रोताचे जनक म्हणून वसंतराव यांचे नाव अजरामर राहील, यात मुळी शंका नाही.

स्व. वसंतराव यांचा जन्म पुण्यात झाला. ते तरुणपणी हडपसर येथील एका मागास वस्तीमध्ये आरएसएसची शाखा चालवण्यासाठी दररोज २० किमी सायकलने प्रवास करीत असत. नंतर त्यांनी त्याच स्वयंसेवकांसह जनसेवा सहकारी बँकेची स्थापना केली. महाराष्ट्रात २५ हून अधिक सहकारी बँकांच्या स्थापनेत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. एवढेच नाही तर काही नागरी सहकारी बँका काही कारणास्तव आर्थिक अडचणीत आल्या असता त्यांना त्यातून बाहेर काढण्याचे काम देखील वसंतरावांनी केले. संघाच्या विचारसरणीने प्रेरित होऊन स्वयंसेवकांनी चालवलेल्या सहकार भारती या गटाचे ते संस्थापक सरचिटणीस होते. संघाचा विस्तार करण्यासाठी त्यांनी देशभर अथक प्रवास केला. ईशान्येकडील भागात, गुवाहाटीमध्ये नागरिक बँकेच्या स्थापनेत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. वसंतरावांनी संघाच्या अनेक घोषणा लिहिल्या. अजातशत्रू वसंतराव त्यांच्या साध्या आणि समर्पित जीवनाने आणि निर्दोष चारित्र्याने ज्ञात होते. वयाची ८१ वर्षे ओलांडल्यानंतरही संपूर्ण महाराष्ट्रात संघटनाचे काम करीत होते.



पांडुरंग राऊत

**※ खाजगी कारखान्यांच्या उभारणीत अग्रभागी –**

वसंतराव यांचा श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना उभारणीत व प्रामुख्याने महाराष्ट्रातील खासगी साखर कारखानाच्या उभारणीमध्ये सिंहाचा वाटा राहिलेला आहे. खासगी साखर कारखान्यांना उभारणीसाठी व खेळते भांडवलासाठी नागरी सहकारी बँकांच्याकडून अर्थ पुरवठा सुरू करण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्रातील सुरुवातीच्या सर्व खासगी कारखान्यांना ज्यामध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचा पूर्ती साखर कारखाना, बी. बी. ठोंबरे यांचा नॅचरल शुगर, कै. गोपीनाथ मुंडे यांचे पनंगेश्वर, योगेश्वरी, राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा छत्रपती संभाजीराजे साखर कारखाना, माजी मंत्री सुभाष देशमुख यांचा लोकमंगल साखर उद्योग समूह या व अशा सर्वच खासगी साखर कारखान्यांना महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याचा आग्रह स्व. वसंतराव यांनी सर्व नागरी सहकारी बँकांच्याकडे धरला व केवळ त्यांच्या प्रयत्नातून आज महाराष्ट्रातील बहुतांशी सर्व खासगी साखर कारखाने उभारलेले आहेत. त्यांच्या खेळते भांडवलाच्या गरजाही बँकांच्या मार्फत भागवल्या जात आहेत.

**※ प्रशिक्षणावर भर –**

महाराष्ट्रातील अनेक बँकांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण कार्यक्रम घेतले. महाराष्ट्राबरोबरच त्यांनी आसाममध्ये नागरी बँक सुरू केली होती. संघाच्या घोष वादनामध्ये त्यांचा विशेष हातखंडा होता. घोषाच्या भारतीय रचना बनवण्यात याव्यात, यासाठी ते आग्रही होते. संघकार्य आणि सहकार चळवळीशी संबंधित असंख्य पुस्तके, जुने रेकॉर्ड त्यांनी जपून ठेवले होते. त्याचा उपयोग संबंधितांना होणार आहे. विविध सामाजिक संस्थांच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा होता.

वसंतराव देवधर यांचे माझ्या आयुष्यात अविस्मरणीय स्थान आहे. त्याची बरीच कारणे आहेत. माझ्या सारखा एक सामान्य माणूस सहकाऱ्यांना बरोबर घेऊन एक साखर कारखाना काढण्याचे धाडस करतो, याचा अर्थ माझ्या पाठीमागे बऱ्याच विधायक शक्ती व मोठी माणसं खंबीरपणे उभी होती. त्यापैकी स्व. वसंतराव देवधर व स्व. विजयराव कुलकर्णी हे अग्रस्थानी होते. त्या बळावर साखर कारखाना काढण्याचे धाडस केले, कारखाना मोठा केला, यशस्वीपणे चालवला.

**※ कारखान्याची वाटचाल –**

श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखान्याच्या स्थापनेपासूनचा इतिहास पहिला तर त्यामध्ये कै. वसंतराव देवधरांच्या अनेक आठवणी सांगण्या सारख्या आहेत. सुरूवातीला कारखाना कमीत कमी भांडवली गुंतवणुकीतून उभारायचे ठरले. त्यासाठी इतर कारखान्यांनी विस्तारवाढ करताना काढलेली मशिनरी वापरायचा निर्णय झाला. त्यासाठी साखर उद्योगातील जाणकार तंत्रज्ञांनी सहमती दर्शवली. कारण ती मशिनरी काढली नसती तर अजूनही बरीच वर्षे चालली असती. त्याप्रमाणे डी. पी. आर. तयार करण्यात आला व बँकेला सादर करण्यात आला. बँकेला हा प्रकार नवीनच होता. कारण बँक नवीन व्यवसाय सुरू करायला कर्ज देते पण जुन्या मशिनरी मधून कारखाना उभारणी हा विषय स्वीकारण्यास जड जात होता. अशा वेळी त्यांनी बँकेला सांगितले की, तंत्रज्ञांची संमती आहे, प्रोजेक्ट कमी खर्चात उभा राहात आहे, पांडुरंग राऊतांसारखे विश्वासार्ह संस्थापक आहेत. त्यांचा नागरी सहकारी बँकेतील संचालक व अध्यक्ष म्हणून काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यामुळे बँकेने या प्रकल्पाला अर्थसाहाय्य करायला हरकत नाही, हा सल्ला देणारे वसंतराव हे जनसेवा सहकारी बँकेचे प्रथम कार्यकारी संचालक राहिल्यामुळे त्यांनी जबाबदारीने दिलेला सल्ला बँकेने मान्य केला व अर्थसहाय्य केले. बँकेचे कार्यकारी संचालक असल्यापासून जवळून

पुढील पानावर...

संबंध आला होता. त्यांच्या कामकाजातील कौशल्यांचे अवलोकन केले होते. त्याचा बँकेचे संचालक व अध्यक्ष असताना खूप फायदा झाला.

जनसेवा बँकेने सहभागी कर्ज योजनेत अग्रणी बँक म्हणून भूमिका स्वीकारल्यानंतर या सहभाग योजनेत आता विविध बँकांना सहभागी करणे आवश्यक होते. यासाठी देवधर व विजयराव कुलकर्णी यांना घेऊन आमच्या एका प्रवर्तकाची स्कॉर्पिओ गाडी घेऊन बँक व कारखाना अधिकारी यांच्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील बऱ्याच नागरी सहकारी बँकांना भेटी दिल्या, भूमिका सांगितली. बऱ्यापैकी यश मिळत गेले. सहभागी बँकांनी आपआपल्या मर्यादेनुसार कर्जाचा सहभाग नोंदवला. त्यानुसार कारखान्याची उभारणी सुरूच राहिली. अशा रीतीने बँकेने इतर ७ ते ८ बँकांना बरोबर घेऊन सहभाग कर्ज योजना तयार केली.

पुढे काही बँकांचा अजूनही सहभाग वाढवणे आवश्यक होते. अशावेळी बँकेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी प्रेमचंद मेहता यांचेशी देवधर यांनी चर्चा केली व संगितले की, मुंबईतील नागरी सहकारी बँकांमधील बरेच अधिकारी तुमच्या परिचित आहेत, त्यांना कर्जपुरवठ्याची विनंती करू. सुदैवाने बँकांनी होकार दिला व कारखाना उभारणीच्या अंतिम टप्प्यातही आवश्यक कर्ज पुरवठा झाला. जनसेवा बँकेने अग्रणी बँकेची भूमिका स्वीकारली. कारखान्याने आतापर्यंत वाढवलेली क्षमता, उपपदार्थ प्रकल्प उभारणी, मशिनरी आधुनिकीकरण याकरिता लागणाऱ्या कर्जपुरवठ्याच्या बाबतीतही अखंडपणे निभावली आहे.

श्रीनाथ म्हस्कोबा कारखान्याची उभारणी सुरू असताना कारखान्यास स्वभांडवलाची उणीव भासू लागली, अशावेळी ही समस्या कै. वसंतराव यांचे समोर मांडली. त्यांनी सर्व दृष्टीने विचार केला व सुचवले की तुम्ही शेतकऱ्यांना शेअर्स घेण्यासाठी प्रवृत्त करा. कारण त्यांना त्यांचा ऊस गाळपास आणण्यास हक्काचा कारखाना राहील. कारण दौंड तालुक्याच्या पश्चिम भागात त्यावेळी एकही साखर कारखाना नव्हता. शेतकरी आपला ऊस गळीतास पाठवण्यासाठी चिंतीत असायचे. त्यांनी त्याच वेळी बँकेला सल्ला दिला की, ज्या शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या शेअर्स घेणे शक्य नाही, त्यांना बँकेने शेअर घेण्यासाठी कर्ज द्यावे. कारखाना वसुलीची हमी घेईल. त्याप्रमाणे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी शेअर्स खरेदी केले व कारखाना सुरू झाल्यावर त्यांच्या ऊस बिलातून रक्कम वसूल करण्यात आली. अशा प्रकारे उभारलेल्या स्वभांडवलामुळे कारखान्याची उभारणी जोमाने सुरू झाली व कारखाना सुरू झाला.

**❊ साखरेसाठी गोदामाची उपलब्धता –**

कारखाना सुरू झाल्यानंतर उत्पादित साखर साठवण्यासाठी गोडाऊनची आवश्यकता असते. गोडावून उभारणीसाठी तांत्रिक अडचण आली. कारण कारखान्याची सर्व जागा जनसेवा बँकेला तारण म्हणून दिलेली होती. गोडाऊन कर्ज सांगली अर्बन सहकारी बँकेकडून घ्यायचे होते. पण जागा तर बिगर तारणाची उपलब्ध नव्हती. त्यानंतर सांगली अर्बन बँकेचे बापूसाहेब पुजारी यांची आम्ही तिघांनी भेट घेतली. तुम्ही कारखान्याच्या संचालक मंडळापैकी खासगी मालकीची मालमत्ता तारण घ्यावी. बापूसाहेब पुजारींनी मान्यता दिली.

स्व. देवधर फक्त संस्था उभारणीस सल्ला, सहकार्य करत नव्हते तर ती संस्था व्यवस्थित सुरू होऊन चांगली चालेपर्यंत तिचे पालकत्व स्वीकारीत होते. कारखान्याचा चाचणी हंगाम सुरू होता. रात्रंदिवस कारखान्यावर थांबत होतो. एके दिवशी सकाळी देवधर अचानक कारखान्यावर त्यांच्या बजाज एम.८० स्कूटरवर पुण्याहून हजर झाले. कारण त्यांना अचानक भेट देऊन कामकाजाची पाहणी करायची होती. कारखान्यावर चाललेली लगबग, धावपळ पाहून त्यांना खात्री पटली की, हे लोक अत्यंत जिद्दीने कारखाना चालवीत आहेत. राऊत तुम्ही माझ्या परीक्षेत उतरला आहात.



तुम्ही हा कारखाना चांगला चालवून नावारूपास आणाल, याची मला खात्री पटली आहे. तुम्ही आता पुढील जबाबदारी सांभाळा. एखादी संस्था व्यवस्थित सुरू झाली की, ते पुन्हा तिकडे फिरकत नसत. कारण त्यानंतर ते पुन्हा दुसरी संस्था उभारणीच्या कामाला लागत असत. कै. देवधर अत्यंत निःस्पृह होते. ते कारखान्याने देऊ केलेली कोणतीही सवलत नम्रपणे नाकारीत असत.

खरं तर वसंतराव एक कर्मयोगी होते. त्यांनी निःस्पृहपणे केलेले कार्यच त्यांच्या आत्म्यास शांती देईल व स्वर्गाची कल्पना जर खरी असेल तर त्यांना स्वर्गात योग्य ठिकाणी सन्मानाची जागा मिळेल.

**– पांडुरंग आबाजी राऊत**
**अध्यक्ष व कार्यकारी संचालक,**
**श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि.**

*****

व्यापारी मित्र
अमृतपर्व
25 K वर्गणीदार

कर व व्यापारी विषयक कायद्यातील
क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत
माहितीसह आर्थिक गुंतवणूक,
आरोग्याविषयी माहिती देणारे
व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०
# व्यापारी मित्र

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा


Payment Getway link

भारतात कुठेही
निश्चित अंक मिळण्यासाठी
मॅगझीन पोस्टिंगसह वर्गणीदर

| ३ वर्षांसाठी | २ वर्षांसाठी | १ वर्षांसाठी |
|---|---|---|
| २९०० | २००० | १०५० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com

# खाजगी साखर कारखान्यांचे प्रणेते वसंतराव



स्व. वसंतराव देवधर, सहसंस्थापक सहकार भारती व खाजगी साखर कारखान्याचे आर्थिक शिल्पकार म्हणून त्यांची ओळख होती. त्यांचा परिचय सन १९९८-१९९९ मध्ये पहिल्यांदा झाला. वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यामध्ये कार्यकारी संचालक म्हणून कारखान्याचे उभारणी करत असताना त्या कारखान्याला काही अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव बँकेच्या नेतृत्त्वाखाली बैठक होती. त्या निमित्ताने देवधर वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे सल्लागार म्हणून बैठकीत उपस्थित राहायचे, तेव्हापासून त्यांचा स्नेह वाढत गेला. पुढे नॅचरल शुगर या महाराष्ट्रातील पहिल्या खासगी साखर कारखान्याचा प्रस्ताव तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने साखर उद्योगाचे डीलायसनिंग केल्याने मंजूर झाला आणि त्यानंतर या नॅचरल शुगर कारखान्याच्या आर्थिक जुळवाजुळवीमध्ये वसंतरावांचे मोलाचे योगदान राहिले.

**※ नॅचरल शुगरच्या उभारणीत महत्त्वपूर्ण भूमिका –**

संघ परिवारातील जवळपास २५ बँकांना भेटी देणे, त्यांच्या व्यवस्थापनाला आमच्या कारखान्यासाठी कर्ज देणे किती योग्य आहे व ते कर्ज कसे सुरक्षित राहील व त्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या अर्थकारणाला कशा पद्धतीने चालना मिळेल व अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांसाठी एक नवे कर्ज वितरणाचे दालन निर्माण होईल या सर्व बाबी त्यांनी अत्यंत कौशल्याने या सर्व २५ नागरी बँकांच्या व्यवस्थापनाला समजावल्या. त्यासाठी स्वतः वसंतराव यांनी अनेक बँकांना भेटीसाठी मुंबई, जळगाव, संभाजीनगर, परळी या ठिकाणी प्रवास केला आणि सन १९९९ मध्ये कारखान्यासाठी २५ बँकांचे कन्सोरसिएम करून आम्हास नऊ कोटी रुपयांचे दीर्घ मुदतीत कर्ज आणि २५ कोटी रुपयांचे खेळते भांडवली कर्ज या सर्व २५ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांनी मंजूर केले. नॅचरल शुगरच्या उभारणीमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग अत्यंत उत्स्फूर्तपणे मिळाला जवळपास दहा कोटी रुपयांचे भाग भांडवल जमा झाले. मात्र जवळपास एक वर्ष कुठलीही राष्ट्रीयीकृत अथवा अर्बन बँक अर्थसहाय्य करण्यास तयार नव्हती. कारण त्यावेळेस रिझर्व्ह बँकेची साखर उद्योगासाठी नकारात्मक भूमिका होती आणि त्यामुळे कोणतीही बँक सहजासहजी साखर उद्योगाला साखर कारखान्याला कर्ज देण्यास तयार होत नव्हती. अशा परिस्थितीमध्ये वसंतरावांनी संघपरिवारातील २५ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांना वरील प्रमाणे अर्थसहाय्य केले आणि त्यानंतर कारखान्याच्या उभारणीस खऱ्या अर्थाने गती मिळाली. कारखान्याच्या उभारणीमध्ये दर तीन-चार महिन्याला सर्व अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांच्या बैठका घेणे सर्वांना कन्डेन्स करणे व या सर्व बँकांच्याकडून कारखान्याच्या उभारणीच्या आवश्यकतेनुसार कर्ज पुरवठा उपलब्ध करून घेण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिला. केवळ त्यांच्या अत्यंत सकारात्मक पाठिंब्यामुळेच नॅचरल शुगरची उभारणी पूर्ण झाली आणि त्या माध्यमातून ग्रामीण अर्थकारणाला वेगळी दिशा देण्याचे काम त्यांनी केले.



बी. बी. ठोंबरे

महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने खाजगी क्षेत्रामध्ये किमान ३० साखर कारखाने उभे करण्याचे उद्दिष्ट कै. गोपीनाथराव मुंडे यांनी हाती घेतले व संघ विचाराच्या प्रवर्तकांना साखर कारखाना उभारणीसाठी प्रोत्साहित करण्याचे काम मुंडे यांच्या बरोबरच वसंतराव यांनी काम हाती घेतले. त्यामध्ये प्रामुख्याने केंद्रीय मंत्री गडकरी यांचा पूर्ती साखर कारखाना, राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा छत्रपती संभाजी राजे साखर कारखाना, माजी मंत्री सुभाष देशमुख यांचा लोकमंगल उद्योग समूह, गोपीनाथ मुंडे यांचे योगेश्वरी व पनंगेश्वर साखर कारखाने असे जवळपास २० ते २५ साखर कारखान्यांना वसंतराव यांच्या पुढाकाराने व त्यांच्या नेतृत्त्वाखाली स्थापन झालेल्या अनेक अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांच्या माध्यमातून अर्थ पुरवठा करण्यात आला व हे सर्व साखर कारखाने उभे राहिले.

**※ खाजगी कारखान्यांची संख्या वाढली –**

महाराष्ट्रामध्ये वाजपेयी सरकारच्या काळामध्ये साखर उद्योगाच्या डीलायसनिंगच्या निर्णयानंतर अर्बन बँकांच्या माध्यमातून खाजगी क्षेत्रातील साखर कारखाना उभारणीची संकल्पना मूर्त स्वरूपात आणण्याचे काम वसंतराव यांच्या नेतृत्वामुळेच होऊ शकले. महाराष्ट्रामध्ये खासगी क्षेत्रात व प्रामुख्याने अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांचे अर्थसहाय्य केलेले जवळपास ७५ साखर कारखाने कार्यान्वित आहेत व महाराष्ट्रातील खासगी क्षेत्रातील साखर कारखान्यांची संख्या १३३ च्या वर गेलेली असून महाराष्ट्रातील एकूण साखर उत्पादनाच्या ५० टक्के वाटा हा खासगी क्षेत्राचा आहे. एवढेच नव्हे तर राज्यातील इथेनॉल उत्पादनाच्या वाट्यामध्येही खासगी क्षेत्राचा वाटा ७५ टक्के पेक्षा जास्त आहे. या साखर उद्योगाबरोबरच इथेनॉल प्रकल्पाची निर्मिती या सर्व उद्योगांमध्ये जी भरभराट झालेली दिसते. त्याचा भक्कम पाया वसंतराव यांच्या अर्थनीतीमधूनच उभारला गेला. त्यामुळेच महाराष्ट्रामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यापासून ते साखर कारखानदारापर्यंत आर्थिक सुबुद्धतेचं एक नवे जग निर्माण झाले. त्याचबरोबर महाराष्ट्रातील अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांच्या कर्ज वितरणालासुद्धा एक वेगळा आयाम व नवीन संधी देण्याचे काम वसंतराव यांच्या माध्यमातून झाले.

**※ साखर कारखान्यांना अर्थसाहाय्य –**

नॅचरल शुगरला २५ कोटी कर्ज देण्याची झालेली सुरुवात महाराष्ट्रातील जवळपास ७५ साखर कारखान्याला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांच्या माध्यमातून दोन हजार कोटींच्या पुढे अर्थसाहाय्य करण्यात आलेला आहे. साखर कारखान्यांना कारखाना उभारणीसाठी व प्रामुख्याने साखरेच्या तारणावर / गोदामावर कर्ज देण्याची संकल्पना ही वसंतराव यांनी सर्व नागरी सहकारी बँकांच्या गळी उतरवली व ती यशस्वीपणे कार्यरत आहे. १०० टक्के शाश्वत व खात्रीशीर कर्जपुरवठा म्हणून या कर्जाकडे पाहिले जाते. त्यामध्ये कुठल्याही बँकेला कर्ज पुरवण्याची भीती नाही व आतापर्यंत असे कर्ज बुडण्याचे एकही प्रकरण साखर कारखान्यांच्या बाबतीत नागरी बँकांना अनुभवास आलेले नाही. त्यामुळे साखर उद्योग व प्रामुख्याने महाराष्ट्रातील खाजगी साखर उद्योगाचा भक्कम पाया उभा करण्यामध्ये वसंतराव देवधरांचा सिंहाचा वाटा आहेच पण त्याचबरोबर महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांना कर्ज पुरवठ्याचे एक नवे दालन उपलब्ध करून देणे व त्या माध्यमातून अर्बन कोऑपरेटिव्ह बँकांचीसुद्धा भरभराट होण्यासाठीची संधी निर्माण करण्याचे शिल्पकार म्हणून वसंतराव देवधरांचे नाव अग्रस्थानी राहील यात मुळी शंका नाही.

पुढील पानावर...

# सहकारातील निष्काम कर्मयोगी - वसंतराव देवधर

**सहकार भारतीचे संस्थापक सरचिटणीस आणि नागरी सहकारी बँकांचे ज्येष्ठ मार्गदर्शक वसंतराव नारायण देवधर यांनी सहकार, बँकिंग, साखर कारखाने आणि सामाजिक कार्यात तब्बल ९१ वर्षांच्या वाटचालीत लिलया भ्रमंती केली. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा घेतलेला मागोवा....**

'पुण्यातून सायकलवर हडपसरला जाणारा संघ स्वयंसेवक', अशी वसंतराव देवधर यांची पूर्वीची ओळख होती. बालपणापासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कामात वसंतराव सक्रिय होते. पुण्याच्या पूर्व भागात हडपसर, वानवडी, मुंढवा, कोंढवा अशा भागात संघशाखा सुरु करण्यात आणि त्यातून त्या भागात सामाजिक कार्याची घडी बसवण्यात वसंतरावांचे मोठे योगदान आहे. त्यातूनच सन १९७२ मध्ये हडपसर येथील जनसेवा सहकारी बँक स्थापन करण्यात ते अग्रणी होते. तेव्हापासूनच ते सहकार चळवळीत सक्रीय झाले.

जनसेवा सहकारी बँकेच्या जडणघडणीबरोबरच श्री सदगुरु जंगली महाराज सहकारी बँकेला (जी बँक नंतरच्या काळात टीजेएसबी सहकारी बँकेत विलिन झाली) उर्जितावस्था आणून तीच्या उत्कर्षासाठी त्यांनी अहोरात्र परिश्रम केले. आसाममध्ये गुवाहाटी येथे एका नागरी सह. बँकेची स्थापना करण्यात देखील त्यांचा मोठा पुढाकार होता. संस्था उभारणीत त्यांचा मोलाचा सहभाग असला तरी कोणताही मोह न बाळगता योग्य, नवीन आणि तरुण कार्यकर्त्यांच्या हाती त्या संस्थेचे सुकाणू सोपविण्याचे त्यांचे कसब आदर्शवतच म्हटले पाहिजे.

सहकारी चळवळीत एक सुसंघटित, सुसंस्कारित, अभ्यासू कार्यकर्त्यांची फळी निर्माण व्हावी, या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या 'सहकार भारती' या संस्थेच्या स्थापनेपासून पहिले सरचिटणीस म्हणून त्यांनी काम केले. अखेरपर्यंत त्यांनी सहकार भारतीच्या कार्यात विशेषत: प्रशिक्षणाच्या कामात स्वत:ला झोकून दिले होते.

**※ सहकारी बँकाच्या अडचणी सोडविण्यावर भर –** सहकार भारतीची स्थापना होण्यापूर्वीपासून सहकारी बँकांनी एकत्र येऊन आपल्या अडीअडचणी सोडवल्या पाहिजेत, या उद्देशाने वसंतरावांनी अहोरात्र मेहनत घेतली आहे. ते कोणत्याही कामात नेहमी अग्रेसर असत.सर्वांना एकत्र करून कामाच्या प्रकारांनुसार त्यांचा एक ग्रुप असावा आणि त्यातील सर्वांचेच संबंध मैत्रीपूर्ण असावेत, असा वसंतरावांचा अखेरपर्यंत जीवनक्रम होता. त्यांनी सहकार भारतीच्या कामासाठी संपूर्ण महाराष्ट्रच नव्हे, तर आसाम, पश्चिम बंगाल असाही अखंड प्रवास केला. प्रामुख्याने नागरी बँकांशी वसंतराव जोडलेले राहिले.

नागरी सहकारी बँकांविषयी त्यांना आत्मीयता वाटायची. अडचणीत असलेल्या बँकांमध्ये रोषदिग्दर्शन न करता, आहे त्या परिस्थितीतून मार्ग काढण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यामुळे सर्वांना ते हवेहवेसे वाटायचे. त्यांनी सहकारी बँकांमध्ये नवनवीन तंत्रज्ञान असावे, प्रशिक्षित कर्मचारी वर्ग असावा, संचालकदेखील प्रशिक्षित असावेत, असा कायम आग्रह धरला.

**※ साखर कारखान्यांचे आधारस्तंभ –** सहकारी बँका आणि साखर कारखाने यांच्या संयुक्त सहभाग कर्ज योजनेचे देखील ते आधारस्तंभ राहिले. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना विविध नागरी सहकारी बँकांना एकत्र आणून कोट्यवधी रुपयांचे अर्थसाहाय्य सहभाग कर्ज योजनेअंतर्गत त्यांनी मिळवून दिले होते. हे सर्व साखर कारखाने व्यवस्थित चालतील, सर्व सहभागी बँकांचे कर्ज व्याजासह परतफेड होईल, याकडे त्यांचे लक्ष असायचे. अडचणीत आलेल्या सहकारी बँकांना नेमकेपणाने मार्गदर्शन देऊन ते थांबत नसत, तर प्रत्यक्ष कृतीत ते उतरत असत. त्यांनी अनेक सहकारी बँकांचे प्रश्न मोठ्या शिताफीने हाताळले.

**※ सहकारी बँकांचे मार्गदर्शक, सल्लागार –** अनेक सहकारी बँकांचे मार्गदर्शक, सल्लागार म्हणून त्यांनी नि:स्वार्थपणे काम केले. विशेषतः खान्देश आणि मराठवाड्यातील नागरी सहकारी बँकांकडे त्यांचे खास लक्ष होते. जळगाव जनता सहकारी बँक, नांदेडची भाग्यलक्ष्मी महिला सह. बँक परळीची वैद्यनाथ सह. बँक, देवगिरी नागरी सह बँक, बीडच्या पूर्णवादी सह. बँक अशा अनेक बँकांना त्यांनी सातत्याने मार्गदर्शन केले. त्यांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे नागरी सहकारी बँकांच्या व्यावहारिक, कायदेशीर, तांत्रिक व व्यावसायिक अडचणींमध्ये अत्यंत कौशल्यपूर्ण मार्गदर्शन करीत राहणे. नागरी सहकारी बँकांचे एक चालतेबोलते विद्यापीठ म्हणून, एक अजातशत्रू असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते.

**※ वसंतराव म्हणजे सेवावृत्तीचा आदर्श –** सहकार चळवळीतील त्यांच्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल सहकार भारतीने त्यांना स्व. माधवराव तथा अण्णासाहेब गोडबोले स्मृती पुरस्कार देऊन गौरविले होते. याशिवाय सहकार मित्र, सहकार महर्षी, जीवनगौरव अशा विविध पुरस्कारांनी त्यांचा गौरव झाला होता. आपण स्वतः सामान्य राहून कोणताही बडेजावपणा न करता सतत कार्यरत राहणे, हेच वसंतरावांच्या जीवनाचे सार होते. 'असू आम्ही सुखाने पत्थर पायातील, मंदिर उभारणे हेच आमचे शील' या गीतपंक्तीत म्हटल्याप्रमाणे त्यांनी निरपेक्षपणे कार्य केले.

एक सेवावृत्तीचा आदर्श त्यांनी निर्माण केला. वसंतराव देवधर म्हणजे एक चालता बोलता सहकार कोश होते. सहकार क्षेत्रात सर्वत्र चांगुलपणा निर्माण करण्यात ते यशस्वी झाले. एका निष्काम कर्मयोग्याप्रमाणे त्यांचे जीवन सार्थकी लागले, असेच म्हणावे लागेल.

**– भालचंद्र कुलकर्णी**
**(संपादक, सहकार सुगंध)**
**मोबा. – ९८२२८ ८२५०९**

*****

**मागील पानावरून...**

※ ग्रामीण भागात उद्योग उभारणीवर भर –

वसंतराव देवधरांनी नागरी सहकारी बँकांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, व्यवस्थापनाला योग्य सल्ला देणे हे काम सहकार भारतीच्या माध्यमातून आयुष्यभर निष्काम सेवा म्हणून शेवटच्या श्वासापर्यंत करत राहिले. त्याचबरोबर महाराष्ट्रामध्ये संघ विचारांच्या प्रवर्तकाने जास्तीत जास्त ग्रामीण उद्योग उभे करावेत, प्रामुख्याने ग्रामीण अर्थकारणाचा कणा असलेल्या साखर उद्योगांमध्ये यावे यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. त्यांच्या विशेष प्रयत्नातूनच पांडुरंग राऊतांचा श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना असेल, राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा छत्रपती संभाजीराजे साखर कारखाना असेल या व अशा अनेक

## स्व. वसंतरावजी देवधर


संघ विचाराच्या व्यक्तींना साखर उद्योगांमध्ये आणण्याचे आणि त्यांचे साखर कारखाने यशस्वीपणे उभे करून चालवण्याचे सारे श्रेय वसंतराव देवधरांना जाते आणि म्हणून वसंतराव हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील खासगी साखर कारखान्याचे आर्थिक नियोजनाचे शिल्पकार व नागरी सहकारी बँकांचे मार्गदर्शक म्हणून अजरामर राहतील यात मुळीच शंका नाही. त्यांच्या मृत आत्म्यास चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

**– कृषिरत्न बी. बी. ठोंबरे**
**अध्यक्ष नॅचरल शुगर व अध्यक्ष विस्मा पुणे**
**मो. ९४२३० ७२६३३** *****

# सहकार भारती संस्थापक स्व.लक्ष्मणराव इनामदार स्मृति राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजन

**यवतमाळ –** आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने सहकार भारती संस्थापक स्व.लक्ष्मणराव इनामदार स्मृति राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी एकूण एक लाख रुपयांची बक्षिसे असणार आहेत आणि स्पर्धा चार गटात होणार आहे.

स्पर्धेसाठी शालेय विद्यार्थी ८ वी ते १० वी शब्द मर्यादा ३००, महाविद्यालयीन गट शब्द मर्यादा ४००, सहकार क्षेत्रातील कर्मचारी शब्द मर्यादा ६०० आणि खुला गट ८०० शब्द. प्रत्येक गटासाठी स्वतंत्र विषय असणार आहेत.



गट १ – शॉपिंग मोल आणि सहकारी तवावरील ग्राहक भांडार, माझे आवडते सहकार महर्षि, सहकाराचे महत्व.

गट २ – सहकार क्षेत्रात तरुणांचा सहभाग वाढण्याची गरज, सहकारात नवीन तंत्रज्ञानाची गरज, विकसित भारत २०४७ आणि सहकाराची भूमिका.

गट ३ – सहकारी बँकामधील अडचणी आणि उपाययोजना, भारतीय अर्थव्यवस्थेत सहकाराचे योगदान, स्व.लक्ष्मणराव इनामदार यांचे सहकार क्षेत्रातील योगदान.

गट ४ – ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकाराचे महत्व, सहकारातून राष्ट्राचा विकास आणि बिना संस्कार, नही सहकार, बिना सहकार नाही उद्धार.

निबंध हस्तलिखित असावा, तसेच मराठी, हिंदी, इंग्रजी अथवा संस्कृत भाषेत असावा, निबंधकाखाली व्यक्तीगत माहिती देण्यात यावी. निबंध ५ जानेवारी पर्यन्त यवतमाळ अर्बन बँक मुख्य कार्यालय एलआयसी चौक यवतमाळ येथे अथवा बँकेच्या नजीकच्या शाखेत पाठवावा.

# राष्ट्रीय सहकारी संस्थांमध्ये महाराष्ट्राचा सहभाग वाढला – केंद्रीय मंत्री मोहोळ

**नवी दिल्ली –** 'राष्ट्रीय सहकारी निर्यात लिमिटेड' (एनसीईएल), राष्ट्रीय सहकारी सेंद्रिय लिमिटेड' (एनसीओएल) आणि 'भारती बीज सुरक्षा व सेवा लिमिटेड (बीबीएसएसएल) या तीन महत्त्वाच्या राष्ट्रीय सहकारी संस्थांमध्ये महाराष्ट्राचा सहभाग वाढत असून, त्याचा थेट लाभ राज्यातील शेतकरी व सहकारी संस्थांना होत असल्याची माहिती सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी राज्यसभेत सांगितली.



केंद्रीय सहकार राज्यमंत्री
मुरलीधर मोहोळ

देशातील आठ लाख सहकारी समित्यांपैकी सव्वा दोन लाख समित्या महाराष्ट्रात आहेत. देशाच्या सहकार क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर आहे. एनसीईएल, एनसीओएल, बीबीएसएसएल या संस्थांच्या माध्यमातून महाराष्ट्रात मोठा विस्तार होत आहे. 'एनसीईएल' आणि 'एनसीओएल'मध्ये राज्यातील अनुक्रमे अकराशे आणि तीनशेहून अधिक सहकारी संस्था सामील असून, बीबीएसएसएलशी पाच हजारांहून अधिक संस्था जोडल्या गेल्या आहेत, असे ते म्हणाले.

● महत्त्वाचे मुद्दे – ✼ 'एनसीओएल'ने 'डॉ. पंजाबराव देशमुख कृषी मिशन'अंतर्गत ११ संस्थांसोबत सामंजस्य करार ✼ सेंद्रिय हरभरा, तूर आणि इतर कृषी उत्पादनांच्या खरेदीस चालना ✼ 'एनसीईएल' मार्फत सहकारी संस्थांकडून केळी, कांदा, हळद, डाळिंब आणि द्राक्ष यांसारख्या उत्पादनांची निर्यात ✼ 'बीबीएसएसएल'चे पारंपरिक बियाण्यांचे संरक्षण, संवर्धन आणि त्यांच्या प्रसारासाठी टिश्यू कल्चर प्रयोगशाळा उभारणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहकारातून समृद्धी या धोरणानुसार आणि गृह व सहकारमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्त्वात सहकार क्षेत्राला मजबूत आणि सक्षम करण्याच्या दृष्टीने सकारात्मक पावले उचलली जात आहेत. या बहुराज्य सोसायट्यांना सक्षम करत त्याचे सकारात्मक परिणाम गावपातळीवरील संस्थांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. राष्ट्रीय सहकारी संस्थांमुळे उत्पादनांना बाजारपेठ, निर्यात संधी, सेंद्रिय शेतीला चालना आणि स्थानिक बियाण्यांचे संरक्षण शक्य होत असल्याने शेतकऱ्यांना थेट फायदा होत आहे', अशी माहिती त्यांनी सांगितली.



# ठाणे भारत सहकारी बँकेची कोथरुड शाखेचे उद्घाटन

पुणे – ठाणे भारत सहकारी बँकेच्या कोथरूड येथील नवीन शाखेचे उद्घाटन खासदार मेधा कुलकर्णी यांच्या जसते नुकतेच झाले. यावेळी आरबीआय संचालक सतिश मराठे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बँकेच्या संचालक आणि शाखेतील कर्मचारी उपस्थित होते.

सन १९७९ साली स्थापन झालेली ठाणे भारत सहकारी बँक झपाट्याने कार्याचा आवाका वाढवत असून सध्या मुंबई, ठाणे,र ायगड व पुणे शहरात बँकेच्या ३० शाखा ग्राहकांच्या सेवेत कार्यरत आहेत. विविध सामाजिक उपक्रमांमधून बँक सामाजिक क्षेत्रातही कार्यरत आहे.

शाखा उद्घाटन सोहळ्याला बँकेचे अध्यक्ष उत्तम जोशी, उपाध्यक्ष डॉ. रवींद्रनाथ रणदिवे, संचालक मिलिंद गोखले, किरण वैद्य, सुहास मेहता, संचालिका सी.ए. स्वाती गोखले, सी.ए. शिल्पा अय्यर तसेच संचालक मंडळाचे अन्य सदस्य, बँक पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# साखर संकुल परिसरात लवकरच केंद्रीय निबंधक क्षेत्रीय कार्यालय सुरु होणार

**पुणे –** येथील साखर संकुल परिसरात लवकरच केंद्रीय निबंधक क्षेत्रीय कार्यालय सुरू करण्यात येणार आहे. सहकार संकुल या प्रस्तावित प्रशासकीय इमारतीचा आराखडा तसेच आवश्यक सुविधा आणि कामाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सहकार विभागाला सूचना दिल्या आहेत.

या नूतन इमारतीमध्ये तीन मजले वाढविण्याचा आणि त्यातील एक मजला हा केंद्रीय सहकार विभागाला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. साधारणपणाने येत्या दोन तीन वर्षांत नूतन सहकार संकुल उभे राहणार आहे. मध्यवर्ती इमारतीमधील सहकार आयुक्तालय येथे स्थलांतरित करण्यात येणार आहे. तसेच सहकार विभागाची आणि महत्त्वाची कार्यालये या ठिकाणी येणार आहेत.

राज्य आणि केंद्र सरकारचे सहकार विभागाचे कार्यालय एकाच ठिकाणी सुरू होणार असल्याने सहकार धोरण ठरविणे, तसेच सहकार विषयक कामात सुसंगती येणे शक्य होणार आहे. केंद्रिय सहकार मंत्री अमित शहा यांनी याबाबतची घोषणा येथे केली होती.

## विखे पाटील सहकार अध्यासन आयोजित ७२ वा सहकार सप्ताह उत्साहात साजरा




पुणे – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकार अध्यसनाच्या वतीने ७२वा सहकार सप्ताह विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. सप्ताहाचे उद्घाटन विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्रसेनजित फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डी. बी. पवार अधिसभा सदस्य कृष्णा भंडलकर, प्रा. अनिल कारंजकर आदी यावेळी उपस्थित होते. प्रा. कारंजकर यांनी देशातील सहकार सुरू होण्याची कारणे, सहकाराचा विकास आणि सहकारातून समृद्धी यावर भाष्य करताना सहसकाराच्या क्षेत्रात माहिलांचा सहभाग वाढावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

सावित्रीबाई फुले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथील विद्यार्थिनी कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या. त्यांच्यासाठी प्रश्नमंजूषा आणि निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

## सहकार भारतीचे ज्येष्ठ संघटक प्रा. आबासाहेब देशपांडे यांचे निधन



**परभणी** – सहकार भारतीचे आधारस्तंभ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक प्रा. धुंडीराज उर्फ आबासाहेब नागोराव देशपांडे यांचे नुकतेच निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षांचे होते. प्रा. देशपांडे हे श्री शिवाजी महाविद्यालयातून विज्ञानाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. तेथून ते सेवानिवृत्त झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते लहानपणापासून स्वयंसेवक होते.जिल्हा कार्यवाह, विभागीय कार्यवाह म्हणून देशपांडे यांनी दायित्त्व सांभाळले होते. आणीबाणीच्या काळात ते नाशिक येथील कारागृहात १८ महिने बंदिस्त होते. संघ परिवारातील सहकार भारती या संघटनेचे ते क्षेत्रीय संघटनमंत्री म्हणून कार्यरत होते. सहकार क्षेत्रातील नामवंत जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्थाचे ते संस्थापक सदस्य, अध्यक्ष होते. प्रा. देशपांडे यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून जावई नातवंडे असा परिवार आहे.

## सहकार सुगंध प्रतिनिधी बी. एम. कुलकर्णी यांचे निधन



धुळे – सहकार सुगंधचे ज्येष्ठ प्रतिनिधी आणि सहकार भारती, धुळे महानगरचे ज्येष्ठ कार्यकर्ते, भारतीय मजदूर संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते भानुदास तथा बी. एम. कुलकर्णी यांचे नुकतेच धुळे येथे रुग्णालयात निधन झाले. एक चांगला कार्यकर्ता गेला. त्यांनी भारतीय विचार साधना पुस्तक विक्री केंद्रदेखील अनेक वर्षे चालवले होते. धुळे, नंदुरबार परिसरात सहकार सुगंध वाढवण्यात त्यांचा मोठा हातभार होता.

## सहकार भारती, मुंबई विभाग आयोजित अभ्यास वर्गात विविध विषयांवर चर्चा

**मुंबई** – सहकार भारती, मुंबई विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अभ्यास वर्गामध्ये सहभागी झालेल्या प्रतीनिधींना प्रदेश सहकार भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. सहकार भारती प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके यांच्या हस्ते अभयास वर्गाचे उद्घाटन करण्यात आले.

महामंत्री विवेक जुगादे, संघटन प्रमुख शरद जाधव, सहसंघटक प्रमुख प्रवीण बुलाख यांसह महाराष्ट्रातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. मुंबई विभागाचे अध्यक्ष राहुल पाटील, संघटन प्रमुख संतोष सुर्वे, सहसंघटन प्रमुख जगदीश लाड, वंजारी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व उद्घाटन करण्यात आले. पाटील यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले.

चाळके यांनी सहकार स्थापनेचे महत्त्व व सहकार घोषवाक्याचा उल्लेख करून अभ्यास वर्गाच्या आयोजनामागची भूमिका मांडली. सहकार भारतीची देशभरातील वाटचाल, उपक्रम आणि समाज कल्याणातील योगदान त्यांनी स्पष्ट केले. आयकराच्या मुद्द्यांवर मार्गदर्शन करत, भारत आणि विदेशातील सहकार क्षेत्राची ताकद 'अमूल'च्या उदाहरणातून अधोरेखित केली. जुगादे यांनी सहकार भारती काल-आज-उद्या' आणि सहकार चळवळीचा प्रवास स्पष्ट केला. सहकार भारतीची स्थापना, संस्कार व उद्धार हे दोन मुख्य आधारस्तंभ स्व. लक्ष्मणराव इनामदारांच्या कार्याचा उल्लेख केला. बुलाख यांचे 'कार्यकर्त्यांची जबाबदारी' विषयावर मार्गदर्शन, कार्यकर्त्यांना कार्याचे ज्ञान, टिपण-डायरी, नियमित बैठक व सामूहिक निर्णय, गृहसंपर्क, प्रत्यक्ष भेटी, मासिक बैठक नियोजनाद्वारे संघटन बळकटी, पटसंख्या वाढ व आयामांची कार्यकर्ते माहिती असणे आवश्यक असल्याचे सांगितले.

संतोष सुर्वे यांचे 'पंचपरिवर्तन' विषयावरील मार्गदर्शन, दिवाकर कोयंडे यांनी सदस्य नोंदणी, भरत चिंचोले यांनी संस्था नोंदणी संस्था नोंदणीची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितली. पाटील यांनी कार्यक्रम, उपक्रम व भवन निधी मार्गदर्शन आणि मुंबईसाठी को-ऑपरेटिव्ह एक्सलन्स सेंटर उभे करण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडे प्रस्ताव देण्यात यावा व असा ठराव केला. जाधव यांनी कार्यकर्ता शोध व अभ्यास वर्ग उपलब्धता यावर भाष्य केले. सूत्रसंचालन तानाजी गुजर आणि नितीन पवार यांनी केले. अभ्यासवर्गास सहकार भारतीचे आठही जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, महामंत्री, संघटन प्रमुख तसेच सर्व जिल्ह्यांचे कार्यकर्ते उपस्थित होते. शुभांगी सारंग यांनी आभार मानले.

## सहकार चळवळ अधिक बळकट होण्यासाठी व्यवहारात पारदर्शकता आवश्यक

**सोलापूर** – राज्याच्या आर्थिक जडण घडणीत सहकार क्षेत्राचा मोठा वाटा असून सहकार चळवळ अधिक बळकट होण्यासाठी व्यवहारात पारदर्शकता असणे आवश्यक आहे, असे जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघाचे अध्यक्ष दिलीप पतंगे यांनी सांगितले. सहकार सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

महासंघाचे पदाधिकारी अधिकारी यावेळी उपस्थित होते. ते म्हणाले, सध्याच्या स्थितीमध्ये सर्व व्यवहार शिस्त आणि विश्वासार्ह होण्यासाठी डिजिटलायझेशनला पर्याय नाही. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा अनिवार्य आहे. सहकार क्षेत्रातील विविध समस्या सोडविण्यासाठी पदाधिकारी आणि



कार्यकर्ते प्रयत्न करीत आहेत. यामुळे पुढील काळात सहकार चळवळीला सकारात्मक बदल आणि चांगले दिवस येतील. या क्षेत्राला जोपासण्यासाठी मुळात सहकार क्षेत्र जोपासणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

# सारस अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी अध्यक्षपदी भालचंद्र कुलकर्णी



**पुणे** – सहकार भारतीचे राष्ट्रीय प्रकाशन प्रमुख आणि सहकार सुगंध मासिकाचे संपादक तसेच सहकार भारती सहकार प्रशिक्षण संस्था संचालक आणि बँकिंग तज्ञ भालचंद्र कुलकर्णी यांची नुकतीच सारस अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

संस्थेच्या संचालक मंडळाची नुकतीच बैठक झाली. त्यामध्ये अध्यक्षपदासाठी एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी उदय धुमाळ यांनी कुलकर्णी यांची निवड जाहीर केली. संस्थेचे उपाध्यक्ष नितिन जरांडे यांनी नूतन अध्यक्ष कुलकर्णी यांचा सत्कार केला.

संस्थेच्या ३ शाखा असून सदस्य संख्या १५ हजारपेक्षा अधिक आहे. सुमारे ७० कोटींचा मिश्र व्यवसाय आहे. नूतन अध्यक्ष कुलकर्णी यांनी सांगितले की, सर्व संचालकांनी जोमाने काम करून संस्थेचा सर्वांगीण विकास करण्याबरोबर व्यवसाय वाढीसाठी सामूहिक प्रयत्न करावेत. तसेच सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेण्यात येतील.

# सहकार विभागाच्या सर्व सुविधा नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध होणार

**पुणे** – सहकार विषयक धोरण तयार करण्यासाठी राज्य शासनाने समिती नियुक्त करण्याबरोबर सहकार क्षेत्राचा विस्तार होण्यासाठी विविध क्षेत्रांचा समावेश करण्यात येणार आहे. याबाबत राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. तसेच सहकार विभागाच्या सर्व सुविधा नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या सुविधांमुळे नागरिकांना ऑनलाईनच्या माध्यमातून अधिक कामकाज करणे शक्य होणार आहे.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सहकार धोरणातील विविध शिफारसींचा अभ्यास करून राज्याच्या दृष्टीने नवीन सहकार धोरण करण्यासाठी राज्य शासनाने याआधी एक समिती तयार केली होती. त्यामध्ये १७ सदस्य होते. मात्र नव्याने तयार करण्यात आलेल्या समितीमध्ये ३२ सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष असून राज्य शासनाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. आगामी काळातील सहकार क्षेत्रासमोरील विविध आव्हाने आणि त्यावरील उपाययोजना याचा अभ्यास करण्यासाठी समिती सदस्य संख्या वाढविण्यात येणार आली आहे. यासाठी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करण्यात आली आहे.

नवीन समितीमध्ये सहकारातील विविध घटकांमधील तज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. ही नवीन समिती दोन महिन्यांच्या कालावधीत अभ्यास करून अहवाल सादर करणार आहे.

# पंढरपूर अर्बन बँकेचा स्थापना दिवस उत्साहात साजरा



**पंढरपूर** – पंढरपूर अर्बन बँकेचा ११४ वा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात व पार पडला. आद्य संस्थापकांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. परमात्मा पांडुरंग व लक्ष्मी मातेचे पूजन करण्यात आले. सहकार भारती संस्थापक स्व. लक्ष्मण इनामदार व स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या प्रतिमेस पुष्पहार बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे अर्पण करण्यात आला.

प्रमुख उपस्थिती म्हणून कुटुंबप्रमुख मार्गदर्शक प्रशांत परिचारक यांनी बँकेच्या इतिहासाची गौरव गाथा मांडली व व्यवसाय विस्तार कसा केला याची माहिती सांगितली. मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे यांनी उपस्थित ग्राहकांचे व पाहुण्यांचे आभार मानले. विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय संघटन मंत्री दादा वेदक यांनी भेट देऊन बँकेचे कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. बँकेने शाखा विस्तार करीत २०० वर्ष पूर्ण करावीत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

उपाध्यक्ष माधुरी जोशी, संचालक रजनीश कवठेकर, हरिष ताठे, पांडुरंग घंटी, शांताराम कुलकर्णी, विनायक हरिदास, राजाराम परिचारक, अमित मांगले, अनंत कटप, गणेश शिंगण, ऋषिकेश उत्पात, व्यंकटेश कौलवार, मनोज सुरवसे, अनिल अभंगराव, गजेंद्र माने, तज्ञ संचालक अतुल कौलवार, प्रभुलिंग भिंगे, उदय उत्पात, सोमनाथ होरणे, शुभम लाड, संचालिका संगिता पाटील आदी होते.

# राजर्षी शाहू सहकारी बँकेच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीस ११ लाखांचा धनादेश

**पुणे** – सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून येथील राजर्षी शाहू सहकारी बँकेच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीस अकरा लाख रुपयांचा धनादेश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे प्रदान केला. बँक अध्यक्ष शांताराम धनकवडे, उपाध्यक्ष कमल व्यवहारे, मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब डोईफोडे तसेच संचालक मंडळ सदस्य अधिकारी उपस्थित होते. यावेळी 'डिजी बुलेटिन' अंकाचे प्रकाशन झाले.

# नागपूर नागरिक सहकारी बँकेचा मोबाईल बँकिंग सुविधेचा प्रारंभ

**नागपूर** – नागपूर नागरिक सहकारी बँकेच्या वतीने नुकताच मोबाईल बँकिंग सुविधेचा प्रारंभ करण्यात आला. हा बँकेच्या डिजिटल वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या नवीन सुविधेच्या माध्यमातून बँकेच्या ग्राहकांना बँकेच्या विविध सेवा पुरविण्यात येणार आहेत, अशी माहिती बँक अध्यक्ष संजय भेंडे यांनी सांगितली.



बँकेची स्थापना २० जून १९६२ रोजी झाली. महाराष्ट्रासह मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्यात बँकेच्या ४५ शाखा कार्यरत आहेत. तसेच काही बँकांचे विलीनीकरण बँकेत करण्यात येणार आहे. बँकेची आर्थिक स्थिती बळकट असून नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेने ३७७७.७८ कोटी इतका असून त्यामध्ये सतत वाढ होत आहे. याखेरीज सुवर्ण तारण कर्ज योजना तसेच वाहन कर्जे आणि गृह कर्जे मंजूर करण्यात आली आहेत. बँकेच्या वतीने सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून विविध सामाजिक संस्थांना रुग्णवाहिका प्रदान करण्यात आल्या आहेत. बँकेच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती त्यांनी सांगितली. यावेळी उपाध्यक्ष अशोक अग्रवाल, संचालक तुषार कांती डबले, गिरीश व्यास, डॉ. सुरेश चांडक, गौरव जाजू उपस्थित होते.

# सहकार भारतीच्या माध्यमातून सहकाराला नवी दिशा - डॉ. भोयर



**यवतमाळ** – सहकार भारती यवतमाळ जिल्ह्याच्या वतीने सहकार मेळाव्याअंतर्गत नवीन सहकार धोरणावर चर्चा व संवाद कार्यक्रम झाला. सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री व राज्य सहकार धोरण उच्चस्तरीय समितीचे सदस्य विवेक जुगादे यांनी मार्गदर्शन केले.

सहकार भारतीच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करून डॉ. भोयर म्हणाले. सहकार भारतीच्या माध्यमातून सहकार क्षेत्राला नवी दिशा व गती प्राप्त होत आहे सहकार क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी मिळून अधिक प्रयत्नशील होण्याची आवश्यकता आहे. जुगादे म्हणाले की, नवीन सहकार धोरण हे लोकसहभागातून बनवायचे आहे. धोरण बनवताना सहकार भारती महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये अशा चर्चासत्राचे आयोजन करून चांगल्या व मौलिक सूचना मागविणार आहे.

यवतमाळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे, माजी अध्यक्ष अजय मुंधडा, संचालक प्रफुल्ल चव्हाण, प्रदेश प्रकोष्ठ प्रमुख संजीवकुमार जोशी, विभाग प्रमुख अमित भिसे, जिल्हा अध्यक्ष श्याम कुमार लोखंडे, जिल्हा पदाधिकारी राम साकळे, अजय दंदे, अतुल वाकोडे उपस्थित होते. विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी व सहकार क्षेत्रात कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहकारातून आर्थिक प्रगती करून ग्रामीण भागात सुबत्ता आणणे शक्य

**यवतमाळ** – सहकारातून रोजगार उपलब्ध करणे सरकारचे प्राथमिक धोरण आहे. यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करणार आहे. देशातील सहकार क्षेत्रात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे. सहकारातून आर्थिक प्रगती होऊन ग्रामीण भागात सुबत्ता आणू शकतो, असे सहकार राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष व ७२ व्या राष्ट्रीय सहकार सप्ताह निमित्त 'नवीन सहकार धोरण अपेक्षा' याबद्दलची चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. उद्घाटक आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके मंत्री सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर सहकार भारती प्रदेश महामंत्री विवेक जुगादे माजी राज्यमंत्री मदन येरावार, प्रफुल्ल चव्हाण यवतमाळ अर्बन बँक संचालक प्रदेश कार्यकारणी सदस्य, अजय मुंदडा ग्रामीण प्रकोष्ठ सहप्रमुख संजय जोशी अमरावती विभाग प्रमुख, अमित भिसे, जिल्हाध्यक्ष श्यामकुमार लोखंडे अतुल वाकोडे आणि जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भारत माता प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलनाने झाली. ते म्हणाले, सहकार क्षेत्रातील कर्मचारी अधिकारी व संचालक यांनी सहकार क्षेत्रातील प्रश्न माझ्याकडे घेऊन यावे हे सोडविण्यासाठी सक्षम आहे. जुगादे म्हणाले की, भारतात सहा लाख पेक्षा जास्त सहकारी संस्था आहेत. सुमारे ४० कोटी जनता सहकार क्षेत्रात जोडली आहे. दोन लाख सहकारी संस्था एकट्या महाराष्ट्रात आहे सहा कोटी पेक्षा जास्त लोकांचा व्यवहार सहकाराच्या माध्यमातून होतो देशात महाराष्ट्र सहकार क्षेत्रात क्रमांक एकवर आहे. कारण पश्चिम महाराष्ट्र सहकारात रुजलेला आहे प्रत्येक संस्था आणि साखर कारखाने, सूतगिरण्या, कापड गिरण्या, धान्य गोदाम, खाद्यतेल घाणे, मच्छीमार संस्था, दुग्ध सहकारी संस्था, शेळी पालन संस्था बचत गटातील स्वयंरोजगार संस्था यांच्या माध्यमातून रोज व्यवहार करण्यात येतात.

उद्घाटक उईके यांनी सांगितले की, आदिवासी विकास खात्याला मिळणारा निधी सहकार क्षेत्राच्या माध्यमातून आदिवासी विकास जोडण्यास वापरता येईल. तुमच्या अश्या विकास योजनांना मदत करू शकतो याबाबत सर्वांनी विचार करा असे संबोधले. सहकार भारती ग्रामीण प्रकोष्ठ व विकास सोसायटी माध्यमातून अशा जनतेला मुख्य प्रवाहात आणण्यास सहकार भारती दुवा ठरू शकते. त्यासाठी प्रशिक्षक म्हणून काम करावे ही सूचना केली. यवतमाळमधील सहकारी बँक व पतसंस्था पदाधिकारी उपस्थित होते.



## पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेच्या आष्टी शाखेचे स्थलांतर

**बीड –** पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेच्या आष्टी जागेचे उद्‌घाटन बँकेचे ज्येष्ठ संचालक तथा मार्गदर्शक डॉ. निरंतर यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यावेळी माजी आमदार साहेबराव नाना दरेकर, देविदास आबा धस, वाल्मीक तात्या निकाळजे, ॲड. बाबुराव अनारसे, डॉ. विलास सोनवणे, संजय मेहेर सभासद, ग्राहक संचालक मंडळातील ज्येष्ठ संचालक सर व्यवस्थापक महेश पारगावकर आदी उपस्थित होते.

बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी यांनी बँकेचे शेड्यूल्ड बँक बनण्याचे तसेच बँकेचा व्यवसाय २४०० कोटींवर नेण्याचे उद्दिष्ट आणि त्यातील आष्टी शाखेचा सहभाग सर्व सभासद, ग्राहकांच्या व कर्मचाऱ्यांच्या मदतीने पूर्ण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## कृ. र. गोखले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून पुरस्काराने सन्मानित

नागपूर – दैनिक तरुण भारताच्या वाटचालीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे कृष्णराव गोखले आणि अनिरुद्ध पांडे यांचा श्री. नरकेसरी संस्था अमृत महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यात केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

गोखले हे श्री. नरकेसरी प्रकाशनचे सर्वांत ज्येष्ठ भागधारक आहेत. ते मुलाचे यवतमाळचे असून सध्या पुण्यात वास्तव्यास आहेत. तर यवतमाळचे जिल्हा प्रतिनिधी म्हणून पांडे यांनी तब्बल ५० वर्षांपेक्षा अधिक काळ सेवा दिली आहे. निवृत्ती नंतर ते 'तरुण भारत'ला सेवा देत आहेत.

## जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन अध्यक्षपदी राजेंद्र सूर्यवंशी

**नाशिक –** जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन अध्यक्षपदी राजेंद्र सूर्यवंशी तर उपाध्यक्षपदी सुनील गिते आणि कार्याध्यक्षपदी अशोक तापडिया यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संदीप जाधव यांनी काम पाहिले. यावेळी असोसिएशनचे संचालक आणि अधिकारी उपस्थित होते. निवडीनंतर बोलताना नूतन अध्यक्ष सूर्यवंशी यांनी सांगितले की, जिल्ह्यातील आणि राज्यातील नागरी सहकारी बँकांच्या अडीअडचणी, समस्या सोडविण्यासाठी सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. तसेच बँकिंग क्षेत्राला दिशा देणारे उपक्रम आणि कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## पारदर्शक आर्थिक व्यवस्थापनाने पतसंस्थेची प्रगती शक्य – रुपेश कुंभार



**रायगड –** सभासदांचा विश्वास, समन्वय आणि संवाद या बाबी महत्वाच्या आहेत. कर्ज वितरण व वसुली प्रक्रियेतील पारदर्शकता नियमांचे पालन व निधीचा सुयोग्य वापर केल्यास आर्थिक व्यवस्थापन पारदर्शक होते पतसंस्था वा बॅंकिंग व्यवसायात प्रगती शक्य होते, असे इम्पेरियल गोल्ड अँड मायक्रो मॅनेजमेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी रुपेश कुंभार यांनी सांगितले.

जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था नांदगाव शाखेच्या २३ व्या वर्धापनदिनी आयोजित सभासद मेळाव्यात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर पतसंस्थेचे अध्यक्ष दिलीप जोशी, उपाध्यक्ष मेघराज जाधव प्रशिक्षक रुपेश कुंभार, नांदगाव ग्रामपंचायत सरपंच शेजल घुमकर, मुख्याध्यापिका अर्चना खोत ज्येष्ठ संचालक पांडुरंग निरकर पंच कमिटी अध्यक्ष उमाकांत चोरघे सचिव सुनिल विरकुड, कोषाध्यक्ष बाळकृष्ण कासार, संचालक डॉ. संजय पाटील, सिद्धेश गद्रे, गणेश ठोसर, समीर उपाध्ये, प्रमोद उपाध्ये, अशोक दिवेकर जयश्री जोशी सरव्यवस्थापक संजय ठाकूर पालक समिती प्रमुख उदय रणदिवे मेघा कोतवाल आदी उपस्थित होते. सरपंच शेजल घुमकर यांनी श्रीराम पतसंस्थेच्या इवल्याशा रोपट्याचे वट वृक्षात रुपांतर झाल्याचे सांगून विनम्र कर्मचारी वृंदा विषयी गौरवोद्गार काढले. सूत्रसंचालन सिद्धी गद्रे यांनी तर आभार सुनिल विरकुड यांनी केले. व्यवस्थापिका सिद्धी गद्रे व उदय रणदिवे यांनी परिश्रम घेतले.

## सहकार भारतीचे महाराष्ट्राचे महामंत्री विवेक जुगादे यांची राज्य सहकार धोरण समितीत निवड



**नागपूर –** केंद्र सरकारच्या नवीन सहकार धोरणाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्याचेसुद्धा नवे सहकार धोरण असावे यासाठी केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री मा श्री अमितजी शहा व राज्याचे मुख्यमंत्री मा श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सहकार धोरण ठरविण्यासाठी उच्चस्तरीय समितीचे गठन करण्यात आली आहे. या समितीमध्ये सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाचे महामंत्री विवेक जुगादे यांच्यासह सहकार क्षेत्रातील काही तज्ञ व शासनाचे उच्च अधिकारी यांचा समावेश आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार ही समिती गठीत झाल्याचे परिपत्रक शासनाने काढले आहे.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ च्या अंतर्गत झालेल्या या समितीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र राज्याच्या सहकार धोरणात अनुकूल बदल करून व जुन्या धोरणाचा अभ्यास करून ही उच्चस्तरीय समिती शासनाला मार्गदर्शन करणार आहे. बदलत्या परिस्थितीत सहकार क्षेत्रातील आव्हाने व त्यावरील उपाय योजना यांचा अभ्यास करण्यासाठी तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कायद्यामध्ये काळानुरूप आवश्यक ते बदल करण्यासाठी या तज्ञ समितीची नियुक्ती करण्यात आली आहे.

# प्रत्येक व्यक्तीपर्यंत सहकार पोहोचवणे, हेच सहकार भारतीचे काम - वैशाली आवाडे




**सांगली, शिराळा –** समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत सहकार पोचवणे, रुजवणे हेच सहकार भारतीचे महत्त्वाचे काम आहे, असे सहकार भारतीच्या महिला प्रकोष्ठच्या प्रमुख व उद्योजिका वैशाली आवाडे यांनी सांगितले. राज्यस्तरीय निबंधस्पर्धा बक्षीस वितरण कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

सहकार भारतीचे प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे, विभागीय संघटक चंद्रकांत धुळप, कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, के.डी.सी.सी. चे माजी कार्यकारी संचालक व कोल्हापूर अर्बन सह. बँकेचे संचालक दीपक चव्हाण, अर्थतज्ज्ञ डॉ. एल. एन. घाडगे हे होते. अध्यक्षस्थानी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अध्यक्ष मानसिंगराव नाईक होते.

**⁕ राज्यस्तरीय निबंधस्पर्धांचे आयोजन –**

सहकार भारती व श्री दत्त नागरी पतसंस्था उरूण-ईश्वरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी भारतमाता व स्व. लक्ष्मणराव इनामदार यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. संपदा आरवाडे यांनी सहकार गीत सादर केले. सहकार भारतीच्या जिल्हा महिला प्रमुख सारीक मुळे यांनी स्वागत व प्रास्ताविक करून जिल्हा सहकार भारतीच्या कामाचा आढावा घेतला. दत्तच्या संचालिका व उद्योजिका सुखदा महाजन यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

सुमंत महाजन यांच्या संकल्पनेतून निबंध स्पर्धा यशस्वी होण्यासाठी परिश्रम करणारे समन्वयक प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी व दत्तच्या अधिकारी-सेवकांचा सत्कार करण्यात आला. संजय परमणे, डॉ. यशवंत कुलकर्णी, दीपक चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले.

आवाडे म्हणाल्या की, पश्चिम महाराष्ट्र हा सहकाराची पंढरी म्हणून ओळखला जातो. त्यामुळे सहकार घराघरात पोहोचवण्याचे काम सहकार भारती करत आहे. सहकारातील प्रत्येक सदस्य, व्यक्ती प्रशिक्षित असणे महत्त्वाचे आहे. सहकार आणि राजकारण एकाच नाण्याच्या बाजू आहेत पण सहकारात राजकारण असता कामा नये. काळानुसार आपले कायदे बदलणे आवश्यक आहे, खासगी संस्था सहकारी संस्थांना स्पर्धक आहेत, हे लक्षात ठेवून सहकारी संस्था चालवणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण विकास साधायचा असेल तर सहकाराशिवाय पर्याय नाही.

नाईक म्हणाले की, सहकारी संस्था कशा प्रकारे चालवाव्यात, हे सहकार भारती प्रशिक्षण देऊन सांगते. त्यामुळे येणाऱ्या काळात सहकार भारतीने वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटसारखे काम करून सहकारी संस्थांना अद्ययावत तंत्रज्ञान याची माहिती द्यावी, असे आवाहन केले. सहकारी संस्था चांगल्या चालवण्यासाठी संस्था चालकांना वाईटपणा घ्यावा लागतो. विकास सोसायट्या शेतकऱ्यांच्या रक्तवाहिन्या आहे. त्यामध्ये सरकारचा हस्तक्षेप कमी करून स्वायत्तता दिली पाहिजे, नियंत्रण हवे पण हस्तक्षेप नसावा.

निबंध स्पर्धेत यशस्वी झालेल्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम देऊन गौरवण्यात आले. नियोजन जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन यांच्या नेतृत्वाखालील महेश कबाडे, संजय विभूते, प्रदीप ताटे, संजय भक्ते, रवी पाटील, माजगांवकर यांनी केले. सूत्रसंचलन श्वेता जाधव, वाळवा तालुका संघटक बजरंग कदम यांनी आभार मानले

## पिंपरी चिंचवड नागरी सहकारी पतसंस्था संचालक, कर्मचारी प्रशिक्षण यशस्वी

**पुणे –** पिंपरी चिंचवड महानगरातील नागरी सहकारी पतसंस्था संचालक व कर्मचारी यांच्यासाठी संयुक्त प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. पतसंस्थांचे १३५ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. प्रशिक्षणामध्ये १) कर्ज वसुली कर्ज वाटप २) इन्कम टॅक्सबद्दल माहिती ३) सायबर सिक्युरिटी ४) संचालकांची जबाबदारी व कर्तव्य यावर. दफ्तरदार किरण पाटोळे, सी. ए. गुंड शांताराम शेटे यांनी मार्गदर्शन केले.

प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन बुलढाणा अर्बनचे सी. ओ. देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रशिक्षणार्थींनी सहकार भारतीच्या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद दिला. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरातील कार्यकर्त्यांनी सहकार्य केले. प्रशिक्षण वर्गामध्ये पतसंस्थांच्या कामकाजात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढण्याविषयी मते व्यक्त करण्यात आली.

## सहकार भारतीच्या राष्ट्रीय पदाधिकारी बैठकीत विविध विषयांवर चर्चा

**कोल्हापूर –** सहकार भारतीच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची एक बैठक नुकतीच येथील छत्रपती राजाराम सहकारी साखर कारखाना येथे नुकतीच पार पडली. बैठकीत सहकार क्षेत्राबाबत विविध विषयांवर व्यापक चर्चा करण्यात आली.

सहकार भारती राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, संरक्षक दीनानाथ ठाकुर, महामंत्री दीपक चौरसिया, संघटनमंत्री संजय पांचपोर, प्रदेश महिला अध्यक्ष वैशाली आवाडे, आमदार महादेव महाडीक तसेच अभिजीत पाटील, नंदकुमार दिवटे, संजय केसरकर आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील सहकारी संस्था शेतकऱ्याची आर्थिक स्थिती, सहकार क्षेत्रातील नवीन संधी, शासनाच्या विविध योजना आणि आगामी उपक्रम यावर मुख्यत्त्वे चर्चा झाली.

# सहकार भारती कल्याण डोंबिवली महानगर तर्फे जीवन गौरव पुरस्कार प्रदान सोहळा उत्साहात






'सहकार भारती कल्याण डोंबिवली महानगर' यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष व राष्ट्रीय सहकार सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. याअंतर्गत जीवनगौरव पुरस्कार प्रदान सोहळा व विशेष सत्कार सोहळा डोंबिवली येथे नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते पार पडले. सहकार हे केवळ आर्थिक प्रगतीची संकल्पना नसून सामाजिक ऐक्य, परस्पर विश्वास, राष्ट्रीय पुनर्निर्मितीची ताकद आहे. त्या भावनेतून 'सहकार भारती'तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ लेखक, विचारवंत 'पद्मश्री' रमेश पतंगे, 'सहकार भारती'चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, भाजपचे माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

### जीवन गौरव पुरस्कार व सत्कारार्थी

**सहकार क्षेत्रातील महान योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्काराने माजी कोकण प्रांत संघचालक बापूसाहेब मोकाशी, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष लक्ष्मीदास ठक्कर, माजी अ. भा. सर्व प्रकोष्ठ प्रमुख सुरेश पिंगळे, माजी संघटन प्रमुख गोवा सुभाष हळर्णकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर सहकार क्षेत्रातील अखंड योगदानाबद्दल विशेष सत्कार भारतीय रिझर्व बँक व नाबार्डचे संचालक सतीश मराठे, 'महाराष्ट्र राज्य काजू महामंडळ' संचालक धनंजय यादव यांचा विशेष सत्कार करण्यात आला.**

रमेश पतंगे यांनी सांगितले, माणूस हा परस्परावलंबी आहे म्हणून परस्परपूरक जीवन असले पाहिजे. एकमेकांना पूरक कसे जगता येईल, याचा विचार केला पाहिजे. माणूस किती ही मोठा झाला तरी तो एकमेकांवर अवलंबून आहे. परस्परपूरकता, परस्परअनुकूलता, परस्परअवलंबता या सगळ्यांचा विचार करून सहकारच्या माध्यमातून एक काम उभे करायला लागते आणि ते काम तुम्ही सगळे करत आहात त्याबद्दल सर्वांचे कौतुक आहे, असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलेश दरगुडे यांनी केले तर विष्णु बोबडे यांनी सहकार भारतीच्या सुरूवातीच्या काळात काम केलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. नम्रता सावंत यांनी सूत्रसंचालन केले, तर संदीप गव्हाणे यांनी आभार मानले.

# स्वच्छ सहकार हा नवीन सहकार धोरणामधील महत्त्वाचा मुद्दा : विवेक जुगादे



**सातारा** – स्वच्छ सहकार हा या नवीन सहकार धोरणामधील एक महत्त्वाचा मुद्दा असला पाहिजे, असे सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री व राज्याचे नवीन सहकार धोरण उच्चस्तरीय समिती सदस्य विवेक जुगादे यांनी सांगितले.

राज्याचे नवीन सहकार धोरण ठरवण्यासाठी प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, सहकार क्षेत्रातील अनेक अभ्यासू व सहकारातील जाण असलेल्या व्यक्तींची एक उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे, ही समिती केंद्र शासनाच्या सहकार धोरणाचा अभ्यास करून राज्याचे सहकार धोरण कसे असावे? याबाबत सरकारला मार्गदर्शन करणार आहे.

प्रास्ताविकात सहकार भारती जिल्हाध्यक्ष व धन्वंतरी नागरी पतसंस्थेचे संस्थापक डॉ. रवींद्र भोसले म्हणाले की, नवीन सहकार धोरण ठरवताना सहकार भारतीच्या प्रतिनिधींना त्यांनी अतिशय मानाचे स्थान दिले.

उद्घाटन छत्रपती संभाजी महाराज नागरी सहकारी पतसंस्था संस्थापक रामभाऊ लेंभे यांनी केले. अध्यक्षस्थानी रिझर्व बँकेचे निवृत्त अधिकारी व बँकिंग विषयातील तज्ञ अविनाश जोशी होते. ते म्हणाले की, वसुलीवर पतसंस्थांचे आस्तित्व हे अवलंबून असते. वसुलीसाठी पतसंस्थांच्या बाजूने जर कठोर कायदा केला आणि सरकार यांच्या पाठीशी उभे राहिले तर पतसंस्था टिकतील. लेंभे म्हणाले की, खासगी क्षेत्राची स्पर्धा ही सहकार क्षेत्राशी होत असल्यामुळे सहकार क्षेत्र थोडे कमकुवत होऊ लागले आहे. त्यामुळे नवीन सहकार धोरण ठरवत असताना पतसंस्थांसाठी एक वेगळा विचार केला गेला पाहिजे. शिवशक्ती नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक प्रभाकर साबळे यांनी सहकारामध्ये ज्या त्रुटी आहेत, त्या नवीन धोरण ठरवताना दूर झाल्या पाहिजेत. अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक जिवाजी मोहिते म्हणाले, सहकार क्षेत्रामध्ये झोन बंदीचा कायदा अस्तित्वात आहे. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. झोनबंदी असूनसुद्धा खासगी कारखान्याला लोक ऊस घालतात. सहकारी साखर कारखाने वाचायचे असतील तर त्यांना स्वतंत्र संरक्षण द्यावे लागेल.

निवृत्त प्राध्यापक आणि अर्थशास्त्र व सहकार या विषयाच्या राज्य मंचचे मार्गदर्शक मनोहर यादव म्हणाले, महाराष्ट्रात देखील गुजरातच्या धर्तीवर सहकार विद्यापीठ असावे. सातारा जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे संचालक व नागेश्वर पतसंस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पवार यांनी पतसंस्थेमधील कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र धोरण असले पाहिजे आणि या दृष्टीने या नवीन सहकार धोरणामध्ये त्याचा समावेश करावा, असे नमूद केले.

महाबळेश्वर सहकार भारतीचे सहसंघटक जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे संचालक दिलीप बावळेकर पतसंस्थांसाठी ठेवीवरील विमा संरक्षण मिळण्यासाठी नवीन सहकार धोरणामध्ये महत्त्व द्यावे असे सांगितले. कृष्णाकाठ संस्थेचे अध्यक्ष सुधीर कुलकर्णी यांनी सहकार चळवळ जागृत ठेवण्यासाठी नवीन सहकार धोरणात विचार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. सहकार भारती कोल्हापूर विभाग संघटक चंद्रकांत धुलप, मार्गदर्शक राजाभाऊ फडके, रमेश फडणीस, प्रदीप दीक्षित, जिल्हा सहसंघटक गणेश डुबल, बाळकृष्ण साळुंखे आदि मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन जिल्हा महामंत्री शैलेश ढवळीकर, जिल्हा संघटक शामराव झोरे यांनी आभार मानले.

# जीवन सुंदर करण्यासाठी अंतर्मनात डोकावण्याची गरज : गणेश शिंदे

## 'कॉक्लिआ' संस्थेला जनसेवा पुरस्कार २०२५ प्रदान




**जनसेवा सहकारी बँकेच्या वतीने देण्यात येणारा 'जनसेवा पुरस्कार २०२५' डॉ. प्रवीण दबडघाव यांच्या हस्ते स्वीकारताना कॉक्लिआ संस्थेच्या देशपांडे आणि डॉ. वाचासुंदर. डावीकडून बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष पोळेकर, उपाध्यक्ष रवि तुपे, अध्यक्ष डॉ. हिरेमठ, देशपांडे, डॉ. वाचासुंदर, डॉ. दबडघाव वक्ते गणेश शिंदे.**

**पुणे** – कायम दुसऱ्याशी तुलना करून माणूस स्वतःला दुःखी करून घेत असतो. जगणे जर सुंदर करायाचे असेल तर बाह्य जगात बघण्यापेक्षा स्वतःच्या अंतरंगात बघण्याची सवय लावून घेतली पाहिजे, असे व्याख्याते गणेश शिंदे यांनी सांगितले. जनसेवा सहकारी बँकेच्या ५३व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात 'जीवन सुंदर आहे' या विषयावर शिंदे बोलत होते.

बँकेच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा 'जनसेवा पुरस्कार २०२५' कर्ण-बधीर मुलांना बोलते करण्यासाठी झटणारी कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग अँड स्पीच या संस्थेस प्रदान करण्यात आला. रक्कम रु. १,०१,०००/- (एक लाख एक हजार रुपये), मानपत्र आणि सन्मान चिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. वर्धापन दिनापासून मागील आर्थिक वर्षात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या सेवकांना गुणवंत सेवक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यास सुरुवात करण्यात आली. पहिला गुणवंत सेवक पुरस्कार अमित गायकवाड आणि आरती भारती यांना प्रदान करण्यात आला.

अध्यक्षस्थानी रा.स्व.संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव होते. बँकेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ, उपाध्यक्ष रवि तुपे, मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष पोळेकर, कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग अँड स्पीच या संस्थेचे मुख्य व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. अविनाश वाचासुंदर, विश्वस्त रक्षा देशपांडे व्यासपीठावर होते.

शिंदे म्हणाले, भौतिक साधनांनी माणसाचे आयुष्य सोपे, सुलभ होईल, पण सुखी होईलच असे नाही. प्रत्येक व्यक्तीने आपली प्रगती ही समाधानाच्या पातळीवर मोजली पाहिजे. आनंद ही अंर्तमनाची अवस्था आहे. जीवन सुखी करावयाचे असेल आणि सामाजिक व कौटुंबिक स्वास्थ टिकवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने प्रेम आणि वात्सल्याची भावना जपली पाहिजे. माणसाने माणसामध्ये देव बघायला शिकले पाहिजे. प्रत्येकाने निसर्गाचा समतोल राखण्यासाठी निसर्गाशी जुळवून घेतले तरच माणसाचे जीवन सुखमय होईल.

डॉ. दबडघाव म्हणाले, जनसेवा बँक जशी आर्थिक बाबतीत अग्रेसर आहे. तसेच आपण समाजाचे देणे लागतो, या भूमिकेतून राष्ट्रीय व सामाजिक कार्यात आणि सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीमध्ये कायमच मदत करण्यात बँक अग्रेसर असते. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पोळेकर यांनी स्वागत केले. बँकेचे अध्यक्ष डॉ. हिरेमठ यांनी बँकेच्या वर्षभरातील आर्थिक कामगिरीवर प्रकाश टाकला.

पुरस्कार मिळाल्याबद्दल मनोगत व्यक्त करताना डॉ. वाचासुंदर म्हणाले, जनसेवा बँकेतर्फे मिळालेला हा पुरस्कार म्हणजे समाजात करीत असलेल्या कार्याची दखल समाज घेत असल्याची पावती आहे. हा पुरस्कार खरोखरीच प्रेरणादायी असून आगामी काळात कर्ण बधीर बालकांचे आयुष्य सुकर करण्यासाठी अधिक जोमाने काम करू, असे ते म्हणाले.

सुहास शामगावकर यांनी स्वागतगीत तर अभिजित केळकर यांनी मानपत्राचे वाचन केले. स्नेहल दामले यांनी सूत्रसंचालन आणि उपाध्यक्ष रवि तुपे यांनी आभार मानले.

## पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अध्यक्षपदी श्रीधर गायकवाड

**पुणे** – पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अध्यक्षपदी श्रीधर गायकवाड आणि उपाध्यक्षपदी बिपिनकुमार शहा यांची निवड करण्यात आली आहे. बँकेच्या संचालक मंडळाची बैठक माजी अध्यक्ष जनार्दन रणदिवे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच झाली. त्यामध्ये वरील निर्णय एकमताने घेण्यात आला.

नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेने एकूण व्यवसायाचा २ हजार ७०६ कोटी व्यवसाय टप्पा पूर्ण केला असून त्यामध्ये ठेवी १ हजार ६३३ कोटी आणि कर्ज १ हजार ०७३ कोटी इतके वितरित करण्यात आले आहे. एनपीए टक्केवारी शून्य टक्के ठेवण्यात बँकेला यश मिळाले आहे. सीडी रेशो ६५.७० टक्के आहे.

## कॉसमॉस सहकारी बँकेच्या माटुंगा शाखेचे स्थलांतर

**पुणे** – कॉसमॉस सहकारी बँकेच्या माटुंगा शाखेचे नुकतेच स्थलांतर करण्यात आले आहे. बँक अध्यक्ष प्रल्हाद कोकरे, संचालक सचिन आपटे, प्रविणकुमार गांधी, संचालिका अनुश्री माळगावकर उपस्थित होते. बँक ग्राहकांना विविध अद्ययावत सेवा सुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत.

# समाज हा विश्ववंद्य आणि विश्वगुरू व्हावा हा सेवेचा उद्देश

## स्वरूपवर्धिनीला संपदा समाजकल्याण पुरस्कार प्रदान



**पुणे –** ईश्वराने मला दिले, ते समाजाला दिले नाही तर ते सडून जाईल. आवश्यकता तिथे सेवा आणि समस्या समजून सेवा करणे आवश्यक आहे. समाजातून निर्माण झालेला पैसा समाजासाठी खर्च करायचा असतो. समाज हा विश्ववंद्य आणि विश्वगुरू व्हावा, हा सेवेचा उद्देश असायला हवा, असे भारत-भारतीचे संस्थापक अध्यक्ष विनय पत्राळे यांनी व्यक्त केले.

संपदा सहकारी बँकेचा यंदाचा संपदा समाजकल्याण पुरस्कार स्वरूपवर्धिनी संस्थेला प्रदान करण्यात आला. स. प. महाविद्यालयातील लेडी रमाबाई हॉल येथे आयोजित कार्यक्रमात स्वरूपवर्धिनीचे शिरीष पटवर्धन आणि सहकाऱ्यांनी यांनी पुरस्कार स्वीकारला. रुपये ५१ हजार, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. पुरस्काराचे यंदा दुसरे वर्ष होते.

शिक्षण प्रसारक मंडळी नियामक मंडळ अध्यक्ष ॲड. एस. के. जैन बँकेचे अध्यक्ष सी. ई. अश्विनीकुमार उपाध्ये, उपाध्यक्ष सी. ए. महेश लेले, मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश सरदेशपांडे, व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष मुकुंद भालेराव संचालक उपस्थित होते.

जैन म्हणाले, बँकेकडून कर्ज मिळते, तर कर्ज घ्यावे आणि नंतर कर्जमुक्ती मागावी, हा ट्रेंड झाला आहे. सहकारी बँका चालविणे किती कठीण आहे, हे माहीत आहे. बँकेची वृद्धी कमी जास्त झाली, तरीदेखील समाजासाठी काम होणे महत्त्वाचे आहे. त्याकरिता वस्त्यांमध्ये आर्थिक साक्षरता होणे गरजेचे आहे.

पुरस्काराला उत्तर देताना पटवर्धन म्हणाले, सामान्य माणसाला अर्थ संचय करण्यासाठी संकलन, संवर्धन आणि संरक्षणाची सुविधा बँक देते. तसेच बचतीला बळ देण्याचे कामही केले जाते. संपदा सहकारी बँकेप्रमाणेच स्वरूपवर्धिनीचे कार्य सुरू असून समाजातील बुद्धिवंतांना शोधून त्यांना योग्य संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न संस्था करीत आहे.

उपाध्ये म्हणाले, समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत बँकिंग पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. यंदा अर्थसाक्षरता विषय घेऊन वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. तसेच बँकिंग सोबत पुरग्रस्ताना मदतदेखील मोठ्या प्रमाणात देण्यात आली. बँकेला 'अ' ऑडिट वर्ग मिळाला असून सर्व प्रकारच्या डिजिटल सेवा ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या जात आहेत, शैलेश परांजपे यांनी सूत्रसंचालन केले आणि गिरीश सरदेशपांडे यांनी आभार मानले.

## पतसंस्थेतील ठेवींचे संरक्षण – खासगी कंपन्यांची मदत

**पुणे –** सहकारी पतसंस्थेतील ठेवीदारांच्या ठेवींचे संरक्षण व्हावे, यासाठी खासगी विमा कंपन्यांची मदत घेण्याचा निर्णय सहकार खात्याने घेतला आहे. या निर्णयामुळे राज्याच्या विविध भागातील सुमारे एक लाख रूपयांपर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण मिळणार आहे.

याबाबत एकूण चार कंपन्यांनी सकारात्मकता दर्शविली आहे. राज्याच्या विविध जिल्ह्यात १३ हजार ४१२ नागरी आणि ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत. यामध्ये सुमारे ६ हजार ५३६ कर्मचारी आहेत. पतसंस्थांमध्ये ३ कोटी १० हजार ठेवीदार यांच्या ९० हजार ५०१ कोटींच्या ठेवी आहेत. याबाबत खासगी कंपनी यांनी पुढाकार घेतल्यास पतसंस्थेमधील ठेवींना संरक्षण मिळणार आहे. सध्या ५ लाखांपर्यंतच्या ठेवींना संरक्षण देण्यात येत आहे.

## सहकारी गृहरचना संस्थामध्ये सोसायट्यांनी कुटुंबाप्रमाणे कामकाज करावे

**पुणे –** सहकारी गृहरचना संस्थामध्ये सोसायट्यांनी कुटुंबाप्रमाणे कामकाज केल्यास वाद विवादाचे प्रमाण कमी होण्यास हातभार लागेल. सुसंवाद वाढण्यास मदत होणार आहे, असे मत सहकारतज्ञ अजित बोराडे यांनी व्यक्त केले आहे.

पिंपरी चिंचवड परिसरातील विविध सहकारी गृहनिर्माण सोसायट्याच्या अनेकविध अडचणी, सदस्यांचे हक्क याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, घर हा प्रत्येकाचा जिव्हाळ्याचा विषय आहे. कन्व्हेयन्स हा सोसायटीचा मालकी हक्क आहे आणि तो मिळविणे हा सर्वांत महत्त्वाचा असा टप्पा आहे. प्रत्येक सोसायटीने वेळेवर आवश्यक ती कागदपत्रे बांधकाम व्यावसायिक यांच्याकडून घेणे अनिवार्य आहे. त्यामुळे विकास कामामध्ये अडथळे निर्माण होणार नाहीत.

श्वेता वैद्य यांनी सूत्रसंचालन तर शीतल चौधरी यांनी आभार मानले. परिषदेत सत्यनारायण मोरे, विमला लोखंडे, दत्तात्रय खाडे यांनी मनोगते व्यक्त केली.

## पुनर्विकास प्रक्रिया अंमलबजावणीसाठी सर्वसाधारण सभेला अधिकार

**पुणे –** राज्याच्या विविधा जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांची पुनर्विकास प्रक्रियेची अंमलबजावणी होण्यासाठी सर्वसाधारण सभेला अधिकार असणार आहेत, असे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी स्पष्ट केले आहे, तसे आदेश राज्यातील सर्व जिल्ह्यातील उपनिबंधक यांना देण्यात आले आहे.

राज्य शासनाने सन २०१९ मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकास प्रक्रियेला गती मिळावी यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली होती. मात्र मंजुरीबाबतच्या भूमिकेबाबत संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, तो आता दूर झाला आहे. त्यानंतर सहकार आयुक्त तावरे यांनी आदेश काढले आहेत.

# बँकिंग लोकपाल योजनेत राज्य सहकारी बँका जिल्हा सहकारी बँकांचा समावेश

**पुणे –** बँकिंग लोकपाल योजनेत आता राज्य सहकारी बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांचा समावेश करण्यात आला आहे. यासाठी आरबीआयने पुढाकार घेतला असून या निर्णयाचे स्वागत राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी केले आहे. या निर्णयामुळे सहकारी बँकांना नाबार्डऐवजी थेट आरबीआयकडे दाद मागता येणार आहे.

ते म्हणाले, देशातील राष्ट्रीयकृत बँक तसेच शेड्यूल्ड सहकारी बँकांमधील ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण व्हावे, यासाठी आरबीआयने सन १९९५ मध्ये लोकपाल योजना सुरू केली. त्यात २०२१ मध्ये काही सुधारणा करण्यात आल्या. त्यात राज्य सहकारी बँक आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचा समावेश नसल्यामुळे ग्राहकांना आरबीआयकडे दाद मागता येत नव्हती. या बँकांचे नियंत्रण आरबीआयकडे असले तरी देखरेख नाबार्डकडे आहे. यावर उपाययोजना म्हणून १ नोव्हेंबर २५पासून देशातील सर्व सहकारी बँकांना ही योजना लागू करण्यात आली. यामुळे राज्य आणि जिल्हा बँकांना ग्राहकांच्या तक्रारी हाताळण्यात पारदर्शकता आणता येणार आहे.

आरबीआयच्या परिपत्रकानुसार आता ही योजना सर्व व्यावसायिक बँक प्रादेशिक, ग्रामीण राज्य सहकारी बँक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, तसेच ५० कोटींपेक्षा अधिक ठेवी असणाऱ्या शेड्यूल्ड आणि नॉन शेड्यूल्ड सहकारी बँका आणि १०० कोटींपेक्षा अधिक मालमत्ता असणाऱ्या नॉन बँकिंग कंपनी यांना लागू होणार आहे. परिणामी ग्रामीण भागातील ग्राहकांना दिलासा मिळणार आहे, असे त्यांनी सांगितले.

## विश्वेश्वर सहकारी बँक लघुउद्योजक मेळाव्यात विविध कर्ज योजनांची माहिती

**पुणे –** विश्वेश्वर सहकारी बँकेच्या वतीने लघु उद्योजकांसाठी घेण्यात आलेल्या मेळाव्यात विविध कर्ज योजनांची माहिती सांगण्यात आली. लघुउद्योजकांना अधिकाधिक प्रमाणात कर्ज उपलब्ध करून देण्याचे बँकेने उद्दिष्ट ठेवले आहे. मेळाव्यास पिंपरी चिंचवड लघु उद्योजक संघटना अध्यक्ष संदीप बेलसरे, सचिव जयंत कड, तसेच पदाधिकारी बँकेचे संचालक आणि अधिकारी उपस्थित होते. लघुउद्योजकांना भांडवल उभारणीसाठी येणाऱ्या अडचणींबाबत मेळाव्यात चर्चा करण्यात आली. बँकेच्या वतीने समाधानकारक उत्तरे देण्यात आली. प्रास्ताविक सरव्यवस्थापक मिलिंद केळकर यांनी तर अमृता कुलकर्णी यांनी आभार मानले.

## जिल्हा बँक भरती प्रक्रिया आता ऑनलाईन

पुणे – यापुढील कालावधीत जिल्हा बँकेतील सुमारे ७० टक्के भरती ही मुख्यत्वे स्थानिक जिल्ह्यातील करण्यात येणार आहे. यासाठी ऑनलाइन प्रक्रियेवर भर देण्यात येणार आहे. तसा निर्णय नुकताच शासनाने घेतला आहे. यासाठी शासनाने तीन संस्थांची निवड केली आहे.

या तीन संस्थामध्ये, एमकेसीएल, आयबीपीएस आणि टीसीएस – आयओएन या तीन संस्थांचा समावेश आहे. या तीन संस्थांपैकी कोणत्याही एका संस्थेची निवड बँकेला करता येणार आहे. याखेरीज अन्य कोणत्याही अन्य संस्थेकडून काम करून घेता येणार नाही. मुख्य म्हणजे भरती प्रक्रियेतील ७० टक्के जागा या राखीव असणार आहेत. त्यामध्ये स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येणार आहे, असे शासकीय निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. तर उर्वरित ३० टक्के जागा या जिल्ह्याच्या बाहेरील उमेदवारासाठी उपलब्ध असणार आहेत आणि या ३० टक्के जागा पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास या जागा स्थानिक उमेदवारांकडून भरण्यात येणार आहेत, असे निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

## आपुलकी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी संजय पायगुडे

**पुणे –** आपुलकी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी संजय पायगुडे आणि उपाध्यक्षपदी प्रकाश चौधरी यांची नुकतीच निवड करण्यात आली. संस्थेच्या संचालक मंडळाची नुकतीच बैठक झाली. त्यामध्ये वरील निर्णय घेण्यात आला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संतोष शिंगाडे यांनी काम पाहिले. संस्थेच्या सचिवपदी संतोष तोडकर यांची निवड करण्यात आली आहे. नूतन पदाधिकाऱ्यांनी संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी काम करण्याचा निर्धार केला.

## जिल्हा नागरी सहकारी पतसंथा महासंघाच्या वतीने पूरग्रस्तांसाठी मदत निधी

**पुणे –** पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंथा महासंघाच्या वतीने पूरग्रस्तांसाठी एक लाख रुपयांचा धनादेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे प्रदान करण्यात आला. महासंघाच्या वतीने अध्यक्ष रेश्मा भोसले यांनी हा धनादेश दिला. उपाध्यक्ष अन्य संचालक, पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## राज्य सहकारी बँकेचा कर्मचाऱ्यांना बोनस

**पुणे –** राज्य सहकारी बँकेच्या वतीने कर्मचाऱ्यांना १४ टक्के बोनस दिला आहे. बँकेचा ११४ वा वर्धापन दिन नुकताच साजरा करण्यात आला. यावेळी प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी हा निर्णय जाहीर केला. बँकेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ६५१ कोटींचा विक्रमी नफा मिळविला आहे.

बँकेचे नक्तमूल्य ५,४०० कोटींपेक्षा अधिक झाले आहे. बँकेचा स्वनिधी ४०० कोटींपेक्षा अधिक झाला आहे. यामुळे आशिया खंडातील सर्वांत सक्षम बँक म्हणून बँकेचा नावलौकिक झाला आहे. सलग दोन वर्षे बँकेच्या वतीने १४ टक्के बोनस देण्यात येत आहे.

## मुख्यमंत्री सहायता निधीसाठी पीडीसीसी बँकेची सव्वा कोटींची मदत

पुणे – राज्याच्या विविध भागात अतिवृष्टीमुळे घरे, शेती, जनावरे, याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी १ कोटी २६ लाख ५१ हजार रुपयांचा निधी दिला आहे.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषिमंत्री दत्ता भरणे, बँक अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे तसेच संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई आदी उपस्थित होते.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवक सहकारी पतसंस्थेला पुरस्कार प्रदान

**पुणे –** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवकांची सहकारी पतसंस्थेला राज्य सहकारी पतसंस्था महासंघाच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श पतसंस्था म्हणून नुकतेच गौरविण्यात आले आहे.

महासंघाचे अध्यक्ष काका कोयटे, कर्नाटकचे खासदार प्रभाकर कोरे, अण्णासाहेब जोले यावेळी उपस्थित होते. संस्थेचे मार्गदर्शक बबनराव झिजुर्डे, शिवाजी येळवंडे, संचालक आदी यावेळी उपस्थित होते.

## सहकार क्षेत्रात महिलांनी सजगतेने काम करावे - रूपेश कुमार

**सांगली –** सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनी सजगतेने काम करण्याची गरज आहे, असे मत रूपेश कुमार यांनी व्यक्त केले आहे. सहकारी पतसंस्था संचालिका, पदाधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

प्रशिक्षणामध्ये सहकार क्षेत्राची ओळख, महिला संस्थांची निर्मिती आणि उद्दिष्टे, संचालक पदाची ओळख, कामकाजातील सहभाग अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. यासाठी सांगली जिल्ह्यातील विविध तालुक्यातून महिला पदाधिकारी वर्गात सहभागी झाल्या होत्या. सहकार भारती जिल्हा प्रमुख सारिका मुळे यांनी प्रशिक्षण वर्गास भेट दिली. सांगली अर्बन बँक संचालिका आणि सहकार भारती प्रदेश सदस्या अश्विनी आठवले आणि अक्षय पिसे यांनी संयोजन केले.

## सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचा उसाचा पहिला हप्ता जाहीर



**पुणे –** पुणे जिल्ह्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने उस उत्पादक शेतकऱ्यांना उसाचा पहिला हप्ता ३,३०० रुपये जाहीर केला आहे. ही रक्कम सदस्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे, अशी माहिती कारखाना अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांनी सांगितली. ते म्हणाले, कारखान्यांचा गाळप हंगाम १ नोव्हेंबरला सुरू झाला. सध्या प्रती दिन दहा हजार टन उस गाळप करण्याची क्षमता आहे. गाळपाबरोबर अल्कोहोल उत्पादन घेण्यात येत असून सहवीज निर्मिती करण्यावर भर देण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

## कात्रज दूध संघाची दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी क्रेडिट बायोगॅस योजना

पुणे – दूध उत्पादक शेतकरी यांच्यासाठी कात्रज दूध संघाच्या वतीने क्रेडिट बायोगॅस योजना सुरू केली आहे. कात्रज दूध संघास दूध पुरवठा करणाऱ्या जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकरी यांच्यासाठी ही योजना असणार आहे, असे संघाचे अध्यक्ष स्वप्नील ढमढेरे यांनी सांगितली.

ते म्हणाले, योजनेअंतर्गत संघाने विविध मॉडेल्स तयार केली आहेत. ही मॉडेल्स दूध उत्पादक यांच्या घरी असलेल्या पशुधनांच्या आधारे लहान ते मोठ्या शेतकरी यांना सबसिडीमध्ये उपलब्ध करून दिले आहे. या योजनेमुळे महिलांना घरच्याघरी धूरविरहित इंधन तयार करता येणार आहे. यामुळे गॅस सिलिंडरचा खर्च कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच सरपणासाठी लागणारी झाड तोड कमी होण्यास हातभार लागणार आहे. योजनेमुळे हवा आणि एकूणच वातावरण स्वच्छ राहण्यास मदत होणार आहे.

## 'कर्जमुक्त व्हा' या पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे –** व्यावसायिकांनी व्यवसाय वृद्धीसाठी आणि युवकांनी मालमत्ता खरेदीसाठी कर्ज घेऊन त्याची वेळेवर परतफेड करणे गरजेचे असून यामुळे देशाच्या आर्थिक चक्राला गती मिळणार आहे, असे मत नाबार्डचे संचालक सतीश मराठे यांनी व्यक्त केले आहे. सीए अभिजीत कोळपकर लिखित 'कर्जमुक्त व्हा' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते.

चितळे उद्योग समूहाचे श्रीकृष्ण चितळे, मधुश्री प्रकाशनाचे शरद अष्टेकर यावेळी उपस्थित होते. देशाची अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर आरुढ झाली आहे. त्याचा फायदा करुन घेणे आवश्यक आहे, असे आव्हान त्यांनी केले. चितळे यांनी सांगितले की, प्रत्येक व्यावसायिकाला कर्ज घेण्याची गरज असतेच. त्याची परतफेड करावी पण कर्ज बाजारी कधी होऊ नये, प्रकल्प आराखडा तयार करताना व्यवसायाची वास्तविक स्थिती विचारात घेणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. विविध अनुभवांमुळे पुस्तक लिहिण्याची प्रेरणा मिळाली, असे कोळपकर यांनी सांगितले. अमृता देशपांडे यांनी प्रास्ताविक तर सविता म्हसकर यांनी सूत्रसंचालन केले.

## सन्मित्र सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी गणेश फुलारे

पुणे – येथील सन्मित्र सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी गणेश फुलारे तर उपाध्यक्षपदी विजय राऊत यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपनिबंधक दिगंबर हौसारे यांनी काम पाहिले. बँकेच्या नवीन धनलक्ष्मी ठेव योजनेचा शुभारंभ करण्यात आला. अभिनेत्री मृणाल कुलकर्णी, बँक अध्यक्ष गणेश फुलारे ज्येष्ठ संचालक चंद्रकांत ससाणे, तसेच संचालक, अधिकारी उपस्थित होते. योजनेची माहिती अध्यक्ष फुलारे यांनी सांगितली. उपाध्यक्ष राऊत यांनी आभार मानले.

बँकेच्या नवीन मोबाईल ॲप आणि डिजिटल सेवा याच प्रारंभ माजी राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला. अध्यक्ष फुलारे आणि विद्यमान संचालक, अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## कर्जमुक्त व्हा - मार्गदर्शक आणि उपयुक्त पुस्तक

**पुस्तक परिक्षण**

उद्योग व्यवसाय असो की घर अथवा अन्य कारणासाठी कर्जाची आवश्यकता भासत असते. त्यासाठी वित्तीय संस्था अथवा अन्य मार्गामधून कर्जाची उभारणी करता येते पण त्याचंबरोबर कर्जाची वेळेवर परतफेड करणे म्हणजे एका अर्थाने कर्ज मुक्त होणे आवश्यक असते. त्याबाबत सविस्तर माहिती वाचकांना पुस्तकाच्या माध्यमातून करून देण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे, असे दिसते.




सी ए अभिजित कोळपकर यांनी पुस्तकाचे लेखन केले आहे. या पुस्तकाची मांडणी करताना विविध विषयांचा विचार करण्यात आला आहे. यासाठी पुस्तकामध्ये विविध विभाग करण्यात आले आहे ज्यायोगे वाचकांना देखील सहजपणाने विषयाचे आकलन होण्यास मदत होणार आहे. यामध्ये कर्ज संकल्पना, ईएमआय आणि व्याजाचे गणित, सिबिल क्रेडिट स्कोअर आणि आर्थिक ओळखपत्र, क्रेडिट कार्डसचे मायाजाल, गृहकर्जसाठी की कर्ज साखळी, कार लोन स्टाईल की ओझे, व्यक्तीगत कर्ज आणि कर्जाचे अन्य प्रकार, शैक्षणिक कर्ज उज्वल भविष्याची पायाभरणी, व्यवसाय कर्ज, कर्ज मुक्तीचा रोड मॅप, थकबाकी वसुली आणि कायदेशीर बाजू, आदी विषयांचा विचार करण्यात आला आहे. त्यामुळे वाचकांना देखील सहजपणाने विषयांची माहिती होण्यास मदत होते.

आरबीआय आणि नाबार्डचे संचालक सतीश मराठे यांची प्रस्तावना पुस्तकास लाभली आहे .पुस्तकाचे वेगळेपण म्हणजे महितीच्या बरोबरीने विविध छायचित्रे आणि आकडेवारी देण्यात आली आहे पुस्तकांध्ये लेखकाचे मनोगत वाचकांना वाचावयास मिळते. पुस्तकाचे मुखपृष्ट विषयाला अनुसरून असून पृष्ठसंख्या ४३३ इतकी आहे. मधुश्री पब्लिकेन्शचे शरद अष्टेकर हे प्रकाशक असून पुस्तकाची किंमत रुपये ४०० इतकी आहे. पुस्तकाची ही प्रथम आवृत्ती असून पुस्तकाचे संपादन अमृता देशपांडे यांनी केले आहे.

# ठेव सुरक्षा ही माफक अपेक्षा

आता तरी थांबवा ठेवीदारांची उपेक्षा जागतिक स्तरावर बिगर शेती सहकारी पतसंस्थांना क्रेडिट युनियन या नावाने संबोधले जाते. काही देशांमध्ये क्रेडिट युनियनच्या ठेवींना विमा कवच तर काही देशामध्ये स्थैर्य व तरलता सहाय्य निधीचे माध्यमातून ठेवीदार यांना संरक्षण दिले असून देशनिहाय ठेव संरक्षण मर्यादा वेगवेगळी आहे.




गणेश निमकर
९८२२५ ६८५५०


भारतात केरळ राज्यात सन २०१२ पासून केरळ सहकारी ठेव हमी निधी योजने नुसार केरळ सरकारने बंद पडलेल्या किंवा निष्क्रिय असलेल्या (लिक्विडेशन) पतसंस्था वगळता उर्वरित सर्व पतसंस्थांना हि ठेव हमी योजना लागू केली आहे. या मध्ये पतसंस्थाच्या अंशदाना एवढेच केरळ राज्याचे देखील आर्थिक योगदान आहे. आजमितीस त्याची संरक्षण मर्यादा बँकांएवढीच म्हणजे रु. पाच लाख आहे.

बहु-राज्य सहकारी संस्था कायदा, २००२ मध्ये, ऑगस्ट २०२३ पासून सहकारी पुनर्वसन, पुनर्बांधणी आणि विकास निधी (CRRDF). योजनेद्वारे आजारी बहु-राज्य सहकारी संस्थांना पुनरुज्जीवित करण्यास मदत करण्यासाठी हा निधी स्थापन करण्याची तरतूद समाविष्ट झाली आहे. नफा कमावणाऱ्या संस्थांकडून योगदान घेऊन, आजारी बहु-राज्यीय सहकारी संस्थांचे पुनर्वसन आणि पुनर्बांधणीसाठी आर्थिक मदत प्रदान करणे, तसेच अन्य संस्थांना पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अनुदान देणे यासाठी सदर निधीचा विनियोग होणार आहे.

महाराष्ट्र राज्यात बिगर शेती सहकारी पतसंस्थांना, नागरी सहकारी बँकांच्या प्रमाणेच ठेवींना संरक्षण मिळावे ही खूप पूर्वीपासूनची मागणी आहे. या संदर्भात अनेक वर्षे प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून अगदी सुरूवातीला सन २००३ मध्ये, राज्यातील पतसंस्थांसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लिमिटेड मुंबई यांचे मार्फत सहकारी तत्त्वावर स्वतंत्र ठेव संरक्षण महामंडळ स्थापित करून, रु. पन्नास हजारपर्यंत ठेव संरक्षण योजना कार्यान्वित झाली होती. या ठेव संरक्षण महामंडळामध्ये सहकार खात्यातील तत्कालीन उच्चपदस्थ अधिकारीदेखील प्रतिनिधी म्हणून नियुक्त केले होते. या मध्ये कायदेशीर अधिष्ठान किंवा शासनाचे कोणतेही भांडवल नव्हते. काही कालवधीनंतर कोणतीच शहानिशा न होताच एका विशिष्ट वर्तमानपत्रातून या महामंडळाबद्दल विपर्यस्त बातम्या आल्या.



भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (Insurance Regulatory and Development Authority of India) या भारतातील विमा आणि पुनर्विमा उद्योगांवर देखरेख व नियमन करणाऱ्या वैधानिक संस्थेने या योजनेवर आक्षेप घेतल्याने सन २०१९ मध्ये ही योजना संपुष्टात आली.

महाराष्ट्र राज्यातील पतसंस्थांमधील सामान्य ठेवीदारांना संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य शासनाने २२ फेब्रुवारी २०१९ रोजी महाराष्ट्र राज्य सहकार अधिनियम १९६० मध्ये पतसंस्थांसाठी नव्याने एक स्वतंत्र प्रकरण समाविष्ट केले व या प्रकरणांमध्ये अनेक तरतुदींबरोबर 'ठेव स्थिरीकरण आणि तरलता सहाय्य निधी योजना' देखील समाविष्ट केली आहे. या योजनेसाठी बँकिंगसाठी असणारी ठेव विमा योजना याचा मूलभूत आधार घेण्यात आला असून, त्या दृष्टीने या योजनेतील तरतुदी ठरवण्यात आल्या आहेत. बँकांच्या ठेवींना असणाऱ्या 'विमा संरक्षण' या शब्दामधील 'विमा' हा शब्द या योजनेत वापरता येत नसल्याने 'ठेव स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी' या नावाने ही योजना सहकार कायद्यामध्ये समाविष्ट झाली. ही योजना बँकिंगचे ठेव विमा योजनेवर आधारभूत असली तरी बँकिंगसाठी असणारी ठेव विमा योजनेबरोबर याची तंतोतंत तुलना करता येणार नाही.

या योजनेमध्ये नागरी सहकारी व पगारदार पतसंस्था या दोघांचाही समावेश असून, या संदर्भात शासनाने राज्यातील सर्व बिगर कृषी सहकारी पतसंस्थांसाठी ही योजना राबवणेबाबत कालबद्ध परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकामध्ये आर्थिक वर्ष अखेरीस पतसंस्थांकडे असलेल्या ठेवीच्या प्रमाणात शेकडा १० पैसे या दराने ठेव संरक्षणापोटी अंशदान देणेबाबतीत कार्यवाही करण्याची सूचना दिली होती. या संदर्भात यापूर्वी संस्था समावेशाबद्दल निकष ठरवण्यात आले. या योजनेची विश्वासार्हता वाढवण्यासाठी शासनाने या योजनेत दहा वर्षांत प्रतीवर्षी समान रक्कम परतफेडीचे अटीवर रु. १०० कोटी आर्थिक मदत दिली आहे. याचे संपूर्ण नियंत्रण हे नियामक मंडळ या शासकीय यंत्रणेकडे आहे. या योजनेमध्ये वैधानिक तरलतेपोटी किमान प्रमाण राखण्यासाठी व पतसंस्था अवसायनात गेल्यावर प्रती ठेवीदार ठराविक रक्कम परत करणे या दोन प्रमुख कारणासाठी पतसंस्थांना तरलता मदत दिली जाणार आहे.

वैधानिक तरलतेपोटी किमान प्रमाण राखण्यासाठी व अवसायनात गेल्यावर प्रती ठेवीदार ठराविक रक्कम परत करणेसाठी काही प्रमुख अटींची पूर्तता करणे बंधनकारक आहे. याशिवाय नियामक मंडळाने वेळोवेळी ठरवलेले कोणतेही निकष पाळले नाही तरी कोणतीच तरलता मदत मिळणार नाही. या योजनेच्या यशस्वितेसाठी सहकार खात्याकडून तत्कालीन सहकार आयुक्त यांचेकडून अथक प्रयत्न केले गेले. जिल्हानिहाय बैठका घेऊन संस्था प्रतिनिधींचे शंकासमाधान करण्याचा प्रयत्न केला गेला.

सन २००३ मध्ये, राज्यातील पतसंस्थांसाठी सहकारी तत्त्वावर स्वतंत्र ठेव संरक्षण महामंडळ स्थापित झाले होते, त्याच्या अपयशामधील शासन नियंत्रण व आर्थिक सहभाग या दोन महत्त्वाच्या त्रुटी या योजनेत शासनाने दूर केल्या आहेत. फेडरेशन व निवडक मोठ्या पतसंस्थांचे प्रतिनिधी यांना या योजनेच्या व्यावहारिकतेवर असणारी साशंकता व यासाठी येणारा अंशदान खर्च यामुळे सदर योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला नाही.

या संदर्भात महाराष्ट्र सहकारी विकास महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र सरकारचा उपक्रम) यांचे मार्फत अंशदानापोटी तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांचे मार्फत बँक हमी स्वरुपात बिगर कृषी सहकारी पतसंस्थांना ठेव विमा संरक्षण देण्याचे देखील प्रयत्न झाले, परंतु हे दोन्ही प्रयत्न यशस्वी झाले नाहीत.

'ठेव स्थिरीकरण आणि तरलता सहाय्य निधी योजना' ही शासन मान्य योजना सुरु असतानाच, सहकार खात्याने शनिवार दि. २५.१०.२०२५ रोजी दैनिक सकाळ पुणे या वर्तमानपत्रात ठेव संरक्षणासाठी चार खासगी विमा कंपन्यांकडे पतसंस्था ठेव संरक्षण योजनेचे दोन प्रस्ताव दिल्याचे

पुढील पानावर...

मागील पानावरून...

# ठेव सुरक्षा ही माफक अपेक्षा

जाहीर केले आहे. मुळातच शासनाची एक योजना कार्यान्वित असताना अशा प्रकारची दुसरी योजना जाहीर केल्याने या बाबतीत अधिकच संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

पतसंस्थांच्या ठेवींना संरक्षण देणे हे महाराष्ट्र राज्यातील सर्व पतसंस्था तसेच त्यांच्या ठेवीदारांचे एक दीर्घकालीन स्वप्न आहे. आजपर्यंत या बाबतीत ज्या ज्या योजना आणल्या व प्रयोग करण्यात आले. त्यामध्ये अनेक कायदेशीर व व्यावहारिक उणीवा असल्याने त्याची केवळ जाहिरात झाली. या पूर्वी कोणतीही नवीन योजना आणताना मागील योजनांमधील उणीवा अथवा दोषांची पुनरावृत्ती होणार नाही हे गांभीर्याने पाहिले नाही.

या योजनेच्या यशस्वितेसाठी जी पायाभूत सुविधा व आकडेवारी आवश्यक आहे, त्याची कोणतीच तयारी नसताना अत्यंत घाई घाईने अशा धरसोड वृत्तीने वारंवार योजना आणल्याने पतसंस्था चळवळीवर प्रतिकूल परिणाम होत आहे. यासाठी सर्वप्रथम विद्यमान 'ठेव स्थिरीकरण आणि तरलता सहाय्य निधी योजनेबाबतीत अडीअडचणी बाबतीत पुन्हा सर्व स्तरावर व्यापक चर्चा करून मार्ग निघतो का? हे पाहणे आवश्यक आहे. जर यामध्ये कोणताच मार्ग निघत नसेल तर नवीन कोणतीही योजना आणताना त्याची कायदेशीर व व्यावहारिक बाबी तपासण्याच्या उद्देशाने विमा, बँकिंग व पतसंस्था अशा संबंधित क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी व्यक्तींची समिती नेमून त्यांचे सर्वेक्षण अहवालावर सार्वजनिक प्रकटीकरण करून त्यावर सूचना मागवाव्यात व त्यानुसार योजनेत बदल केले तरच ही योजना सामूहिक पातळीवर स्वीकारली जाईल.

सध्या सहकार क्षेत्रातील आर्थिक घटकांपैकी सहकार खात्याचे संपूर्ण नियंत्रण असणारा एकमेव घटक म्हणजे बिगरशेती सहकारी पतसंस्था हा राहिला आहे. आज प्रत्येक पतसंस्थेला ही योजना सकारात्मक बाजूंनी विचार करून लागू व्हावी ही अपेक्षा आहे. बँकांसाठी असणाऱ्या ठेव विमा योजनेमध्ये सर्वात मोठे अंशदान वर्गणीदार हे राष्ट्रीयीकृत व खासगी बँका आहेत आणि विशेष म्हणजे ते आजपर्यंत लाभधारक नाहीत. याउलट नागरी सहकारी बँका या सर्वात कमी अंशदान वर्गणीदार असून, मोठ्या प्रमाणात लाभधारक असल्याचे चित्र आज समोर आहे. त्यामुळे केवळ बँकिंग योजनेनुसार तंतोतंत निकष लावून पतसंस्थासाठी योजना राबवणे व्यवहार्य होणार नाही, याचादेखील व्यावहारिक पातळीवर विचार होण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळ व्याप्ती, अन्य तांत्रिक व प्रशासकीय नियंत्रण मर्यादा तसेच कौशल्य नसलेले मनुष्यबळ या प्रमुख बाबी विचारात घेवूनच शासन सक्रीय व आर्थिक सहभागानंतर शाश्वत स्वरुपात योजना अंमलात आणली तरच ही महत्त्वाकांक्षी योजना कायदेशीर, व्यावहारिक आणि महत्त्वाचे म्हणजे विश्वासार्हतेच्या पातळीवर दीर्घकाळ टिकेल अन्यथा हे पतसंस्थेच्या ठेवीदारांसाठी कायमचे एक 'दिवास्वप्न' ठरून, 'लांडगा आला रे आला' अशी गत होईल.

ठेव सुरक्षा ही पतसंस्था ठेवीदारांची माफक अपेक्षा असून, वारंवार अशा योजना बदलून ठेवीदारांची उपेक्षा थांबवली तरच पतसंस्था चळवळीवरील विश्वासार्हता टिकेल हे देखील निर्विवाद सत्य नाकारून चालणार नाही.

**– गणेश रामचंद्र निमकर, पुणे.**
**बँकिंग सल्लागार मोबाईल – ९८२२५ ६८५५०**
**बी. कॉम, जी. डीसीडए, सी.ए.आय.आय.बी.**
**ई मेल –nimkarganeshgmail.com** ****

**पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे**
स्थापना ४ सप्टेंबर १९१७
मुख्य कार्यालय – ४ ब, बी.जे.रोड, पुणे – ४११ ००१
फोन नं. : ०२० २६३०४१०० www.pdccbank.com

**१०७ वर्षांचा गौरवशाली इतिहास असणारी देशातील अग्रगण्य जिल्हा बँक**

**※ बँकेच्या विविध कर्ज योजना ※**
- शेतीपूरक कारणासाठी अ. मु. कर्ज
- वाहन कर्ज
- सोनेतारण कर्ज
- शेतीकर्ज – शासकीय अनुदानित कर्ज योजना – १०.५०%
- व्यावसायिक कॅश क्रेडिट
- ग्राहक उपयोगी वस्तू कर्ज
- औद्योगिक कर्ज
- गृह कर्ज

**※ बँकेच्या अत्याधुनिक सुविधा ※**
- एनी ब्रँच बँकींग
- आरटीजीएस
- एनईएफटी
- मोबाईल बँकींग
- यूपीआय सुविधा
- ई-कॉमर्स
- लॉकर सुविधा उपलब्ध

※ किफायतशीर व्याजदर ※ जलद कर्ज पुरवठा ※ सुलभ कर्ज प्रक्रिया

**बँकेची आर्थिक स्थिती ३१/०३/२०२५ अखेर**
- ठेवी – १४७६६.८४ कोटी
- कर्जे – १२०५९.०३ कोटी
- एकूण व्यवसाय –२६८२५.८७ कोटी

**आकर्षक व्याजदर**
दि. २३/०६/२०२५ पासून ठेवीवरील व्याजदरात वाढ २ वर्षांकरिता ७.००% (ज्येष्ठ नागरिकांना अधिक १% व्याजदर)

**※ विद्यमान संचालक मंडळ ※**
मा.प्रा.डॉ. दिगंबर गणपत दुर्गाडे – अध्यक्ष
मा. सुनील काशिनाथ चांदेरे – उपाध्यक्ष
मा. अनिरुद्ध यशवंत देसाई – मुख्य कार्यकारी अधिकारी

अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा.

# देशात सहकार क्षेत्र वाढविण्याचा व विस्तार करण्याचा प्रयत्न – पाटील



**इंदापूर, पुणे** – कर्मयोगी शंकरराव पाटील साखर कारखाना आणि ओंकार शुगरच्या सहयोगाने देशात प्रथमच सहकार क्षेत्र टिकविण्याचा आणि अधिक प्रमाणात विस्तारित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, असे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष आणि कारखान्यांचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

कारखान्याच्या उस गाळप हंगामाचा प्रारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, कारखाना आणि ओंकार शुगर यांच्या सहयोगातून प्रथमच सहकार सेक्शन २० नुसार सहकार टिकविण्यासाठी असा प्रयोग करण्यात आला आहे. यावेळी बाबुराव बोत्रे पाटील, जितेंद्र माने यांनी मनोगत व्यक्त केले. नितिन भोसले यांनी सूत्रसंचालन तर भूषण काळे यांनी आभार मानले.

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी जनसेवा सहकारी बँकेचा आर्थिक मदतीचा हात

**पुणे** – सोलापूर आणि मराठवाडा परिसरातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी जनसेवा सहकारी बँकेने सेवा भारती या संस्थेकडे ११ लाख २५ हजार रूपयांचा मदत निधी नुकताच प्रदान केला आहे. बँक अध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ, उपाध्यक्ष रवी तुपे यांनी धनादेश सेवा भारती पदाधिकारी प्रदीप सबनीस, सुधीर जवळेकर, महेंद्र तुपे यांच्याकडे नुकताच दिला आहे. बँक संचालक, अधिकारी, बँक कर्मचारी कल्याण संघटना पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# आर्थिक समानतेकरिता सहकारी संस्थांची गरज!

सध्याची तरुण पिढी... डोळ्यासमोर मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांचे गगनचुंबी टॉवर्स, लाखो-करोडो रुपयांचे व्यवहार आणि जागतिक विस्तार दिसतो. एअर-कंडिशन्ड ऑफिस आणि केवळ कंपनी मालकांची वाढती श्रीमंती या भुरळ पाडणाऱ्या जगात वावरताना, 'सहकारी संस्थांची गरज तरी काय?' हा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होणे अगदी स्वाभाविक आहे. या प्रश्नामागे एक कारण आहे, सहकार देशात रुजण्यापूर्वीची समाजाची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती आजच्या पिढीने पाहिली किंवा अनुभवली नाही. पण जर वास्तवात सहकार का हवा याचे समर्पक उत्तर शोधायचे असेल, तर ते केवळ एकाच तत्त्वात दडलेले आहे - आर्थिक समानता.

सहकारी संस्थांचा मूळ उद्देश समाजातील प्रत्येक नागरिकासाठी 'आर्थिक स्वातंत्र्य' निर्माण करणे हा आहे. देशात गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी (Gap) वाढू नये, आर्थिक सुबत्तासोबतच आर्थिक समानता देखील राहावी, यासाठी सहकार आवश्यक आहे. अर्थशास्त्रात शिकल्याप्रमाणे, 'आहेरे' (Haves) आणि 'नाहीरे' (Have Nots) अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, हा सहकाराचा पाया आहे.



**मंगेश देहडेकर**
**९९२१३०४८११**

आपल्या १५० कोटींहून अधिक लोकसंख्येचा विचार केल्यास, एवढ्या मोठ्या देशात प्रत्येक व्यक्तीपर्यंत संसाधनांचा (Resources) पुरवठा करणे हे एक मोठे आव्हान आहे. जर हे काम केवळ कॉर्पोरेट कंपन्यांवर सोपवले गेले, तर संसाधने केवळ अधिक नफा देणाऱ्या ग्राहकांपर्यंतच पोहोचतील, ज्यामुळे सामाजिक आणि आर्थिक विषमता वाढेल.

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात जेव्हा शेतकरी सावकारांच्या तावडीत होता, तेव्हा पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरा नगर येथे सुरू केला. या एकाच निर्णयामुळे साखर उद्योगात मोठे बदल झाले. या कारखान्यामुळे शेकडो शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले, ज्यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आर्थिक स्थैर्य आले.

आजच्या काळात अनेक तरुण केवळ आकर्षक जाहिरात (Advertising) पाहून शेअर मार्केट, 'पैसे डबल' करणाऱ्या योजना किंवा वर्षानुवर्षे कोणताही ठोस परतावा न देणाऱ्या योजनांमध्ये मोठी रक्कम गुंतवतात. परिणामी, कित्येक लाख कोटी रुपये अशा चुकीच्या आणि अनिश्चित गुंतवणुकीत तरुण वर्गाचे अडकले आहेत. यातील सर्वात गंभीर बाब म्हणजे, आपण गुंतवलेला पैसा नेमका कोणत्या कारणाकरिता वापरला जात आहे, याचा अभ्यास करण्याची तसदीही अनेक गुंतवणूकदार घेत नाहीत.

सहकाराच्या गुंतवणुकीची दुसरी बाजू याच्या अगदी विरुद्ध आहे. सहकारी पतसंस्था आणि बँकांमध्ये गुंतवलेला पैसा हा जाणूनबुजून स्थानिक व्यवसायासाठी, शेतकऱ्यांसाठी आणि सामान्य गरजू नागरिकांच्या कर्जासाठी वापरला जातो. यात पारदर्शकता (Transparency) असल्याने, तुमचा पैसा तुमच्याच परिसरातील विकासासाठी वापरला जातो, ज्यामुळे आर्थिक स्थैर्य आणि विश्वास वाढतो.

अनेकदा सहकारी संस्था बंद पडल्याच्या किंवा त्यांना नुकसान झाल्याच्या बातम्या समोर येतात, ज्यामुळे सहकाराबद्दल नकारात्मक मत तयार होते. मात्र, हा कोणत्याही व्यवसायाचा (Business) भाग आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. कॉर्पोरेट जगतातही मोठ्या कंपन्या बंद पडतात, विलीन होतात किंवा प्रचंड तोटा सहन करतात, पण ही उदाहरणे सहसा 'व्यवस्थापनातील त्रुटी' म्हणून पाहिली जातात.

सहकारी संस्थांच्या बाबतीत काही प्रमाणात जरी नुकसान झाले असले, तरी अनेक संस्थांनी ते विशिष्ट कालावधीत भरून काढले आहे आणि पुन्हा उभ्या राहिल्या आहेत. याचे कारण म्हणजे, सहकारी संस्थेचा पाया हा केवळ नफ्यावर आधारित नसून, सदस्यांच्या विश्वासावर आणि सामूहिक मालकीवर आधारित असतो.

स्थानिक संस्थांना कमी लेखायचे आणि केवळ मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांनाच सक्षम मानायचे, या चुकीच्या समजामुळे नवीन पिढीला सहकाराचे महत्त्व वाटत नाही. वस्तुतः देशाच्या आर्थिक विकासात स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या या सहकारी संस्थांचे योगदान लाखो-करोडो रुपयांचे आहे.

डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (MSCB) ने अनेक दशके राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी मुख्य आधारस्तंभ म्हणून काम केले. जेव्हा मोठ्या राष्ट्रीयकृत बँका ग्रामीण भागात पोहोचत नव्हत्या, तेव्हा याच सहकारी बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा केला.

सहकाराचे विपणन (मार्केटिंग) प्रभावीपणे होत नसल्यामुळे, त्याची व्याप्ती लहान वाटते, पण केवळ महाराष्ट्राचा विचार केल्यास वास्तव किती विशाल आहे, हे लक्षात येईल. राज्यात आजमितीला २०,००० हून अधिक पतसंस्था आणि १५०० हून अधिक सहकारी बँका कार्यरत आहेत.

या संस्थांचा एकूण व्यवसाय ४ लाख कोटींहून अधिक आहे. शहरांमध्ये लाखाहून अधिक गृहनिर्माण संस्था (Housing Societies) आहेत, ज्या 'स्वतःच्या मालकीचे घर' (Shelter) या मूलभूत गरजेसाठी सहकार तत्त्वावर काम करतात. मोठे दूध संघ दररोज लाखो लिटर दुधाचा व्यवसाय करतात, ज्यामुळे लाखो दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना नियमित उत्पन्न मिळते.

थोडक्यात, राज्यातील प्रत्येक घर कोणत्या ना कोणत्या सहकारी संस्थेशी जोडलेले आहेच. अनेक सहकारी संस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेशी थेट जोडलेल्या असल्या तरी, एक महत्त्वाचे आर्थिक सूत्र लक्षात घ्यावे लागते : ग्रामीण भागात पैसा खेळल्याशिवाय शहरी भागात चलन फिरू शकत नाही.

आजची तरुण पिढी कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये आपला वेळ आणि ज्ञान खर्च करून, काही मूठभर श्रीमंतांना अधिक श्रीमंत कसे करता येईल याकरिता काम करत आहे, हे त्यांच्या लक्षात येत नाही. त्यांची प्रतिभा आणि बुद्धिमत्ता एका मर्यादित वर्गाच्या नफ्यासाठी वापरली जाते. जर खरा सहकार या पिढीने जपला आणि त्यात आपला सक्रिय सहभाग नोंदवला, तर देशात केवळ समृद्धी (Prosperity) नव्हे, तर त्यासोबत आर्थिक समानता (Economic Equality) देखील येईल. तुम्ही केवळ एका व्यक्तीसाठी काम न करता, हजारो सभासदांसाठी काम कराल आणि त्यांची सामूहिक प्रगती साधाल.

शहरातील कॉर्पोरेट कार्यालये आणि काचेचे टॉवर्स तेव्हाच टिकतील, जेव्हा ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम असेल. ही ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्याचे आणि येथील नागरिकांच्या हातात आर्थिक ताकद देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सहकार चळवळ करते. त्यामुळे, सहकार ही केवळ जुनी संकल्पना नसून, ती भारतीय व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातील आर्थिक स्थैर्याचा आणि राष्ट्रीय समानतेचा अदृश्य आधारस्तंभ आहे, हे तरुण पिढीने लक्षात घेणे आवश्यक आहे.


**- मंगेश देहडेकर, पुणे.**
**सहकार प्रशिक्षक**
**मो.नं. - ९९२१३०४८११**


*****

# आपली ओळख आपली सुरक्षितता : KYC आणि AML चे महत्त्व

आजच्या या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढणाऱ्या काळात व्यवसायामध्ये कोणाशी व्यवहार केला जात आहे, हे जाणून घेणे अत्यावश्यक झाले आहे. कारण यामुळे फसवणूक, मनी लाँडरिंग आणि दहशतवाद वित्तपुरवठा यांसारख्या संभाव्य धोक्यांपासून संरक्षण मिळते. आजच्या या डिजिटल युगात व्यवसायातील सर्वात महत्त्वाचे चलन म्हणजे 'विश्वास' हेच आहे. कारण आर्थिक संस्थेत जर पाया मजबूत ठेवायचा असेल तर पारदर्शक व्यवहार आणि ग्राहकाशी प्रामाणिक नाते ही महत्त्वाची भूमिका आहे आणि यात KYC ही अतिशय महत्त्वाची भुमिका बजावते. आर्थिक संस्थेत KYC म्हणजे फक्त ग्राहक ओळख नाही तर तो व्यवहारिकदृष्ट्या प्रामाणिक आहे का? ते तपासणे आणि आर्थिक जोखीम टाळणे, हा मुख्य हेतू आहे. व्यवसायात आपला ग्राहक ओळखा ही संकल्पना नेहमीच महत्त्वाची राहिली आहे. KYC पद्धतीची सुरूवात १९७० साली अमेरिकेतील Bank Secrecy Act (BSA) या कायद्यान्वये झाली. नंतर पुढे Anti-Money Laundering (AML) नियम आले. ज्यांत ग्राहकांची ओळख पडताळणी अनिवार्य करण्यात आली. पुढे १९७० आणि १९८०च्या दशकात माफिया, ड्रग तस्करी आणि आर्थिक गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याने अधिक कडक नियम लागू केले. १९८९ साली पॅरिस येथे झालेल्या G7 शिखर परिषदेत Financial Action Task Force (FATF) या आंतरराष्ट्रीय संस्थेची स्थापना करण्यात आली. ही संस्था मनी लाँडरिंग, दहशतवाद वित्तपुरवठा आणि आर्थिक गुन्ह्यांविरूद्ध जागतिक स्तरावर लढण्याच्या उद्देशाने स्थापन झाली. FATF ने ४० शिफारशी जारी केल्या आहेत, ज्या जागतिक स्तरावर मानक (Standard) मानले जातात. या शिफारसीमध्ये तीन प्रमुख घटक होते. ग्राहक ओळख, ग्राहक दक्षता आणि सतत निरीक्षण. यानंतर पुढे १९९० च्या दशकात सुरुवातीला पहिल्यांदा Bank of England ने KYC मार्गदर्शक तत्त्वे सादर केली ज्यामध्ये ग्राहकांची अचूक पडताळणी, माहिती संकलन, व्यवहारांचे निरीक्षण यांवर अधिक भर देण्यात आला.

११ सप्टेंबर २००१ मध्ये अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेने USA PATRIOT Act लागू केला. या कायद्यानुसार प्रत्येक आर्थिक संस्थेला Customer Identification Program (CIP) लागू करणे बंधनकारक झाले आणि यामुळे ग्राहकांची ओळख आणि व्यवहार अधिक काटेकोरपणे तपासले जावू लागले.

भारताने ही २००२ मध्ये संसदेत Prevention Money Laundering Act (PMLA) मंजूर केला आणि २००५मध्ये सदर कायदा लागू केला. पुढे २०१२, २०१५, २०१९,२०२३ मध्ये सदर कायद्यात दुरुस्ती करून हा कायदा अधिक कठोर व व्यापक करण्यात आला.

भारतात २००० च्या दशकात इंटरनेट आणि डिजिटल साधनांच्या वापरांमुळे केवायसी प्रक्रियेत क्रांती झाली. डिजिटल व्हेरीफिकेशन तसेच आज अनेक संस्था AI (Artificial Intelligence) आणि Machine Learning वापरून मोठ्या प्रमाणावर ग्राहक डेटा विश्लेषण करतात, ज्याद्वारे फसवणूक टाळण्यात येतात. या सर्व तंत्रज्ञानामुळे KYC प्रणाली अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक बनल्या आहेत. KYC हे आर्थिक संस्था सदृढ आणि पारदर्शक बँकिंग व्यवस्थेचा मुख्य भाग आहे.




आजच्या डिजिटल आणि आर्थिक जगात ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी शिक्षण आणि जागरूकता अत्यंत महत्त्वाची आहे. यासाठी आर्थिक संस्था / बँक व ग्राहक यांनी KYC (Know Your Customer), AML (Anti-Money Laundering) आणि CFT (Combating Financing of Terrorism) जाणून घेणे फार महत्त्वाचे आहे.

ग्राहकांना प्रामुख्याने पडणारा प्रश्न म्हणजे KYC आणि AML, CFT म्हणजे काय ?

KYC म्हणजे Know Your Customer याचा अर्थ 'आपल्या ग्राहकाला ओळखा' हा आहे. याचा मुख्य उद्देश ग्राहकाची ओळख, पत्ता आणि व्यवहारांचे स्वरूप यांची खात्री करणे हा आहे. KYC प्रक्रियेमुळे संस्थेला खात्री होते की, ग्राहकाचे खाते वैध आहे, ग्राहकाचा आर्थिक व्यवहार प्रामाणिक आहे आणि संस्थेचा वापर कोणत्याही आर्थिक गैरव्यवहारासाठी होत नाही.

AML म्हणजे Anti Money Laundering आहे आणि याचा अर्थ गुन्हेगारी मार्गाने आलेला पैसा बेकायदेशीररीत्या व्यवहारात आणण्यापासून रोखणे असा आहे. यामध्ये अशा व्यवहारांवर लक्ष ठेवणे जे संशयास्पद किंवा अवैध आर्थिक व्यवहाराशी संबंधित असू शकतात. आणि संबंधित नियामक प्राधिकरणांना संशयास्पद व्यवहार अहवाल देणे.

CFT म्हणजे Combating the Financing of Terrorism आहे आणि याचा अर्थ दहशतवादासाठी पैसा पुरवण्यावर नियंत्रण ठेवणे. यामध्ये जर कोणी एखाद्या खात्यातून दहशतवादी गटाला पैसे पाठवले तर बँक/ आर्थिक संस्था असे व्यवहार ओळखून ते थांबवणे.

KYC मार्गदर्शक तत्त्वांनुसार KYC मध्ये ग्राहक स्वीकारण्याचे धोरण, ग्राहक ओळखण्याची प्रक्रिया, जोखमीचे व्यवस्थापन आणि व्यवहारांचे निरीक्षण, ग्राहक पडताळणी तसेच, सतत निरीक्षण हे घटक प्रामुख्याने दिलेले आहेत, ज्यांचे पालन आर्थिक संस्था / बँका यांना बंधनकारक केलेले आहे.

आर्थिक संस्था / बँका यांच्याकडून सेवा घेणारा किंवा व्यवहार करणारा प्रत्येक सभासद किंवा व्यक्ती म्हणजेच संस्थेचा ग्राहक आहे. ज्यात प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. एक नैसर्गिक व्यक्ती व दुसरी कायदेशीर व्यक्ती. ज्यामध्ये नैसर्गिक व्यक्ती म्हणजे जिवंत मनुष्य, ज्याला कायद्यानुसार स्वतःची ओळख, हक्क आणि जबाबदाऱ्या असतात. कायदेशीर व्यक्ती म्हणजे अशी संस्था, संघटना, कंपनी ज्याला कायद्यानुसार स्वतंत्र ओळख आणि अधिकार दिलेले असतात. ज्यामध्ये लाभार्थी धारक हा व्यक्ती म्हणून परिभाषीत केला आहे आणि तो प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ग्राहक हा मालक आहे किंवा त्याच्या वतीने व्यवहार चालविला जातो तो आहे. तसेच ज्याच्याकडे कायदेशीर व्यक्तींकडे नियंत्रण आहे, ज्यामध्ये शेअर होल्डिंग, व्यवस्थापन अधिकार, नफा किंवा भांडवलाचे अधिक प्रमाण, वरिष्ठ व्यवस्थापन अधिकार अशा प्रकारे तो ग्राहक लाभधारक मानला जातो.

ग्राहकाने आपली ओळख प्रस्थापित करण्यासाठी कायद्यानुसार अधिकृत वैध कागदपत्रे खालीलपैकी सादर करणे आवश्यक आहे.

१. पासपोर्ट.

२. ड्रायव्हिंग लायसन्स.

३. आधार क्रमांकाचा पुरावा.

४. भारताच्या निवडणूक आयोगाने जारी केलेला मतदार ओळखपत्र.

५. नोकरीचे कार्ड, जो राज्य सरकारच्या अधिकाऱ्याने सही केलेला असावा.

६. राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणीद्वारे जारी केलेले पत्र, ज्यामध्ये नाव आणि पत्ता यांचा तपशील असावा.

उपरोक्त कागदपत्रांमध्ये पॅन कॉर्ड हे अधिकृत वैध कागदपत्र धरले जात नाही. PAN ( Permanent Account Number) हे आयकर विभागाने दिलेले करसंबंधित दस्तऐवज आहे. ज्याचा मुख्य उद्देश फक्त आर्थिक व्यवहारात व्यक्तींची कर संबंधित ओळख पटविणे हा आहे.

ग्राहकाने जर सादर केलेले अधिकृत वैध दस्तऐवजामध्ये अद्ययावत पत्ता सामाविष्ट करत नसल्यास, पत्त्याच्या पुराव्यासाठी मर्यादित उद्देशाने खालील दस्तऐवज किंवा त्यांचे समकक्ष ई-डॉक्युमेंट OVD म्हणून मानले जातात :

१. कोणत्याही सेवा प्रदात्याचे बिल, जे दोन महिन्यांपेक्षा जुने नसावे. (विज बिल, दूरध्वनी, पोस्ट पेड मोबाईल फोन बिल, पाईप गॅस अथवा पाणी बिल)

२. मालमत्ता किंवा नगरपालिका कराची पावती.

३. सरकारच्या विभागांकडून निवृत्त कर्मचाऱ्यांनी जारी केलेले पेंशन किंवा कौटुंबिक पेंशन पेमेंट ऑर्डर (PPOs), जर त्यात पत्ता समाविष्ट असेल.

४. राज्य सरकार किंवा केंद्रीय सरकारच्या विभागांकडून, विधायी किंवा नियामक संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, शेड्यूल्ड वाणिज्य बँका, आर्थिक संस्था आणि सूचीबद्ध कंपन्याद्वारे जारी केलेली कामाच्या ठिकाणच्या पत्राची संमतीपत्रे, ज्यामध्ये अधिकृत निवासाचे ठिकाण असावे.




ग्राहकाची ओळख सत्यापित करण्यासाठी, पुरावा दर्शवणारे किंवा प्रमाणित प्रत करताना पुरावा दर्शवणारे दस्तऐवजामध्ये समकक्ष ई डॉक्युमेंट स्विकारले जातात. हे समकक्ष इ-डॉक्युमेंट म्हणजे एक इलेक्ट्रॉनिक समकक्ष दस्तऐवज, जो संबंधित दस्तऐवज जारी करणाऱ्या प्राधिकरणाने त्याच्या वैध डिजिटल स्वाक्षरीसह जारी केलेला असतो. यामध्ये डिजिटल लॉकर उदा. https://digilocker.gov.in ज्यामध्ये लॉगिन करून अधिकृत दस्तऐवज मिळतात तसेच, खातेदार डिजिटल सही ज्यामध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा प्रक्रियेद्वारे कोणत्याही इलेक्ट्रॉनिक रेकॉर्डला प्रमाणित केले जाते. यामध्ये डिजीलॉकर सह https://cca.gov.in/eSign.html वेबसाईड मध्ये eSign आधारीत डिजिटल स्वाक्षरी सेवा ज्यांमध्ये दस्तऐवजांना डिजिटल स्वरूपात स्वाक्षरी करता येते आणि असे दस्तऐवज अधिकृत मानले जातात. डिजिटल KYC च्या माध्यमातूनही ग्राहकाचा थेट फोटो आणि अधिकृत वैध कागदपत्र कॅप्चर करून ती स्वीकारली जातात. व्हिडिओ आधारीत ग्राहक ओळख प्रक्रिया ज्यामध्ये ग्राहक चेहरा ओळख व ग्राहक पडताळणी अधिकृत अधिकारीद्वारे करण्यात येते. यामध्ये ऑडिओ व व्हिडिओ माध्यमातून संवाद साधला जातो जो कायदेशीररित्या ग्राहक ओळख प्रक्रियेसारखे समजले जाते.

आर्थिक संस्था / बँकामध्ये ग्राहकांचा KYC आयडेंटीफायर सीआयएफ CIF (Customer Identification File) म्हणून ओळखली जाते. CIF हा ग्राहकाचा Unique Identification Number असतो. ज्यामध्ये संपूर्ण ग्राहक प्रोफाईल माहिती एकत्र साठवली असते. ग्राहक वैयक्तिक माहिती, व्यवसायिक माहिती, आर्थिक माहिती इ. नोंद असते. ग्राहकाचे कितीही खाते असले तरी सीआयएफ क्रमांक एकच असतो. त्या क्रमांकाद्वारे ग्राहकांची संपूर्ण माहिती मिळते आणि ग्राहक तपासणी




प्रक्रियेत हा महत्त्वाचा घटक असतो.

ग्राहक ओळख प्रक्रिया व ग्राहक स्विकारण्याचे धोरण नंतर ग्राहकांचे प्रोफाईलनुसार जोखीम वर्गीकरण केले जाते. ज्यामध्ये कमी जोखीम, मध्यम जोखीम, उच्च जोखीम असे तीन प्रकारात वर्गीकरण आर्थिक संस्थाद्वारे केले जाते. ज्यामध्ये ग्राहक प्रोफाईलसह खात्यावरील व्यवहार आणि प्रोफाईलशी सुसंगत व्यवहार, उत्पन्नाचा स्तोत्र, ग्राहकाची पार्श्वभूमी, व्यवसायाचे स्वरूप, स्थान, देश, निधीचा स्तोत्र, राजकीय व्यक्ती, प्रत्यक्ष भेटीविना उघडलेली खाती, स्लिपींग पार्टनर, ट्रस्ट, धर्मादाय संस्था, एनजीओ आणि देणग्या प्राप्त करणाऱ्या संस्था, उच्च व्यवहार करणारे खाती, रोख आधारित व्यवसाय, इन ऑपरेट तसेच ब्लॉक केलेली खाती इ. च्या आधारावर तीन गटात वर्गीकरण केले जाते. कमी जोखीम, मध्यम जोखीम व उच्च जोखीम आणि सदर गटांच्या वर्गीकरणानुसार अनुक्रमे कमी जोखीम ग्राहकांची केवायसी दर १० वर्षांनी, मध्यम जोखीम ग्राहकांची केवायसी ८ वर्षांनी तसेच उच्च जोखीम ग्राहकांची केवायसी २ वर्षांनी करण्यात येते.

मनी लॉन्ड्रिंग प्रतिबंध कायदा २००२ च्या कलम १३ (२) (ब) अंतर्गत निर्देश देण्यात आले आहेत. आर्थिक संस्था, रिर्पोटिंग इंटीटी यांना FIU-IND च्या FINNET पोर्टलवर (https://finnet.gov.in) स्वतःची नोंदणी करावी लागते आणि त्यांच्या कार्यरत कर्मचारींमधून नामांकित संचालक आणि मुख्य अधिकारी यांची नियुक्ती करावी लागते व नियमानुसार असणारे अहवाल त्यांना सादर करावे लागतात. सदर अहवाल प्रकारामध्ये प्रामुख्याने CTR - Cash Transaction Report आहे. यामध्ये कोणत्याही आर्थिक संस्था, बँक किंवा सहकारी संस्थांमध्ये जर खातेदाराने खात्यांत रोखीने १० लाखांपेक्षा अधिक नावे व्यवहार झाला असल्यास त्यांची नोंद CTR स्वरूपात FIU-IND कडे पाठवावा लागतो. यामध्ये रु. ५०,०००/- पेक्षा खालील वैयक्तिक व्यवहारांची माहिती देणे आवश्यक नाही. STR - Suspicious Transaction Report आहे. यामध्ये संस्थेला कोणताही व्यवहार संशयास्पद वाटला म्हणजे त्यामागे उद्देश स्पष्ट नाही, ग्राहक प्रोफाईलशी जुळत नाही किंवा आर्थिक गुन्ह्यांशी संबंधित वाटतो तो STR स्वरूपात FIU-IND कडे पाठवावा लागतो. NTR - Non Profit Organisation Report आहे. यामध्ये NGO/Trust कडून झालेल्या व्यवहारांवर लक्ष ठेवण्याच्या अनुषंगाने हा अहवाल तयार केला जातो. CCR - Counterfeit Transaction Report आहे. यामध्ये कोणत्याही आर्थिक संस्था/ बँकेला जर खोटी नोट सापडली तर त्या संदर्भात CCR अहवाल FIU-IND कडे पाठवावा लागतो. CBWTR - Cross Border Wire Transfer

पुढील पानावर...

# आपली ओळख आपली सुरक्षितता : KYC आणि AML चे महत्व

Report आहे. यामध्ये कोणत्याही आर्थिक संस्था / बँकेला भारतातून बाहेर किंवा भारतात आलेला रू. ५ लाखापेक्षा अधिक परकीय निधी हस्तांतरण झाल्यास त्या व्यवहाराची नोंद CBWTR मध्ये केली जाते व त्याचा रिपोर्ट FIU-IND कडे पाठवावा लागतो. सदर नियामक संस्था जमा केलेल्या डेटा आधारित परीक्षण करते, संशयास्पद व्यवहार ओळखणे तसेच, तपास संस्था आणि इतर एजन्सींना त्यांची माहिती पुरवते आणि जागतिक आर्थिक गुन्हेगारी नेटवर्कशी समन्वय ठेवते.

युनायटेड नेशन्स (संयुक्त राष्ट्र संघ) वेळोवेळी दोन याद्या प्रसिद्ध केल्या जातात. यामध्ये दहशतवादाशी संबंधित असल्याचा संशय असलेल्या व्यक्ती आणि घटकांचा समावेश असतो आणि या यादी युनायटेड नेशन्स कौन्सिल UNSC द्वारे मंजूर झालेल्या असतात. ज्यामध्ये ISIL (Da'esh) आणि अल कायदा निर्बंध यादी ज्यामध्ये ISIL (Da'esh) आणि अल कायद्याशी सबंधित व्यक्ती, गट, संस्था आणि घटक यांची नावे उपलब्ध आहेत. तसेच १९८८ निर्बंध यादी ज्यामध्ये तालीबानशी संबंधित व्यक्ती (Section A) आणि (Section B) संस्था यांचा समावेश आहे. आर्थिक संस्था / बँका अशा व्यक्ती, संस्थेशी व्यवहार केला जात नाही. त्यांची मालमत्ता / निधी संस्थेत आहे किंवा नाही हे पडताळणी केली जाते आणि अशा व्यक्तींची यादीशी ताळमेळ राखत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचा अहवाल FIU-IND कडे पाठवावा लागतो.




भारत सरकारने बेकायदेशीर कृतिबंधक कायदा UAPA (Unlawful Activity Prevention Act), 1967 हा देशाच्या एकात्मतेला, सुरक्षतेला किंवा शांततेला धोका निर्माण करणाऱ्या बेकायदेशीर कृतींना थांबवण्यासाठी तयार केला आहे. त्याअनुषंगाने खातेदार ओळख अतिशय महत्वाची आहे. दहशतवादी संघटना किंवा व्यक्ती आढळल्यास त्यांना आर्थिक सेवा देणे हा गुन्हा ठरतो. बेकायदेशीर कृती प्रतिबंध अधिनियम १९६१ च्या ५१ अ अंतर्गत बेकायदेशीर कृती करणाऱ्या त्या व्यक्ती किंवा संस्था यांना लाभ घेण्यासाठी निधी, आर्थिक मालमत्ता किंवा आर्थिक स्तोत्र किंवा संबंधित सेवा उपलब्ध करून देणे वर प्रतिबंध आहे. केंद्र सरकारला या कलमानुसार निधी, संपत्ती किंवा खाते फ्रीज करण्याचा अधिकार आहे. तसेच वस्तुमान विनाशकारी शस्त्रे आणि त्यांची वितरण प्रणाली बेकायदेशीर प्रतिबंध कायदा हा २००५ मध्ये भारत सरकारने तयार केला आहे. यामध्ये अणवस्त्रे, रासायनिक अस्त्र, जीवशास्त्रीय अस्त्र अशा जनसंहारक अस्त्रांचा आणि त्यांची वितरण प्रणाली, अवैध वापर, उत्पादन, साठवण हस्तांतरण किंवा विक्री यांना थांबवण्यासाठी आहे. त्याअनुषंगाने कोणत्याही आर्थिक संस्था / बँका यासाठी आर्थिक मदत देऊ नये. यासाठी संशयास्पद व्यवहार होत असल्यास त्याची माहिती नोंदवली जाऊ शकते. त्यामुळे आर्थिक संस्था / बँका यांनी खात्यांचे व्यवहार तपासणी करावी आणि ग्राहकाने ही अशा दहशतवादी किंवा जनसंहारक क्रियाकल्पांशी संबंधित व्यक्ती / संस्थेला आर्थिक मदत करू नये. समाजात शांतता, सुरक्षितता हे मानवतेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

ग्राहक या नात्याने खातेदाराने आपली संपूर्ण सत्य व अचूक माहिती देणे ही जबाबदारी आहे. आपल्या माहितीमध्ये उदा. पत्त्यामध्ये बदल, मोबाईल क्रमांक बदल इ. झाल्यास संस्था / बँक यांना कळवणे आवश्यक आहे. ग्राहकाने खातेसंबंधित आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा अशा ग्राहकांचे खाते बंद किंवा ब्लॉक करण्याचे अधिकार संस्था / बँकांना असते. ग्राहकानेही लक्षात ठेवले पाहिजे, आर्थिक संस्था / बँक अति मोठी रक्कम, रक्कम जमा करणे काढणे, गुंतागुंतीचे व्यवहार अशा व्यवहारांची माहिती आर्थिक संस्था/ बँक विचारू शकते. आपली ओळख व व्यवहार अद्ययावत ठेवणे, व्यवहारांची योग्य माहिती देणे. आर्थिक संस्था/ बँकेने आपले व्यवहार किंवा खात्याविषयी वेगळे प्रश्न विचारले तर त्याला कृपया गैर समजू नये. आपले खाते व्यवहार सुरक्षित ठेवणे आणि संस्थेमध्ये विश्वासार्ह वातावरण निर्माण करणे ही नैतिक जबाबदारी ग्राहकाची आहे.

अनेक आर्थिक संस्था/ बँक या डिजीटल बँकिंग अनुषंगाने पाऊल उचलत आहे. त्याद्वारे डिजिटल माध्यमातून ग्राहक KYC पूर्तता करण्यात येत आहे. ग्राहक संवादात पारदर्शकता निर्माण होणे, हेही अतिशय महत्त्वाचे आहे. डिजिटल KYC मध्ये ही अनेक तांत्रिक अडचणी उद्‌भवत आहे. ग्रामीण भागात दस्तऐवजाचा अभाव तसेच तंत्रज्ञानाचा अभाव अशा अनेक अडचणी व समस्या उद्‌भवत आहे. ग्राहकांची जागरूकता याबाबत कमी आहे. ग्राहकांना याबाबत प्रशिक्षण व माहिती देणे अतिशय महत्त्वाचे आहे.

वित्तीय संस्था / बँका नवीन AI तंत्रज्ञानाच्या आधारावर अधिक सुरक्षितता व सावधगिरी बाळगण्याचे कार्य करत आहे. कारण पारंपरिक आणि प्रक्रिया म्यॅन्युअल असल्याने अनेक समस्या निर्माण होत आहेत उदा. कागदपत्र पडताळणी, मोठ्या व्यवहारांवर निरीक्षण, चुकीचे अलर्ट, ग्राहक ऑनबोर्डिंग वेळ लागणे इ. आता AI तंत्रज्ञानाच्या आधारावर जलद, अचूक आणि पारदर्शक प्रक्रिया होत आहेत. यामध्ये Automated Identity Verification, Biometric Verification, Risk Profiling, Data Cross Verification, Suspicious Transaction, Pattern Recognition, Real Time Monitoring आहेत. ज्याद्वारे ग्राहकांचा विश्वास, आर्थिक नियमांचे पालन आणि आर्थिक सुरक्षितता यामध्ये मिळते. या डिजिटल बँकींग अनुषंगाने अधिक अधिक फायदा ग्राहक व आर्थिक संस्था / बँक यांना होत राहणार आहे.

आजच्या डिजिटल आणि जलद बँकिंग युगात KYC आणि AML ही कायदेशीर प्रक्रिया नाही तर आपल्या खात्याची, पैशाची आणि ओळखीची सुरक्षा करणारी अत्यावश्यक ढाल आहे. KYC, AML प्रक्रिया आर्थिक संस्था/ बँक असली तरी फसवणूक टाळण्यासाठी ग्राहक व आर्थिक संस्था / बँक दोघांचीही समान भूमिका आहे.

आजच्या या जागतिकीकरणाच्या स्तरावर वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांमुळे आपली वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे, ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. सुरक्षित बँकिंग ही केवळ आर्थिक संस्था / बँक जबाबदारी नाही तर जागृत ग्राहकाची ओळख आहे.

चला, सुरक्षित बँकिंगची सवय लावूया... आणि जागरूक ग्राहक बनूया... आपली सुरक्षितता... आपल्या हातात...

**– रवि चंद्रकांत वांगडे**
(B.Com, G.D.C. A, HDCM, ADIT, PGDM, MBA)
**शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित**

*****

# सहकारी संकल्पनेतून हरित ऊर्जा : ऊस सह. संस्थांसाठी आदर्श

महाराष्ट्रातील कोपरगाव येथे सहकार महर्षि शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याने देशातील पहिली सहकारी संकल्पनेवर आधारित कंप्रेस्ड बायोगॅस (Cooperative Compressed Biogas) प्रकल्प सुरू केला. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते झालेले उद्घाटन केवळ ऊस अवशेषांपासून स्वच्छ इंधन निर्मितीपुरते मर्यादित नाही, तर शेतकऱ्यांच्या मालकीच्या सहकारी उद्योगाद्वारे ग्रामीण भागात हरित उर्जा निर्माण करून शेतकरी सक्षमीकरणाचा नवा मार्ग उघडतो.

**कोपरगाव येथील सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचा CBG प्रकल्प हा भारतातील सहकार क्षेत्राच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. हा प्रकल्प दाखवतो की सहकार, तंत्रज्ञान आणि शाश्वतता यांचा संगम साधल्यास ग्रामीण भारतात आर्थिक समृद्धी आणि पर्यावरणीय संतुलन दोन्ही घडवता येते. ऊस सहकारी संस्था शेतकऱ्यांच्या मालकीचे हरित ऊर्जा केंद्र बनून ऊर्जा स्वावलंबन, आर्थिक स्थैर्य आणि पर्यावरण संरक्षण या त्रिसूत्रीचा आदर्श उभारतात. हा प्रकल्प केवळ ऊर्जेचा नव्हे तर सहकाराच्या नव्या हरित युगाचा आरंभ आहे.**

**※ CBG म्हणजे काय ?**

कंप्रेस्ड बायोगॅस (CBG) हे जैविक स्रोतांपासून तयार होणारे स्वच्छ, पुनर्निर्मित (renewable) आणि पर्यावरणपूरक इंधन आहे. शेतीतील पाला पाचोळा, पशुविष्ठा, ऊसाचे प्रेस मड, पेंढा, सेंद्रिय कचरा इ.पासून तयार होणाऱ्या बायोगॅसचे शुद्धीकरण करून त्यातील मिथेन वेगळे केले जाते आणि उच्च दाबाने द्रव स्वरूपात साठवून Compressed Biogas (CBG) तयार केला जातो. हे इंधन CNG (Compressed Natural Gas) सारखेच असून, वाहतूक, उद्योग आणि घरगुती वापरासाठी उत्कृष्ट पर्याय ठरते. त्यामुळे CBG आणि सहकार यांची सांगड हा शाश्वत विकासाचा खऱ्या अर्थात अनोखा आणि प्रेरणादायी प्रयोग ठरतो.



**वैजंतीमाला केंद्रे**
**संशोधन अधिकारी,**
**वॅमनिकॉम, पुणे**

**※ सहकारी व्यवसाय मॉडेलचे महत्त्व –**

शेतकरी वैयक्तिक पातळीवर ऊसाचा पेंढा, प्रेस मड किंवा इतर घटक वापरून मोठ्या प्रमाणावर बायोगॅस तयार करू शकत नाहीत. परंतु सहकारी संस्थांकडून मूल्यवर्धन करणे शक्य आहे. नफा, खर्च व जोखीम हे सर्व सदस्यांत समानपणे विभागले जातात.

- शेतकऱ्यांना थेट अतिरिक्त उत्पन्नाचे साधन मिळते.
- शासन व बँकांकडून वित्तपुरवठा मिळवणे सहकारी संस्थेला सोपे जाते.

यामुळे सीबीजी (CBG) प्रकल्प ही केवळ तांत्रिक प्रगती नाही, तर शेतकऱ्यांच्या मालकीचा आदर्श सहकारी उद्योग ठरतो,

**※ सहकारी संस्थांसाठी नवीन उत्पन्नाचा स्रोत –**

सीबीजी (CBG) प्रकल्प केंद्र सरकारच्या राष्ट्रीय बायोएनर्जी प्रोग्राम आणि गोबर धन मिशनशी सुसंगत आहे, जे स्वच्छ इंधन निर्मितीसाठी कृषि कचऱ्याचा वापर करण्यास प्रोत्साहन देतात. या सुविधेत ऊसाच्या प्रेस मड, शेतातील उरलेला पालापाचोळा आणि इतर सेंद्रिय कचऱ्याचे प्रक्रिया करून स्वच्छ ज्वलनक्षम बायोगॅस तयार केला जाईल, जो बाटलीबद्ध करून वाहतूक, उद्योग आणि ग्रामीण ऊर्जा उपयोगात CNGचा पर्याय म्हणून पुरवला जाऊ शकतो. कृषी व सेंद्रिय कचरा कंम्प्रेस्ड बायोगॅसमध्ये रूपांतरित केल्यास जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी होईल, कार्बन उत्सर्जन कमी होईल आणि शेतकऱ्यांसाठी नवीन उत्पन्नाचा स्रोत खुला होईल, जे बायोगॅस पुरवठा करू शकतो.

**※ शेतकऱ्यांसाठी फायदे –**

- **अतिरिक्त उत्पन्न :** ऊसाची पाचट विकून शेतकऱ्यांना साखरेबरोबरच नवा महसूल मिळतो.
- **खर्चात बचत :** सहकारी संस्थेने तयार केलेला बायोगॅस शेतीसाठी स्वस्तात उपलब्ध होतो.
- **रोजगारनिर्मिती :** प्रकल्पासाठी लागणारे तंत्रज्ञ, मजूर व वाहतूक यामुळे स्थानिक रोजगार वाढतो.
- **सक्षमीकरण :** निर्णय प्रक्रियेत शेतकऱ्यांचा थेट सहभाग असल्याने नेतृत्त्व गुण विकसित होतात.

**※ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संलग्नता –**

कोपरगाव येथील सहकारी कंप्रेस्ड बायोगॅस (CBG) प्रकल्प हा केवळ स्थानिक नवकल्पना नसून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील शाश्वत ऊर्जा उपक्रमांशी सुसंगत आहे.

**※ राष्ट्रीय स्तरावरील संलग्नता :**

हा प्रकल्प केंद्र सरकारच्या राष्ट्रीय बायोएनर्जी कार्यक्रम (National Bioenergy Programme) आणि गोबर धन मिशन (GOBAR-Dhan Mission) या उपक्रमांशी थेट जोडलेला आहे. या दोन्ही कार्यक्रमांचा उद्देश कृषि आणि सेंद्रिय कचऱ्याचा उपयोग करून स्वच्छ, नवीकरणीय आणि परवडणारे इंधन तयार करणे तसेच ग्रामीण भागात ऊर्जा स्वावलंबन घडवणे हा आहे. कोपरगाव प्रकल्पातून ऊसाच्या प्रेस मड, पाचट, पालापाचोळा आणि इतर सेंद्रिय कचऱ्याचे प्रक्रियायुक्त रूपांतर होऊन स्वच्छ, ज्वलनक्षम बायोगॅस तयार केला जातो. हा गॅस शुद्धीकरणानंतर बाटलीबद्ध करून CNG चा पर्याय म्हणून वाहतूक, उद्योग आणि ग्रामीण ऊर्जा क्षेत्रात वापरला जाऊ शकतो. या उपक्रमामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते, पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर वाढतो आणि भारताच्या राष्ट्रीय हरित ऊर्जा धोरण (National Green Energy Policy) तसेच ऊर्जा संक्रमण उद्दिष्टांना

**पुढील पानावर...**



(Energy Transition Goals) बळकटी मिळते.

**✻ आंतरराष्ट्रीय स्तरावरील संलग्नता :**

याचबरोबर, हा प्रकल्प संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी (Sustainable Development Goals - SDGs) घनिष्ठ सुसंगती साधतो. जसे की, ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर **स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जा उपलब्ध करून देतो** (SDG 7 **स्वस्त आणि स्वच्छ ऊर्जा**), स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती आणि शेतकऱ्यांचे **उत्पन्नवर्धन करतो** (SDG 8 **सन्मानजनक रोजगार आणि आर्थिक वाढ**), तसेच कृषि कचऱ्याचा पुनर्वापर करून **वर्तुळाकार अर्थव्यवस्थेला बळकटी देतो** (SDG 12 **जबाबदार उपभोग आणि उत्पादन**). CBG निर्मितीमुळे जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी होते आणि कार्बन उत्सर्जनात घट येते (SDG 13 **हवामान कृती**), ज्यामुळे हवामान बदलाशी प्रभावीपणे लढा देता येतो. शेवटी, हा प्रकल्प सहकारी संस्थांच्या सामूहिक प्रयत्नांवर आधारित असून शासन, उद्योग आणि शेतकरी यांच्यातील प्रभावी भागीदारीचे (SDG 17 **भागीदारीद्वारे उद्दिष्ट साध्य**) आदर्श उदाहरण ठरतो.




याशिवाय, हा प्रकल्प पॅरिस हवामान करार (Paris Climate Agreement) आणि नेट झिरो एमिशन लक्ष्य २०७० (Net Zero Emission Target 2070) यांसारख्या आंतरराष्ट्रीय पर्यावरणीय करारांनाही पूरक आहे, कारण तो भारताच्या कार्बन उत्सर्जन घटविण्याच्या दीर्घकालीन धोरणास हातभार लावतो.

अशा प्रकारे, कोपरगावचा सहकारी CBG प्रकल्प हा **राष्ट्रीय धोरणात्मक कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय हवामान करार आणि शाश्वत विकास उद्दिष्टे** (SDGs) यांचा संगम साधणारा, भारताच्या सहकार क्षेत्रातील हरित औद्योगिकीकरणाचा एक अग्रगण्य उपक्रम ठरेल.

**✻ ग्रामीण औद्योगिकीकरणाचा आदर्श –**

हा प्रकल्प शाश्वत ग्रामीण औद्योगिकीकरणाची सुरुवात करतो. शेतकऱ्यांच्या मालकीचा हरित ऊर्जा उद्योग हा केवळ तांत्रिक नवोन्मेष नसून सामाजिक परिवर्तनाचाही भाग आहे.

- ग्रामीण भागात ऊर्जा, अर्थव्यवस्था आणि पर्यावरण यांचा समन्वय घडवतो.
- ग्रामीण युवकांसाठी रोजगार व उद्योजकतेची नवीन संधी उपलब्ध होते.
- सहकार क्षेत्र 'कृषि आधारित उद्योगांचे केंद्र' बनते.

**✻ भविष्यातील दृष्टीकोन** – कोपरगावचा अनुभव इतर ऊस सहकारी कारखान्यांसाठी प्रेरणादायी ठरू शकतो. महाराष्ट्र आणि देशातील इतर साखर सहकारी संस्था जर या मॉडेलचा अवलंब करतील, तर कृषी कचऱ्याचे व्यवस्थापन, ऊर्जेचे स्थानिक उत्पादन, शेतकऱ्यांचे उत्पन्नवर्धन आणि पर्यावरण संवर्धन हे सर्व एकत्र साध्य होऊ शकते. यामुळे सहकारी क्षेत्र हरित ऊर्जा क्षेत्रातील नेतृत्वस्थान मिळवू शकते.

**– वैजंतीमाला केंद्रे, संशोधन अधिकारी, वामनिकॉम, पुणे**

**मो.नं. – ८६९८२ ३६१०८** ✻✻✻✻✻

---

**सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड**

**(शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)**

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) – ९४०३० ८०७५१**

**श्री. माधवेंद्र कोरडे – (फक्त मेसेजसाठी) ९८५०५ ७१४०५**

**✻ प्रशिक्षण कार्यालय –** फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ ई–मेल : sahakarbharati1416@gmail.com

# निर्णय प्रक्रिया!

व्यवस्थापन शास्त्रात निर्णय घेणे Decision making, याला अनन्य साधारण असे महत्त्व आहे. दैनंदिन कामकाजाच्या संदर्भात अनेक निर्णय सहजपणे घेतले जातात, त्यासाठी फारसा विचार करण्याची गरज नसते.मात्र धोरणात्मक निर्णयासाठी शास्त्रोक्त पद्धतीचा वापर करणे अत्यंत आवश्यक असते. बँकांच्या बाबतीत सर्व पातळीवर निर्णय क्षमता असणे आवश्यक आहे. अगदी सेवक श्रेणीपासून ते संस्थेच्या अध्यक्षांपर्यंत प्रत्येकाला वेगवेगळे निर्णय घेणे हा कामाचा भाग असतो.




**डॉ. अभय मंडलिक**
९४०३० ८०७२५


**⁎ निर्णय घेणे या प्रक्रियेतील महत्त्वाचे पैलू पुढीलप्रमाणे –**

**⁎ सर्वसाधारण दैनंदिन निर्णय –** या प्रकारचे निर्णय दररोज घ्यावे लागतात. साधारणपणे या निर्णयासाठी फार मोठ्या विचार प्रक्रियेची गरज नसते. उदाहरणार्थ आज कोणत्या रस्त्याने जावयाचे कोणत्या वाहनाने जावयाचे, किती वाजता निघायचे, हे व्यक्तिगत निर्णय असले तरी हे सहजपणे घेतले जातात. बँकेच्या संदर्भात गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या जागेवर कोणी काम करायचे रोख रकमेची आवश्यकता असल्यास ती केव्हा आणि कुठून आणायची, त्यासाठी कोणते कर्मचारी असतील या प्रकारचे शाखा पातळीवरचे साधारण निर्णय घेण्यासाठी फार विचार करण्याची गरज नसते. बँकेचे नियमावली आणि नियमित पद्धती चा विचार करून हे निर्णय सहजपणे घेतले जातात.

**⁎ अवघड किंवा अपवादात्मक प्रकारचे निर्णय –** कामकाजाच्या संदर्भात, ग्राहक सेवेच्या संदर्भात अनेकदा अवघड किंवा अपवादात्मक पद्धतीचे निर्णय घ्यावे लागतात. शाखा पातळीवर लेट पेमेंट करण्याचा निर्णय असू शकतो. ग्राहक सेवेच्या दृष्टीने हा निर्णय आवश्यक असू शकतो. मात्र यात जोखीम असते.खातेदाराचा पूर्वानुभव त्याच्याशी असलेले संबंध विचारात घेऊन सकारात्मक निर्णय सहजपणे घेता येऊ शकतो मात्र त्यासाठी अनुभवाची जोड असणे आवश्यक आहे.आजारी असलेल्या खातेदाराला घरपोच सेवा देणे, घरी रोख नेऊन देणे, यात जोखीम असते. मात्र व्यवसायाच्या दृष्टीने या प्रकारचे निर्णय घेणे क्रमप्राप्त असते.

**⁎ धोरणात्मक निर्णय –** या प्रकारचे निर्णय सहसा झटपट किंवा लगेच घेतले जात नाहीत. पुरेशी तयारी, परिणामांचा विचार, निर्णयाचे दूरगामी बँकेवर किंवा संस्थेवर होणारे परिणाम, खर्चाची तरतूद, कायद्याची चौकट आणि आवश्यक असल्यास परवानग्या या सर्वांचा साकल्याने विचार करून धोरणात्मक निर्णय घेता येतात. गरजेप्रमाणे बँकेला नवीन सॉफ्टवेअर घेणे हा धोरणात्मक निर्णय असू शकतो.अर्थातच यासाठी खर्चाची तरतूद, संचालक मंडळाची परवानगी,कर्मचारी वर्गाला दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाची तयारी, सॉफ्टवेअर ज्यांचे कडून खरेदी करणार आहोत त्यांचा अन्य बँकांचा पूर्वानुभव, सॉफ्टवेअरची उपयुक्तता आणि सॉफ्टवेअर खरोखर बदलणे आवश्यक आहे काय,या प्रकारच्या सर्व शक्यतांचा विचार करून हा धोरणात्मक निर्णय घेता येतो. धोरणात्मक निर्णय घेत असताना आवश्यकतेनुसार तज्ञांचा सल्ला घेणे इष्ट असते.

**⁎ निर्णय पुढे ढकलणे –** निर्णय घेताना निर्णय पुढे ढकलणे हा देखील एक पर्याय असू शकतो परिस्थितीचा साकल्याने विचार करून निर्णय पुढे ढकलता येतो. जीएसटीमध्ये अलीकडच्या काळात झालेली कपात आणि त्याचा विचार करून पुढे ढकललेले खरेदी निर्णय हे त्याचे उदाहरण असू शकते. बरेचदा अर्थसंकल्पात काही सवलती दिल्या जाण्याची शक्यता असते, अशावेळी निर्णय पुढे ढकलणे हा निर्णय योग्य ठरू शकतो.

**⁎ मोठे किंवा धोरणात्मक निर्णय घेण्याची पूर्वतयारी –** निर्णय घेण्याची व्याख्या, उपलब्ध असलेल्या पर्यायातून योग्य पर्यायाची निवड अशी करता येते. या पार्श्वभूमीवर निर्णय घेण्यापूर्वी काही पूर्वतयारी करणे आवश्यक असते.

विशेषतः धोरणात्मक निर्णय किंवा मोठ्या खर्चाचे निर्णय घेताना ही तयारी गरजेची असते. यामध्ये समोर आलेल्या प्रश्नांचा सर्व बाजूंनी विचार करणे, खरेदीचा निर्णय असल्यास खरोखरच ही खरेदी आवश्यक आहे का? याचा सर्व बाजूने विचार करणे, या खरेदीसाठी पुरेशी तरतूद आहे का? खरेदी कायद्याच्या चौकटीत आहे का? खरेदीला संचालक मंडळाची परवानगी मिळण्याची शक्यता आहे का? या प्रकारची पूर्वतयारी करणे आवश्यक आहे. निर्णय घेण्यापूर्वी विविध पर्यायांचा विचार करणे ही सयुक्तिक असते. बरेचदा स्वस्त पर्याय उपलब्ध असतात. परदेशी तंत्रज्ञान सहजपणे उपलब्ध होऊ शकते, या प्रकारचे पर्यायांचा विचार करून अंतिम निर्णय घेतला जावा.

**⁎ नकारात्मक निर्णय –** व्यावसायिक परिस्थितीमुळे बरेचदा नकारात्मक निर्णय घेणे आवश्यक ठरते. अफरातफरीच्या प्रकरणात कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करणे हे त्याचे उदाहरण असू शकते. अशा बाबतीत बँकेचा दीर्घकालीन विचार करून अपराध्याला योग्य शिक्षा देणे हे योग्य असते. या प्रकारचे कृत्य यानंतर कोणी करण्यास धजावू नये यासाठी पुरेशी शिक्षा देणे ही आवश्यक असते. हे निर्णय नकारात्मक असले तरी अपरिहार्यपणे घ्यावे लागतात. हे निर्णय घेताना कायद्याची तरतूद, आवश्यक असलेली अंतर्गत चौकशी, बाहेरील व्यक्तीकडून करण्यात येणारी चौकशी, पुराव्याची व्यवस्थित छानननी, सर्वांचा साकल्याने विचार करून नकारात्मक निर्णय घेतला जावा. या प्रकारचा निर्णय घेत असताना निर्णय घेणाऱ्यावर विविध प्रकारचा दबाव येण्याची शक्यता असते, निर्णय घेताना त्याचा विचार करण्यात यावा.

**⁎ परिस्थितीजन्य निर्णय –** अनेक वेळा अकस्मात काही परिस्थिती निर्माण होते, अशावेळी फायदा नुकसान याचा विचार न करता झटपट निर्णय घेणे आवश्यक असते. बँकेच्या शाखेजवळचे विजेचे कनेक्शन रस्ता दुरुस्तीच्या कामात खंडित झाल्यास, तातडीने दुरुस्ती किंवा नवीन वायर पूर्ववत बसविणे आवश्यक असते. अशावेळी नियमित प्रोसिजर म्हणजे कोटेशन, कमी दरातली वायर आणणे, याचा विचार करण्यासाठी वेळ नसतो. ग्राहक सेवा कमीत कमी वेळात सुरू व्हावी यासाठी परिस्थितीजन्य झटपट निर्णय, बरेचदा तो खर्चिक असला तरी घेणे क्रमप्राप्त असते. या प्रकारचे निर्णय तारतम्याने घेतले जावेत.

**⁎ निर्णयाबाबतचे अन्य मुद्दे –** घेतले जाणारे सर्व निर्णय उद्दिष्ट पूर्तीच्या दिशेने असावेत. बँकेच्या किंवा संस्थेच्या हिताचे असावेत. खर्चाचा विचार निश्चितपणे करण्यात यावा. काटकसर करता येणे शक्य असल्यास केली जावी. मात्र अत्यावश्यक खर्च केलाच पाहिजे. सॉफ्टवेअरची सुरक्षितता, गोपनीयता, फायरवाल्स यासारखे खर्च मोठे असले तरी ते करणे आवश्यक असते.नियामकांचे म्हणजे रिझर्व्ह बँकेचे धोरण बदलल्यास त्या अनुषंगाने काही निर्णय घ्यावे लागतात, या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करणे ही आवश्यक असते. अपवादात्मक परिस्थितीत घेतले जाणारे निर्णय हे बरेचदा अत्यावश्यक असतात, अशावेळी नेहमीची प्रथा मोडून निर्णय घ्यावे लागतात हे लक्षात ठेवले पाहिजे. निर्णय घेणे हे अवघड असले तरी संस्थेसाठी आवश्यक असते यामुळे सर्व पातळीवर निर्णय घेण्याची सवय लावली पाहिजे. साहेबांना विचारून पाहतो

ही प्रथा लहान निर्णयात तरी कठोरपणे तोडली पाहिजे. कर्मचारी, अधिकारी वर्गाला निर्णयाची सवय लावली पाहिजे. यात एखादा निर्णय चुकला तरी चूक दाखवून देऊन पुन्हा अशी चूक करू नको अशा सूचना देणे इष्ट. व्यवस्थापन म्हणजे वेगवेगळे निर्णय घेणे आणि घेतलेले निर्णय राबवणे या पद्धतीने विचार केल्यास निर्णय प्रक्रियेचे महत्त्व लक्षात येईल.


**– डॉ. अभय मंडलिक**

**लेखक बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत.**


*****


THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL
दि यवतमाळ अर्बन
को-ऑप.बँक लि.,यवतमाळ
Regd.No.YML/BNK/114
विदर्भ
मराठवाड्यातील
अग्रणी
सहकारी
बँक
दत्तोपंत ठेंगडी
गृह कर्ज
फक्त 8.25%*
व्याजदर
अधिक माहीती करिता नजिकच्या शाखेशी संपर्क साधावा.

## सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
## महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**

# सहकार महर्षी




**सहकार चळवळीतील प्रत्येकाने**
**आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

**सहकार महर्षी ग्रंथ - प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)**

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | - | रु. १५००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | - | रु. १३५०/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | - | रु. १२००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

**UPI ID SahakarSugandha@SBI**
सोबत दिलेला **QR** कोड स्कॅन करून
ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व
  शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**

## सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती – संपादक

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |

| कोकण विभाग | | |
|---|---|---|
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| नाशिक | श्री. नितीन बीबीकर | 9665778497 |

| मराठवाडा विभाग | | |
|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | श्री. योगेश भोसले | 9421704116 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| नांदेड | श्री. संदीप चिलकेवार | 7507921655 |

| विदर्भ विभाग | | |
|---|---|---|
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |

**पुस्तकांसाठी संपर्क : ८८०५९ ८१६७३**

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-
**वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 078011100000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. **sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**

THE YAVATMAL URBAN CO-OP., BANK LTD.

# दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ

आम्ही जपतो वारसा विश्वासाचा

**मुख्य कार्यालय :** एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 | **फोन :** 07232-244241, 243703, 237442

Mail - ho_adm@yavatmalurbanbank.com | Website - www.yavatmalurbanbank.com



### आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त

## सहकार महर्षि

# स्व. लक्ष्मणराव इनामदार स्मृति राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

ही स्पर्धा नि:शुल्क असेल

| गट क्र. | स्पर्धक विद्यार्थी | निबंधाचे विषय (उदाहरणादाखल) | शब्द मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | शालेय विद्यार्थी (इयत्ता ८ ते १०) | १. शॉपिंग मॉल आणि सहकारी तत्त्वांवरील ग्राहक भांडार यातील फरक<br>२. माझे आवडते सहकार महर्षी<br>३. सहकाराचे महत्त्व | ३०० शब्द |
| २ | महाविद्यालयीन विद्यार्थी (ज्यू. कॉलेज व सि. कॉलेज) | १. सहकार क्षेत्रात तरुणांचा सहभाग वाढविण्याची गरज<br>२. सहकारात नव्या तंत्रज्ञानाची गरज<br>३. 'विकसीत भारत २०४७ आणि सहकार क्षेत्राची भूमिका | ५०० शब्द |
| ३ | सहकारी क्षेत्रातील कर्मचारी व संचालक (अर्बन/ डिस्टिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक सहकारी पतसंस्था) | १. सहकारी बँकांमधील अडचणी आणि उपाययोजना<br>२. भारतीय अर्थव्यवस्थेत सहकाराचे योगदान<br>३. स्व. लक्ष्मणराव इनामदार यांचे सहकार क्षेत्रातील योगदान | ६०० शब्द |
| ४ | खुला गट (सर्व नागरिक) | १. ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकाराचे महत्त्व<br>२. सहकारातून राष्ट्राचा सर्वांगीण विकास<br>३. 'बिना संस्कार, नहीं सहकार बिना सहकार, नहीं उद्धार | ८०० शब्द |

**एकूण रु. १,००,०००/- (एक लाख) रोख बक्षिसे**

**✻ प्रत्येक गटासाठी ५ बक्षिसे ✻**

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक | रु. ११,०००/- |
| द्वितीय क्रमांक | रु. ७,०००/- |
| तृतीय क्रमांक | रु. ४,०००/- |
| चतुर्थ क्रमांक | रु. २,०००/- |
| पाचवा क्रमांक | रु. १,०००/- |

**✻ विशेष नोंद :** सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र आणि बक्षीसपात्र स्पर्धकांना यशस्वी प्रमाणपत्र आणि मानचिन्ह दिले जाईल.

✻ स्पर्धेसाठी नियम व अटी -

१) भाषा : निबंध मराठी, हिंदी, इंग्रजी, किंवा संस्कृत यापैकी कोणत्याही एका भाषेत असावा.

२) निबंध : निबंध हस्तलिखित (Handwritten) व सुवाच्य अक्षरात असावा.

३) लिफाफ्यावर उल्लेख निबंध असलेल्या बंद पाकिटावर स्व. लक्ष्मणराव इनामदार स्मृति राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आणि आपल्या गटाचे नाव आणि क्रमांक असा स्पष्ट उल्लेख असावा.

४) माहिती : निबंधाखाली आपले नाव, स्वाक्षरी, संपूर्ण पत्ता, पद, मोबाईल नंबर, ईमेल, व्यवसाय, कार्यालय इत्यादी माहिती असावी.

५) निबंध योग्य प्रमाणात समास सोडून लिहावा.

६) निबंध सादर करण्याची शेवटची तारीख: १५ जानेवारी २०२६

७) निबंध कागदाचा एकाच बाजूला लिहावा.

**✻ निबंध पाठवण्याचा पत्ता: दि यवतमाळ अर्बन को-ऑप. बँक लि., मुख्य कार्यालय, गार्डन रोड, एल.आय.सी. चौक, यवतमाळ, जि. यवतमाळ- ४४५००१ किंवा बँकेच्या नजीकच्या शाखेमध्ये.**

# करा जगाची सफर !
# जनसेवा आहे हमसफर !



## जनसेवा पर्यटन कर्ज

- देश / विदेशातील पर्यटनासाठी **रु. 5.00 लाखापर्यंत कर्ज**
- व्याजदर - **11 %**
- प्रोसेसिंग फी - **0 %** *

**रुपये 1.00 लाखासाठी EMI**

- 12 महिने - 8,838.00
- 24 महिने - 4,661.00
- 36 महिने - 3,274.00

**संपर्क : 98222 51834**
**8485871252**
**marketing@janasevabankpune.in**

* अटी लागू

## जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर,पुणे.

जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

**मुख्य कार्यालय :**
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

प्रधानमंत्री आवास योजना
(शहरी २.०) अंतर्गत सबसीडीस पात्र
आपले गृहकर्ज साकार करणं
आता होईल सोपं!



गृहकर्ज
व्याजदर
7.75%*
(पासून पुढे)
सिबील आधारित व्याजदर

कॉम्बो ऑफर
(भारत सरकार सबसीडीस पात्र)
पीएम सूर्यघर मोफत
वीज योजना अंतर्गत



गृहकर्ज घेतलेस
रुफटॉप सोलर
पॅनल कर्ज
व्याजदर सुध्दा
7.75%*
(पासून पुढे)
* नियम व अटी लागू

अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.
मोबाईल : ७८८८००९७१८

Since 1935
SUB का साथ, आपका विकास

सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली
(शेड्युल्ड को-ऑप. बँक)
प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) १३७६२३६ /३७/३८

सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित

नागरी सहकारी 2026
बँक / पतसंस्था दैनंदिनी

नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश
देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...



नागरी
सहकारी
बँक दैनंदिनी
२०२६

किंमत रु. 500/-
अधिक प्रतींसाठी
विशेष सवलत
आजच नोंदणी करा!

किंमत रु. 400/-
अधिक प्रतींसाठी
विशेष सवलत
आजच नोंदणी करा!

नागरी
सहकारी
पतसंस्था दैनंदिनी
२०२६



सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध' कार्यालय : ऑफिस नं. १५, विष्णुप्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३० मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

safe age
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

Our Certificates

ISO 14001 : 2004

IS 5244 : 2014 CM/L-7500087614

IS 550 : 2014 CM/L-3978088

IS 11188 : 2014 CM/L-2870669

ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor

**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

**Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.**

**Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur**

**We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,**



स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
या दिवाळीत समृद्ध करुया,
आनंदाची व विश्वासाची परंपरा
दिपावलीच्या तेजोमय शुभेच्छा
* नियम व अटी लागू. योजना फक्त सभासदांसाठी
213 शाखा
10 लाख+ समाधानी ग्राहक
10,000+ कोटींची ठेवी
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : डॉ. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 lokmanyasociety.org

Registered - SAHAKAR SUGANDHA - PRGI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Contract No. : BP/EP 40280299 Customer ID : 3000071496
(Publication Date - 05/12/2025) Posting on 07/12/2025 Posting at BMI Pune PSO, Pune 411001

